09-04-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A

PFK/ 10:30

09-04-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1

PFK/ KTG/ D/ पूर्वी श्री. भोगले...... 10:30

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

**पृ.शी.**: गरिबांसाठी प्रभावी आरोग्य विमा राबविण्याची गरज

**मु.शी.**: गरिबांसाठी प्रभावी आरोग्य विमा राबविण्याची गरज या विषयावर डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री हेमंत टकले, सुभाष चव्हाण, ॲड.उषा दराडे, सर्वश्री हुसेन दलवाई,रमेश शेंडगे, श्रीमती अलका देसाई सर्वश्री प्रकाश बिनसाळे, सतीश चव्हाण, वि.प.स.यांचा प्रस्ताव

( चर्चा पुढे सुरु ......

श्री. सुरेश शेट्टी (सार्वजनिक आरोग्य मंत्री) : महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे व इतर सन्माननीय सदस्यांनी विधान परिषद नियम 260 अन्वये आरोग्य विभागासंबंधीच्या प्रस्तावावर सभागृहात चर्चा घडवून आणली, त्याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो. या प्रस्तावावर दोन दिवस, दोन-दोन तास प्रदीर्घ चर्चा झालेली आहे व तेवढा वेळ आपण या चर्चेसाठी दिला त्याबद्दल आपला सुध्दा आभारी आहे. अशा प्रकारे सखोल चर्चा या प्रस्तावावर झालेली आहे. माझ्या माहितीप्रमाणे मी आरोग्य मंत्री झाल्यानंतर पहिल्यांदाच या सभागृहात आरोग्य विषयक प्रस्तावावर एवढी प्रदीर्घ चर्चा झाली असावी. त्यात पहिल्या दिवशी जवळजवळ 14 सन्माननीय सदस्यांनी या चर्चेत भाग घेतला, त्यांची नावे सांगून मी सभागृहाचा वेळ घेणार नाही, पण त्या सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मात्र जरुर व्यक्त करणार आहे. दुसऱ्या दिवशी 22 सन्माननीय सदस्यांनी या प्रस्तावाच्या संदर्भात आपले योगदान दिले व अनेक सूचना केल्या, त्यांचेही आभार व्यक्त करतो.

महोदय, या प्रस्तावाच्या अनुषंगाने आरोग्य विभागाबाबत चर्चा करीत असताना अनेक सन्माननीय सदस्यांनी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या संदर्भातील मुद्दे उपस्थित केलेले आहेत. तशी कल्पना मी माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांना दिली. त्याप्रमाणे त्या विभागाचे माननीय राज्य मंत्री माझ्या उत्तराच्या भाषणानंतर त्यांच्या विभागाशी संबंधित मुद्यांची उत्तरे देतील.

महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे यांनी या प्रस्तावावर चर्चा सुरु करीत असताना संपूर्ण आरोग्य विभागाचे एक प्रकारे क्लिनिकल डायसेक्शनच या सभागृहात केले असे म्हटले तरी चालेल. त्यानंतर सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्यामध्ये या विभागाशी रिलेटेड इश्यूज सुध्दा मांडले.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी.........

सभापती महोदय,मी सभागृहाला सांगू इच्छितो की, सन 2011-2012 मध्ये आरोग्य खात्यासाठी जो आऊट ले होता तो स्टेट प्लॅनमध्ये 786.72 कोटी रुपयांचा आणि डिस्ट्रीक्ट प्लॅनमध्ये 376.21 कोटी रुपयांचा होता अशा प्रकारे दोन्ही मिळून 1252.93 कोटी रुपयांचा टोटल आऊट ले आरोग्य खात्यासाठी करण्यात आला होता. त्यातील प्लॅन मध्ये 737.68 कोटी रुपये आणि नॉन प्लॅनमध्ये 2424.60 कोटी रुपये इतका निधी आरोग्य खात्यासाठी बजेटेड करण्यात आला होता. हा कॉम्पोनन्ट सोडून एनआरएचएमचा सुध्दा काही कॉम्पोनन्ट आहे. केन्द्र सरकार मार्फत संपूर्ण देशात एनआरएचएम राबविली जाते त्यामधूनही राज्याला काही निधी मिळणार आहे. परवाच्या दिवशी या संदर्भात दिल्ली येथे एक बैठक आयोजित करण्यात आली होती. या विभागाचे सचिव आणि अतिरिक्त मुख्य सचिव तसेच एनआरएचएमचे मिशन डायरेक्टर दिल्लीच्या बैठकीला उपस्थित होते. या वर्षी केन्द्र सरकारच्या एनआरएचएम मधून आपल्या राज्याला कमीत कमी 1400 कोटी रुपये मिळतील असा त्यांचा अंदाज आहे..अशा प्रकारे स्टेट प्लॅन कॉम्पोनन्ट, नॉन प्लॅन कॉम्पोनन्ट आणि एनआरएचएमचा कॉम्पोनन्ट एकत्र केला तर या वर्षी जवळजवळ 4 हजार 762 कोटी रुपये संपूर्ण राज्यात खर्च करण्याकरिता आरोग्य खात्याला उपलब्ध होणार आहेत असे मला वाटते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांकडून ग्रामीण रुग्णालय, पीएचसी, महिला रुग्णालय इत्यादीच्या बांधकामाच्या संदर्भात मुख्य मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. आपआपल्या मतदारसंघामध्ये पीएचसी , ग्रामीण रुग्णालय सुरु करण्याच्या दृष्टीने दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्य प्रयत्न करीत असतात.त्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, आजपर्यंत पीएचसी ग्रामीण रुग्णालय, महिला रुग्णालय इत्यादीचे 400 कोटी रुपयांचे स्पील ओव्हरचे काम हाती घेण्यात आले होते.जी कामे अंडर कन्स्ट्रक्शन आहेत त्या कामाची किंमत 400 कोटी रुपये एवढी आहे. संपूर्ण राज्यात सहा सात वर्षापूर्वी जी कामे सुरु करण्यात आली होती परंतु अजूनही ती कामे पूर्ण झालेली नाहीत. ती कामे पूर्ण करण्यासाठी कमीत कमी 400 कोटी रुपये लागणार आहेत. त्याचबरोबर काही कामांना अँडमिनिस्ट्रेटीव्ह अॅप्रुव्हल सुध्दा देण्यात आलेले आहे. गेल्या दहा वर्षात 400 कोटी रुपयांच्या कामांना ॲडमिनिस्ट्रेटीव्ह ॲप्रुव्हल दिलेले आहे. त्या व्यतिरिक्त रिपेअर्सची काही कामे करावयाची आहेत. सध्याची जी रुग्णालये आणि पीएचसी अस्तित्वात

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी...

आहेत त्यांच्या रिपेअर्सकरता अंदाजे 200 कोटी रुपये लागणार आहेत अशा प्रकारे ऑन गोईगच्या कन्स्ट्रक्शनच्या कामाला 400 कोटी रुपये लागणार आहेत. माननीय मुख्यमंत्र्याचे ,माननीय उप मुख्य मंत्र्यांचे आणि माझे स्वतःचे देखील असे मत आहे की, प्रथम 400 कोटी रुपयांची कामे पूर्ण करण्यात आली पाहिजेत.. ही कामे पूर्ण करण्यासाठी जर उशीर झाला तर त्या कामांची किंमत आणखी वाढते. त्याचे परिणाम सुध्दा वेगवेगळे होत असतात त्यामुळे पहिल्या प्रायारिटीमध्ये 400 कोटी रुपयांची कामे पूर्ण करण्यावे खात्याने ठरविले आहे. त्याचबरोबर 200 कोटी रुपयांची रिपेअर्सची कामे सुध्दा लवकरच हाती घेण्यात येणार आहेत.

नंतर श्री.सरफरे

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी....

आपल्याकडे 1 हजार कोटीची कामे प्रलंबित असून ती एका वर्षात पूर्ण होणार नाहीत. ही कामे आपल्याला दोन-तीन वर्षाच्या कालावधीत टप्प्या-टप्प्याने पूर्ण करावी लागतील. त्याकरिता यावर्षी बांधकामासाठी स्टेट प्लॅनमधून 245 कोटींची तरतूद करण्यात आली आहे आणि केंद्र सरकारकडून या कामासाठी 75 कोटी मिळणार आहेत. त्याचप्रमाणे डीपीडीसीमार्फत 160 कोटी उपलब्ध होणार आहेत,एनआरएचएममधून 70.5 कोटी मिळणार आहेत. ही सर्व रक्कम एकत्र केली तर 550.55 कोटी रुपये यावर्षी बांधकामाकरिता उपलब्ध होणार आहेत. राज्यभर आरोग्य खात्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी खूप वर्षानंतर पहिल्यांदाच एवढी मोठी रक्कम उपलब्ध होणार आहे.

सभापती महोदय, मी या खात्याचा मंत्री झाल्यापासून सर्व माननीय सदस्यांनी मला पाठिंबा दिला आहे, त्यामध्ये माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते अजून सभागृहामध्ये आले नाहीत, तसेच दोन्ही सभागृहातील माननीय सदस्य या सर्वांचे मी आभार मानतो. या खात्याचा कार्यभार स्वीकारल्यानंतर माझ्याकडून चांगल्या प्रकारचे काम होईल याचा मला विश्वास होता. राज्यातील गोरगरीब जनतेला चांगल्या आरोग्याच्या सेवा, सुविधा पुरवावयाच्या आहेत, परंतु त्यासाठी आपल्याकडे निधीची उपलब्धता फार कमी आहे. तरीसुध्दा आहे त्या पैशाचा पुरेपूर वापर गोरगरिबांसाठी करण्याचे काम हाती घेतले आहे. या ठिकाणी चर्चेमध्ये भाग घेत असतांना अनेक माननीय सदस्यांनी हॉस्पिटलमध्ये डॉक्टर उपलब्ध नाही, उपकरणे आहेत परंतु ती चालविणारे तंत्रज्ञ उपलब्ध नाहीत, ॲम्ब्युलन्स उपलब्ध नाही, विजेचा तुटवडा आहे अशाप्रकारच्या अडचणी मांडल्या. प्रत्येक ठिकाणी काही ना काही अडचण असू शकते हे मी मान्य करतो. आपले महाराष्ट्र राज्य फार मोठे असून या राज्यातील प्रत्येक नागरिकास आरोग्य सेवा देण्यासाठी ज्या प्रमाणात राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद असावयास पाहिजे तेवढी नाही. आज राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये फक्त 2.4 टक्के इतकीच रक्कम आरोग्य सेवेसाठी ठेवण्यात आली आहे. या बाबतीत मी स्वत: माननीय मुख्यमंत्री व माननीय अर्थमंत्र्यांकडे कॅबिनेटच्या बैठकीमध्ये ही रक्कम वाढविण्यासाठी प्रयत्न करीत आहे.

सभापती महोदय, आरोग्य खात्यावर चर्चा करीत असतांना आपण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, लोकांना ट्रीटमेंट देण्याचे काम आरोग्य खात्याचे असते. थोडयाबहुत प्रमाणात नॅशनल प्रिव्हेंटीव्ह प्रोग्राम आम्ही हाती घेत असतो. परंतु एकंदरीत Prevention is more important

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी....

than treatment. आपला देश स्वतंत्र झाल्यानंतर आजही लोकांना पिण्याचे पाणी शुध्द मिळण्याकडे आपल्याला अधिक लक्ष द्यावे लागत आहे. गावामध्ये आणि शहरामध्ये लोकांना पिण्याचे स्वच्छ पाणी मिळणे ही एक मूलभूत समस्या झाली आहे. मोठया प्रमाणात आजार हे त्यामधून उद्‌भवतात या करिता त्या गोष्टीकडे आपल्याला लक्ष देण्याची गरज आहे. पिण्याच्या शुध्द पाण्याबरोबर सॅनिटेशन,....

(अपूर्ण - यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी . . . .

स्वच्छता ठेवण्याची नितांत आवश्यकता आहे. याबाबतीत वेगवेगळया विभागांनी ग्रामीण आणि शहरी भागामध्ये राबविण्याचा प्रयत्न केला. पण या सर्व कार्यक्रमाकडे जास्त लक्ष देण्याची गरज आहे. कारण मलेरियाचा आणि लॅप्टोचा आऊट ब्रेक झाला. मी एक उदाहरण देऊ इच्छितो की, सोलापूर मध्ये दीड वर्षापूर्वी कॉलऱ्याचा आऊट ब्रेक झाला आणि त्यामध्ये 12-13 लोकांचा मृत्यू झाला होता. त्याचे मूळ कारण म्हणजे सोलापूर शहरामध्ये जे गटारे होती, त्यामध्ये पिण्याच्या पाईप होता आणि तो लिकेज झाल्यानंतर गटाराचे पाणी पिण्याच्या पाण्यामध्ये मिक्स झाले आणि त्यामुळे तेथे कॉलऱ्याची साथ आली आणि लोकांचा मृत्यू झाला. संपूर्ण राज्यामध्ये अनेक ठिकाणी असे घडल्याचे पहातो.लॅप्टोचे एच-1, एन-1चे, कॉलऱ्याचे, मलेरियाचे रुग्ण आढळून आले. एक-दोन महिन्यामध्ये पावसाळा सुरु होईल परंतु आताच मलेरियाच्या बाबतीत चर्चा सुरु झाली आहे.

सभापती महोदय, आजच मी मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांचे मलेरियाच्या संबंधातील स्टेटमेंट वर्तमानपत्रामध्ये वाचले. संपूर्ण राज्यामध्ये आपल्याला मलेरियाच्या प्रादुर्भाव रोखण्याच्या दृष्टीने आतापासूनच तयारी करावी लागेल.मुंबईच्या संबंधात चर्चा करताना मी सांगू इच्छितो की,गेल्या दोन-तीन वर्षामध्ये मलेरियाच्या संबंधात मॅक्झीमम केसेस आढळून आल्या होत्या आणि ते सर्वांना माहिती आहे. पण गेल्या वर्षी महाराष्ट्र राज्याने केंद्र शासनाच्या मदतीने एक पाऊल उचललेले आहे आणि त्यानुसार महानगरपालिकेतील सर्व अधिकाऱ्यांचे टोटल मॉनिटरींग करुन गेल्या वर्षी आपण मुंबईमध्ये कॉलऱ्याच्या आजाराच्या बाबतीत कंट्रोल करण्याचा प्रयत्न केला आणि त्यामध्ये आपल्याला यश देखील मिळाले. त्याचप्रमाणे येणाऱ्या पावसाळयाच्या दृष्टीने आजपासूनच तयारी करावी लागणार आहे आणि मी त्या दृष्टीने महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांची दीड महिन्यापूर्वी एक बैठक घेतली होती.मी आपल्याला सांगू इच्छितो की, 2009-2010 मधील आकडेवारी पाहिली तर संपूर्ण राज्यामध्ये ओ.पी.डी.पेशंटची संख्या 1,60,46,187 इतकी असून यावर्षी 2010-2011 च्या जानेवारी महिन्यापर्यंत उपलब्ध असलेल्या आकडेवारीनुसार 1,43,98,122 इतके ओ.पी.डी.मधील पेशंट आहेत. त्यामुळे ओ.पी.डी. पेशंटमध्ये वाढ झाल्याचे दिसत आहे. इन-पेशंटची आकडेवारी 2009-2010 मध्ये 17,79,484 होती आणि यावर्षी जानेवारी मधील पहिल्या आठवड्याची आकडेवारी 17,8,027 इतकी आहे.संपूर्ण राज्यामध्ये 2009-2010 मध्ये ज्या मेजर सर्जरी केलेल्या आहेत त्यांची संख्या 1,61,014 आहे आणि यावर्षी जानेवारीपर्यंत 1,45,621 इतक्या मेजर सर्जरी केल्या आहेत. इन्स्टीट्युशन डिलीव्हरीचा रेट पाहिला तर 2009-2010 मध्ये



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी . . . .

2,24,170 आणि 2010-2011 मध्ये 2,33,825 इतक्या डिलीव्हरीज शासकीय रुग्णालयामध्ये केलेल्या आहेत. डिलीव्हरीमध्ये सिझेरिअनचा रेट पाहिला तर 2009-2010 मध्ये 30,700 इतका होता आणि आता जानेवारीपर्यंत 35,500 पर्यंत हा रेट गेलेला आहे. मी याठिकाणी जास्त आकडेवारी देणार नाही. पण सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाबतीत आपल्यासमोर कोणते प्रॉब्लेम्स् आहेत याचा विचार केला तर सर्वात पहिला प्रश्न हा ह्युमन रिर्सोस बाबत आहे.

यानंतर श्री.बरवड . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी .....

ह्युमन रिसोर्समध्ये वर्ग 1 चे अधिकारी असतील, स्पेशालिस्ट डॉक्टर्स असतील, वैद्यकीय अधिकारी असतील, एएनएम नर्सेस असतील किंवा टेक्निशियन्स असतील या सगळ्यांची आकडेवारी पाहिली तर खूप मोठी गॅप आपल्याला दिसून येते. काही वर्षापूर्वी शासनाने वर्ग 3 आणि वर्ग 4 ची पदे भरण्यावर बंदी घालण्याचा जो निर्णय घेतला त्याचाही थोडा परिणाम त्यामध्ये झालेला आहे. दुसरे म्हणजे वर्ग 1 आणि वर्ग 2 अधिकाऱ्यांची भरती आपण एमपीएससी मार्फत करतो. एमपीएससीमध्ये देखील काही वर्षांपूर्वी काही प्रश्न निर्माण झाले होते. त्यामुळेही एकूण प्रोसेस मंदावली. त्यामुळे आपल्या खात्यामार्फत जी मागणी एमपीएससीकडे पाठविली होती ती मागणी वेळेवर पूर्ण झाली नाही. त्यामुळे वर्ग 1, वर्ग 2 तसेच वर्ग 3 चा बॅकलॉग राहिला. नंतर वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्रुटमेंट एमपीएससीकडे न पाठविता खात्याने करावी असा निर्णय शासनाने घेतला. तो निर्णय झाल्यानंतर आपण खात्यामार्फत भरती करण्याची प्रक्रिया सुरु केली.

मी एक गोष्ट सभागृहाला सांगू इच्छितो की, दोन महिन्यापूर्वीच एमपीएससीने सी.एस.कॅडरची 135 पदे आपल्याला उपलब्ध करुन दिली. डीएचओ कॅडरची 61 पदे उपलब्ध करुन दिली. ॲनेस्थेटिस्टची 11 पदे, ऑर्थोपिडिशिन्सची 11 पदे तसेच रेडिऑलॉजिस्टची 8 पदे उपलब्ध करुन दिलेली आहेत. दोन महिन्यांपूर्वी या पदांची यादी आपल्याकडे आली आणि त्यापैकी बऱ्याच लोकांचे पोस्टींग केलेले आहे. 1208 वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या आपण एमकेसीएलमार्फत ऑनलाईन पध्दतीने केल्या. त्यापैकी आतापर्यंत 600 ते 700 वैद्यकीय अधिकारी रुजू झालेले आहेत. आपण एक असा निर्णय घेतला होता की, जे वैद्यकीय अधिकारी मेरिट लिस्टवर नियुक्त झालेले आहेत त्यांना त्यांच्या जिल्ह्यात ज्या ठिकाणी पदे रिक्त आहेत त्या ठिकाणी पोस्टींग द्यावयाची. त्या जिल्ह्यातील रिक्त पदे संपल्यानंतर बाजूच्या जिल्ह्यात आणि त्या डिव्हीजनमध्ये पोस्टींग देण्याचा निर्णय आपण घेतला. मराठवाड्यातील काही लोकांना रत्नागिरी, सिंधुदुर्ग या ठिकाणी पोस्टींग देण्याचा प्रयत्न केला. हा धोरणात्मक निर्णय घेताना आम्ही एक विचार असा केला होता की, जे नवीन डॉक्टर्स आपल्या सर्व्हिसमध्ये येतात त्यांची सोय बघून मी हा निर्णय घेतला. मला आश्चर्य वाटले की, एकदा त्यांच्या जिल्ह्यात किंवा बाजूच्या जिल्ह्यात

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

श्री. सुरेश शेट्टी ....

पोस्टींग दिल्यानंतर लगेच कमीतकमी 500 व्हीआयपी रेफरंस बदलीसाठी माझ्याकडे आले. आधी आपण संपूर्ण राज्यात त्यांचे पोस्टींग करीत होतो. आता आपण त्यांचे पोस्टींग जिल्ह्यात करतो पण जिल्ह्यात काम करायला सुध्दा लोक इच्छुक नाहीत. त्यांना गावातच काम करावयाचे आहे अशी मानसिकता लोकांमध्ये निर्माण झालेली आहे. ही बाब कशी हाताळावयाची हे मला समजत नाही. प्रत्येक डॉक्टर आपल्या गावीच काम करणार. प्रत्येक व्हीआयपी माझ्याकडे येतो आणि सांगतो की हे काम करावेच लागेल. असे केले तर आरोग्य खात्याच्या कामामध्ये आपण कशी काय सुधारणा करणार, याचा सर्व सन्माननीय सदस्यांनी स्वत: विचार करावयास पाहिजे. मी वारंवार या सभागृहात सांगितले आहे की, रत्नागिरी, सिंधुदुर्ग , नंदुरबार जिल्ह्यामध्ये डॉक्टर जाण्यास तयार नाहीत. मी आज परत सांगू इच्छितो की, ज्या ज्या डॉक्टर्सचे पोस्टींग आम्ही रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये केलेले आहे त्यापैकी 50 टक्के डॉक्टर्स व्हीआयपींना घेऊन आले की, आम्हाला कोल्हापूरला पोस्टींग द्या, पुण्याला पोस्टींग द्या. त्यांना रत्नागिरी, सिंधुदुर्ग नको आहे.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/ पूर्वी श्री.बरवड 10:55

श्री.सुरेश शेट्टी.......

सर्व सन्माननीय सदस्यांना मी हात जोडून नम्रप्रणे विनंती करतो की, त्यांनी या 3 जिल्ह्यातील डॉक्टरांच्या बदलीसाठी कोणाचीही शिफारस करु नये. कारण आपण जर असे करीत बसलो तर या तिन्ही जिल्ह्यात कधीही वैद्यकीय अधिकारी किंवा स्पेशालिस्ट डॉक्टर्स देऊ शकणार नाही आणि लोकांना आरोग्य सेवा मिळणार नाही.

सभापती महोदय, आरोग्य विभागातील एचआरडी जर पाहिले तर काही वैद्यकीय अधिकाऱ्यांना कायम स्वरुपी घेतलेले आहे आणि काही वैद्यकीय अधिका-यांना 11 महिन्याकरिता ॲडॉप्ट बेसिसवर घेतलेले आहे. ॲडॉप्ट बेसिसवर असलेल्या डॉक्टर्सची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. त्याच प्रमाणे एमकेसीएलच्या माध्यमातून 1200 डॉक्टर्सच्या नियुक्त्या केलेल्या आहेत. या डॉक्टर्सना दि.30 मे, 2011 पर्यंत नियुक्तीच्या ठिकाणी रुजू व्हावे लागेल. जे डॉक्टर्स या कालावधीपर्यंत कामावर रुजू होतील त्यांना घेतले जाईल. यापैकी काही डॉक्टर्सनी ते पी.जी.करीत असल्यामुळे कोणी सहा महिन्यांची, कोणी एक वर्षाची तर कोणी दीड वर्षाची मुदत रुजू होण्यासाठी मागितली आहे. परंतु त्यांची विनंती मान्य करता येणार नाही. याचे कारण असे की, शासनाला त्या डॉक्टर्सची आज गरज आहे. त्यामुळे एवढ्या कालावधीपर्यंत थांबता येणार नाही. जे मेरिट लिस्टवर डॉक्टर्स आहेत त्यांना दिनांक 30 मे, 2011 पर्यंत कामावर रुजू व्हावे लागेल. ते जर आले नाहीत तर नवीन भरतीची प्रक्रिया सुरु केली जाईल. ज्या पदांची आवश्यकता आहे ती सर्व पदे भरण्यात येतील. दि.30 मे, 2011 नंतर 3 महिन्यामध्ये जेवढ्या जागा रिक्त आहेत त्या सर्व जागा भरण्याचा प्रयत्न शासन करणार आहे.

त्यासोबतच टेक्निशीयन्सची जेवढी पदे रिक्त आहेत ती भरण्याची प्रक्रिया सुरु करण्याचे मी 15 दिवसांपूर्वीच आदेश दिलेले आहेत. त्यामुळे ही पदे सुध्दा भरण्यात येतील. एमपीएससीच्या माध्यमातून तज्ज्ञ डॉक्टरांची पदे भरण्यासाठी विभागाकडून सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. एमपीएससीने आता ऑन लाईन अर्ज करण्याची सुविधा सुरु केली असल्यामुळे ही पदे लवकर भरण्यासाठी मदत होणार आहे. एमपीएससीमधील वातावरण देखील त्यामुळे बदलले आहे. त्यांच्याकडून विभागाकडे तज्ज्ञ डॉक्टर्सची लवकरच यादी मिळण्याची शक्यता आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.सुरेश शेट्टी.......

त्यामुळे आरोग्य खात्यामधील डॉक्टर्सची, विशेष तज्ज्ञ डॉक्टर्सची सर्व पदे भरण्याचा शासन प्राथम्याने प्रयत्न करणार आहे.पुढील 2-4 महिन्यामध्ये सर्व रिक्त पदे भरण्यात येतील. डॉक्टरांच्या रिक्त पदांबाबत दोन्ही सभागृहात चिंता व्यक्त केली जाते. अनेक प्रश्न मांडले जातात, चर्चा केली जाते, परंतु या सर्व प्रयत्नानंतर सन्माननीय सदस्यांना डॉक्टरांच्या रिक्त पदांबाबत प्रश्न मांडण्याची वेळ येणार नाही अशी मला खात्री आहे.

सभापती महोदय, या सभागृहात औषध खरेदीसंबंधी सुध्दा चर्चा करण्यात आली आहे. या ठिकाणी असे सांगण्यात आले की, अनेक रुग्णालयात डॉक्टर्स आहेत, पण औषधे नाहीत, औषधे उपलब्ध असली तरी डॉक्टर्स ती देत नाहीत, रुग्णांना बाहेरुन खरेदी करण्यासाठी चिठ्ठी लिहून दिली जाते. औषध खरेदीच्या प्रक्रियेवर या सभागृहात पुष्कळदा चर्चा झालेली आहे. मागील 10-11 वर्षांपासून दोन्ही सभागृहात या विषयावरील चर्चा मी ऐकत आलो आहे. औषध खरेदीच्या अनुषंगाने मंत्र्यांवर आरोप करण्यात आले आहेत, अधिकाऱ्यांवर आरोप करण्यात आले आहेत. त्यामुळे मी एक वर्षापूर्वी औषध खरेदीसाठी जी.आर.काढला आहे. ई-टेंडरद्वारे औषध खरेदी करण्याची प्रक्रिया सुरु करण्याचा मी निर्णय घेतला आहे. सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी चर्चेच्या ओघात बोलत असताना जेनरिक मेडिसीनचा उल्लेख केला होता.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी...

त्यासंबंधीचा निर्णय आपण एक वर्षापूर्वी घेतला होता. ही जेनेरिक औषधे आपण संपूर्ण राज्यासाठी विकत घेणार आहोत.

सभापती महोदय, मी आपल्याला सांगू इच्छितो की, आपल्या राज्यामध्ये रेट कॉण्ट्रॅक्ट पध्दतीने औषधे खरेदी करण्याची प्रक्रिया वर्षानुवर्षे चालू होती. वैद्यकीय शिक्षण खात्या मार्फत महानगरपालिकांसाठी, इएसआयएससाठी रेट कॉण्ट्रॅक्टच्या माध्यमातून औषधे खरेदी केली जात होती. अशा पध्दतीने औषधांची खरेदी गेल्या 10 वर्षापासून सुरु आहे. या रेट कॉण्ट्रॅक्ट पध्दतीने औषधे खरेदी करण्यासंबंधी दोन्ही सभागृहामध्ये खूप चर्चा होते. या औषधे खरेदी प्रक्रियेमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी ई-टेंडरिंगची गरज आहे असे माझे ठाम मत आहे. यासंबंधी विभागामध्ये चर्चा करुन त्यासंबंधीचा जी.आर काढण्यात आला. मी त्याबाबत जास्त बोलणार नाही. परंतु हायकोर्टामध्ये एक याचिका दाखल करण्यात आली. जो जी.आर. काढण्यात आलेला होता त्यासंदर्भात कॅबिनेटची परवानगी घेऊन राज्यात नवीन धोरण राबविण्याचा निर्णय तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी घेतल्यामुळे तो जी.आर. रद्द करण्यात आला आणि संपूर्ण राज्यामध्ये जुन्याच पध्दतीने औषधांची खरेदी झाली. आता दीड महिन्यापूर्वी माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण तसेच माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांची मंत्रालयामध्ये एक बैठक झाली आणि त्यामध्ये औषधे खरेदीच्या धोरणावर दीड तास चर्चा झाली. आरोग्य खात्याच्या औषधांची खरेदी कोणी करावयाची यावरही चर्चा झाली. याबाबतीत मुख्य सचिवांनी एक टीम नेमून आणि यासंबंधीचा अभ्यास करुन एक नोट सादर करावी, अशा प्रकारचे आदेश माननीय मुख्यमंत्र्यांनी मुख्य सचिवांना दिले. मुख्य सचिवांनी असा निर्णय घेतला की सार्वजनिक आरोग्य खात्याची 70 ते 80 टक्के औषधे असतात त्यामुळे औषधे खरेदी करण्याचे अधिकार हे सार्वजनिक आरोग्य खात्यालाच दिले पाहिजेत. औषधांची खरेदी आरोग्य खात्याने करायला पाहिजे असे मुख्य सचिवांनी केलेल्या अभ्यासावरुन सांगितले. त्यामुळे आता कॅबिनेटपुढे जाऊन सार्वजनिक आरोग्य खात्यामार्फत ई-टेंडरिंग द्वारे औषधे खरेदी करण्याची प्रक्रिया लवकरात लवकर सुरु करण्यात येणार आहे. या ई-टेंडरिंग द्वारे केन्द्र शासनाने शिफारस केलेली जेनेरिक औषधे खरेदी केली जाणार आहेत. हरियाणा, तामिळनाडू या राज्यांनी जेनेरिक औषधे घेण्याची प्रक्रिया आधीच सुरु केलेली आहे. ही जेनेरिक औषधे चांगली असतात आणि अन्य औषधांच्या तुलनेमध्ये ती 30 ते 40 टक्के स्वस्त

श्री. सुरेश शेट्टी...

असतात. यामुळे गरिबांना त्याचा फायदा होईल. प्रत्येक सिव्हील हॉस्पिटलमध्ये एक जेनेरिक औषधांचे दुकान असावे अशा केन्द्र शासनाच्या सूचना आहेत. त्या सूचनांप्रमाणे आपण देखील जेनेरिक औषधांचे दुकान काढण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यासाठी कोणती पध्दत अवलंबायची, टेंडर काढायचे किंवा कसे याचा विचार करुन आणि यामध्ये पारदर्शकता आणून जेनेरिक औषधांचे दुकान उघडण्यासंबंधीची जी केन्द्र सरकारची योजना आहे ती आपण आपल्या राज्यात राबविणार आहोत.

सभापती महोदय, ॲम्ब्युलन्स संबंधीचा महत्वाचा मुद्दा या ठिकाणी उपस्थित करण्यात आला. आपल्याकडे ॲम्ब्यूलन्स खूप आहेत.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुरेश शेट्टी...

आता आपण मोबाईल क्लिनीक अशा ॲम्ब्युलन्सच्या संदर्भात ऑर्डर दिलेली आहे. मला वाटते पाच, सात दिवसात या ॲम्ब्युलन्सची डिलीव्हरी सुरु होणार आहे. प्रत्येक जिल्ह्यासाठी एक एक मोठया मोबाईल क्लिनीक ॲम्ब्युलन्स उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. राज्यात जे आदिवासी जिल्हे आहेत, त्या ठिकाणी जास्त मोबाईल क्लिनीक ॲम्ब्युलन्स उपलब्ध करुन देणार आहोत. 40 मोबाईल ॲम्ब्युलन्सची ऑर्डर देण्यात आली आहे. गडचिरोलीमध्ये 3 मोबाईल ॲम्ब्युलन्स जास्तीची मोबाईल ॲम्ब्युलन्स देणार आहोत. मोबाईल क्लिनीक ॲम्ब्युलन्स आहोत. एप्रिल अखेर पर्यंत या संदर्भातील फन्कनींग पूर्ण होईल असे मी आपल्याला सांगू इच्छितो. हा एनआरएचएम कार्यक्रम असून त्यासाठी केंद्र शासनाकडून तरतूद उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. मोबाईल क्लिनीक ॲम्ब्यूलन्स् मध्ये एक एम.बी.बी.एस्.महिला मेडीकल ऑफिसर, 1नर्स, 1 लॅबोरेटरी असिस्टंट, 1 फार्मासिस्ट, 1 ड्रायव्हर कम ॲटेन्डेंट, तसेच सपोर्टसाठी एक व्हेईकल या मोबाईल क्लिनीक ॲम्ब्युलन्स समवेत राहणार आहे. राज्यात आदिवासी गावे आहेत, जी रिमोट गावे आहेत, तेथे आरोग्याच्या सुविधा उपलब्ध नाहीत, त्या विभागात जाऊन मोबाईल क्लिनीक ॲम्ब्युलन्सच्या माध्यमातून सुविधा आपण उपलब्ध करुन देणार आहोत. प्रत्येक जिल्हयात जाहिरात देऊन अर्ज मागविले आहेत, त्या जिल्हयात ज्या चांगल्या स्वयंसेवी संस्था आहेत, त्यांच्याकडे हे काम देणार आहोत. यापुढे जाऊन शासनाने असाही निर्णय घेतलेला आहे की, या मोबाईल व्हॅनचा मिसयूज होऊ नये म्हणून या मेडीकल व्हॅनमध्ये जीपीआरएस सिस्टीम लावून त्यासंबंधीची मुव्हमेंट आपण स्वत: करणार आहोत.

सभापती महोदय, मी सांगू इच्छितो की, इमर्जन्सी मेडीकल रिस्पॉन्स सर्व्हीस सिस्टीम अशी योजना केंद्र सरकारची होती. या विषयासंबंधी चार वर्षापूर्वी राज्याच्या मंत्रिमंडळात निर्णय झाला होता. परंतु त्याची अंमलबजावणी आतापर्यंत झाली नव्हती. मुंबई, ठाणे अशा पाच मेजर शहरे होती ती वगळयात आली होती. परंतु आता संपूर्ण राज्यात इमर्जन्सी मेडीकल रिस्पॉन्स सर्व्हीस सिस्टीम लागू करण्याचा मंत्रिमंडळाने निर्णय घेतला आहे. जो कामन नंबर 108 असतो, तो नंबर सुरु करण्याचा आपण निर्णय घेतला आहे. 690 ॲम्ब्युलन्स घेणार आहोत. या वर्षी आणि पुढच्या वर्षी असे दोन टप्प्यात काम करणार असून ही स्कीम संपूर्ण राज्यात लागू करणार आहोत. यामध्ये ट्रेन्ड मेडीकल ॲटेंडेंट हा ॲम्ब्युलन्समध्ये असणार आहे. ही ॲम्ब्युलन्स टोटल इक्यूप असणार

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुरेश शेट्टी....

आहे. गुजरात, आंध्रप्रदेश, गोवा या राज्यात ही स्कीम राबविली जात आहे. त्या राज्यांनी जे केले, ते या राज्यात करण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत. समजा हायवेवर अपघात झाला, अन्य ठिकाणी अपघात झाला, जनरल मेडीकल केस झाली, कुठे वृक्ष पडला, एखादी हार्ट ॲटॅकची केस असेल, या गोष्टींसाठी आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी 108 नंबर वर दूरध्वनी केल्यानंतर तेथे ही मोबाईल ॲम्ब्युलन्स त्या जागेवर दहा ते पंधरा मिनिटात पोहचेल. यासंबंधीचे को-ऑर्डिनेशन आणि कंट्रोल रुम पुणे येथे करण्याचा निर्णय घेतला आहे. फायर ब्रिगेड आणि महाराष्ट्र पोलीसांसोबत आम्ही ही स्कीम राबविणार आहोत. अपघाताची केस असेल, लिगल मेडिको केस असेल, अशा वेळी पोलिसांची आरोग्य विभागास निश्चितपणे मदत लागेल. पोलिसांना सोबत घेऊन ज्वॉईंट कंट्रोल रुम पुणे येथे सेटअप करणार आहोत. राज्यातील जनतेसाठी 15 ते 20 मिनिटात मोबाईल व्हॅन त्या ठिकाणी पोहचेल अशी व्यवस्था या सुवर्ण महोत्सवी वर्षापासून सुरु करीत आहोत. या मोबाईल व्हॅन खरेदी संबंधी टेंडर प्रक्रियेची प्रोसेस सुरु झालेली आहे. येत्या 15 ते 20 दिवसात या संदर्भात पेपरात जाहिरात येणार आहे. त्या संबंधी टेंडर प्राप्त झाल्यानंतर त्याची शॉर्ट लिस्टींग करुन लवकरात लवकर संपूर्ण राज्यात दोन टप्प्यात म्हणजे पुढील वर्षाच्या अखेरपर्यंत ॲम्ब्युलन्स सर्व्हीस सेवा देण्याचा आपण निर्णय घेतला आहे.

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी......

यावर खूप काम झाले असून टेंडर प्रोसेस पूर्ण झाल्यानंतर त्याच्या उद्घाटनाचा कार्यक्रम संपन्न होईल.

सभापती महोदय, एनआरएचएम कार्यक्रमाबद्दल बोलत असताना अनेक माननीय सदस्यांनी सांगितले की, औषध उपलब्ध नाही, निधी नाही असे डॉक्टर सांगतात. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, 2010 च्या हिवाळी अधिवेशन काळात विदर्भातील सर्व जिल्हयांमध्ये एनआरएचएम कार्यक्रम आणि सार्वजनिक आरोग्य सेवेच्या संदर्भात बैठक घेतली होती. या बैठकीला विदर्भातील सर्व आमदारांना बोलावून एकत्रितपणे चर्चा केली होती. केंद्र शासनाकडून मोठया प्रमाणात राज्याला निधी उपलब्ध करुन दिला जातो. त्या बैठकीत असे ठरले की, पालकमंत्री आणि त्या त्या जिल्हयातील सर्व आमदारांना विश्वासात घेऊनच त्या जिल्हयात एनआरएचएम कार्यक्रम राबविला पाहिजे. आता तर केंद्र शासनाने आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे. केंद्र सरकारने अशी भूमिका घेतली आहे की, त्या त्या जिल्हयातील सर्व खासदारांना सुध्दा या कार्यक्रमाच्या मॉनिटरिंगमध्ये समाविष्ट करुन घ्यावे. ही भूमिका अत्यंत चांगली आहे. लोकप्रतिनिधी मग ते खासदार असोत, आमदार असोत की जिल्हा परिषद सदस्य असोत, सर्वांनी एकत्र येऊन आपल्या जिल्हयातील आरोग्य सेवेसाठी केंद्र व राज्य सरकारकडून जो निधी उपलब्ध करुन दिला जात आहे त्याचा विनियोग योग्य प्रकारे होतो की नाही, सामान्य जनतेला योग्य प्रकारे आरोग्य सेवा मिळते की नाही याचे मॉनिटरिंग करावे. लोकांनी त्यांना विश्वासाने निवडून दिले आहे, त्यांना या आरोग्य सेवेचे मॉनिटरिंग करण्याची संधी मिळणार आहे. केंद्र सरकारने हे जे नवीन धोरण स्वीकारले आहे त्याचे मी स्वागत करतो.

सभापती महोदय, मी सभागृहाला सांगू इच्छितो की, प्रत्येक गावात रुग्ण कल्याण समिति स्थापन करण्याचे ठरले आहे. प्रत्येक गावात एक युनिफाईड फंड असावा यासाठी 10 हजार रुपये उपलब्ध करुन दिले आहेत. प्रत्येक गावात 10 हजार रुपये आकस्मिक खर्चासाठी उपलब्ध आहेत याची अनेकांना माहिती नाही. एखादा अपघात झाला, एखाद्या महिलेचे बाळंतपण असेल आणि ॲम्ब्युलन्स उपलब्ध नसेल तर भाड्याने ॲम्ब्युलन्सची व्यवस्था करण्यासाठी या फंडाचा वापर करता येईल. त्या गावात महत्वाची औषधे नसतील, छोटे मोठे इक्वीपमेंट नसेल, उपकेंद्राची किरकोळ दुरुस्ती करावयाची असेल तर मंजुरीसाठी मंत्रालयापर्यंत किंवा संचालकापर्यंत जाण्याची गरज

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी......

नाही. या 10 हजार रुपयांच्या निधीमधून खर्च करता येईल. या निधीचा विनियोग योग्य प्रकारे होतो की नाही याचे मॉनिटरिंग करण्याची जबाबदारी लोकप्रतिनिधींनी स्वीकारली पाहिजे. केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून गावात 10 हजार रुपयांचा निधी आकस्मिक खर्चासाठी उपलब्ध आहे याची गावातील लोकांना माहिती नसते, माहिती असेल तर चांगली गोष्ट आहे. संपूर्ण राज्यात एनआरएचएम योजनेच्या माध्यमातून आकस्मिक खर्चासाठी उपकेंद्राच्या पातळीवर 20 हजार रुपये उपलब्ध करुन दिले आहेत. प्रा.आ.केंद्र स्तरावर 1.75 लाख रुपये, ग्रामीण रुग्णालय स्तरावर 2.5 लाख रुपये आणि जिल्हा रुग्णालय स्तरावर 5 लाख रुपये आकस्मिक निधी उपलब्ध करुन दिला आहे. औषधे कमी असतील, इक्वीपमेंट कमी पडत असतील, किरकोळ दुरुस्ती करावयाची असेल तर डॉक्टरांना सबब सांगता येणार नाही. त्यांचे हे कर्तव्य आहे की, या निधीतून औषधे खरेदी करुन ती रुग्णांना उपलब्ध करुन देता द्यावी. ही रक्कम पुरेशी आहे. रुग्णांकडून सांगितले जाते की, प्रा.आ.केंद्रामध्ये औषधे उपलब्ध नाहीत, उपकेंद्रामध्ये औषधे उपलब्ध नाहीत, ॲम्ब्युलन्स उपलब्ध नाही. यापुढे ॲम्ब्युलन्स उपलब्ध नसेल तर भाड्याने घेऊन रुग्णांना गावातून ग्रामीण रुग्णालयात नेण्यासाठी या निधीचा वापर करता येईल.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी कॉम्प्युटरायझेशनचा मुद्दा उपस्थित केला होता.

नंतर जे.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी .........

आपण एक वर्षापूर्वीच हा कार्यक्रम हाती घेतला आहे. तसेच टेलि मेडिसीनच्या कार्यक्रमाचे सुध्दा ऑलरेडी एक वर्षापासून काम सुरु केले आहे. राज्यातील 23 जिल्हा रुग्णालयांमध्ये ऑलरेडी एक्झिास्टिंग असून 30 रुग्णालयांमध्ये सन 2011-12 मध्ये सुरु होणार आहे. यात जे.जे. हॉस्पिटल, के.ई.एम. हॉस्पिटल, जी.एम.सी., पुणे, औरंगाबाद व नागपूर तसेच प्रायव्हेटमधील नानावटी अशा हॉस्पिटल्सना आपण स्पेशल नोड दिली आहे, अशा प्रकारे ऑलरेडी राज्यात हा कार्यक्रम हाती घेतला आहे. त्याचा फायदा ग्रामीण भागात मिळणार आहे. त्यानुसार आपण या कार्यक्रमासाठी 2.60 कोटी एवढी रक्कम दिली असून सन 2009-10 मध्ये 3600 रुग्णांना तसेच सन 2010-11 मध्ये राज्यातील 3856 रुग्णांना फायदा झाला आहे.

महोदय, राज्यातील हॉस्पिटल्समध्ये डॉक्टर्स व इतर स्टाफ हजर नसतो अशा तक्रारी येथे करण्यात आल्या तसेच वारंवार तक्रारी होत असतात म्हणून अशा हॉस्पिटल्समध्ये बायोमेट्रिक पध्दती सुरु करण्याची सूचना करण्यात आली. त्या अनुषंगाने मी सभागृहाला माहिती देऊ इच्छितो की, सन 2010-11 मध्ये मुख्यालय, आरोग्य भवन तसेच उप संचालक (आरोग्य) या कार्यालयांमध्ये आपण बायोमेट्रिक सिस्टम सुरु केली आहे. त्यानंतर राज्यातील संपूर्ण जिल्हा रुग्णालयांमध्ये ही पध्दती आपण टप्प्या टप्प्याने सुरु करणार आहोत. त्यातील काही ठिकाणी काम सुरु करण्यात आले असून सन 2011-12 च्या अखेरपर्यंत संपूर्ण पीएचसी लेव्हलपर्यंत ही बायोमेट्रिक पध्दती सुरु करण्यात येईल व आरोग्य कर्मचाऱ्यांना आपली उपस्थिती बायोमेट्रिक नुसार लावावी लागेल.

यानंतर ई-गव्हर्नन्स संबंधीचा मुद्दा देखील सभागृहात उपस्थित झाला आहे. त्याबाबत मला असे सांगावयाचे आहे की, आपल्या राज्यात ऑलरेडी केंद्र शासनाची हेल्थ मॅनेजमेंट इन्फॉर्मेशन सिस्टम लागू केली आहे. तसेच मदर-ए-चाईल्ड ट्रॅकिंग सिस्टम हा कार्यक्रम राज्यात आपण पायलट बेसिसवर सुरु केला असून तो संपूर्ण राज्यात राबविण्याचा शासनाचा विचार आहे. त्या कार्यक्रमाचे काम सुरु झाले आहे. तसेच हेल्थ फॅसिलिटी जी राज्यात सुरु झालेली आहे त्याचे मॅपिंगचे काम ऑलरेडी हाती घेतले असून गाव पातळीवर काम करणाऱ्या हेल्थ वर्कर्सची रिक्रुटमेंट, ट्रेनिंग, परफॉर्मन्स आणि मॉनिटरिंग या गोष्टींचे संपूर्ण कम्प्युटरायझेशन करण्याची प्रोसेस शासनाने सुरु केली आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी ........

महोदय, जिल्हा पातळीपर्यंत शासनाने बल्क एसएमएस सिस्टम सुरु केली असून देशात जी डॉकुमेंट जर्नी मॅनेजमेंट सिस्टम सुरु आहे ती राज्यात देखील इम्प्लीमेंट करण्याचा शासनाचा विचार आहे. त्या माध्यमातून कॉन्ट्रॅक्च्युअल स्टाफ सॉफ्टवेअर सुध्दा आपण सुरु करणार आहोत. अशा प्रकारे आपण जे औषध सांगतो त्याचे ऑडिट आणि इन्व्हन्ट्री यासाठी आपण हे सॉफ्टवेअर घेतले आहे. त्याचा परिणाम म्हणून We will put it in place right upto PHC level, अशा प्रकारे आपण या औषधांची इन्व्हन्ट्री आणि ऑडिट आरोग्य भवनात तसेच मंत्रालयात बसून करु शकू. त्यातून आपल्याला कळेल की, राज्यातील कोणत्या पीएचसी मध्ये किती औषधे उपलब्ध आहेत व किती औषधांची कमी आहे. तसेच त्याचबरोबर राज्यातील कोणत्या हॉस्पिटलमध्ये किंवा पीएचसी मध्ये किती इक्विपमेंट्स आहेत यासाठी एक नवीन इक्विपमेंट इन्व्हन्ट्री आणि ऑडिट सॉफ्टवेअर देखील भविष्यात राज्यात लागू करणार आहोत.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी...

सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण राज्य मंत्र्यांनासुध्दा उत्तर द्यावयाचे असल्यामुळे मी पाच मिनिटांमध्ये माझे भाषण संपविणार आहे. जीवनदायी योजना संपूर्ण राज्यात राबविण्यात येत असून जीवनदायी योजनेमार्फत 825 लहान मुलांवर व मोठया व्यक्तींवर हृदय शस्त्रक्रिया करण्याचे बाकी होते असे नागपूर अधिवेशनामध्ये विदर्भातील सन्माननीय सदस्यांनी सांगितले होते. त्या संबंधी वर्तमानपत्रात बातमी प्रसिध्द झाली होती. त्यावेळी राज्य शासनाने नागपूर अधिवेशनामध्ये एक धोरणात्मक निर्णय घेतला होता. या कार्यक्रमाचा स्पेशल ड्राईव्ह घेतला होता आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी नागपूरमध्ये त्याचे उद्घाटनसुध्दा केले होते .मी अतिशय आनंदाने सांगू इच्छितो की 825 पैकी 551 हृदय शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आल्या असून गोदिंया जिल्हयातील एका लहान मुलीची फक्त कॅज्युअल्टी झाली होती.तिची अवस्था फार क्रिटीकल होती त्यामुळे मुंबईच्या जे.जे. हॉस्पिटलमध्ये तिचे ऑपरेशन करण्याचा प्रयत्न केला होता परतु ती शस्त्रक्रिया यशस्वी होऊ शकली नाही हे मी अतिशय दु:खाने सांगू इच्छितो 274 पेशंटसवर ऑपरेशन करण्याचे राहिलेले आहे त्यातील काही ट्रेसेबल नाहीत. त्या संदर्भात त्यांच्या नावासह वर्तमानपत्रात जाहिरात देखील देण्यात आली होती पंरतु ते ट्रेसेबल नाहीत. काही जणांचे वय जास्त असल्यामुळे आम्हाला ऑपरेशन करावयाचे नाही असे त्यांनी स्वत: होऊन सांगितले आहे. तीन महिन्यामध्ये 551 हृदयावर यशस्वीपणे शस्त्रक्रिया करण्यात आला असून हा एक रेकॉर्ड आहे.संपूर्ण राज्यात प्रथम इतक्या मोठया प्रमाणावर चांगल्या आणि यशस्वी शस्त्रक्रिया झाल्या होत्या हे मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो.

सभापती महोदय, नवीन जीवनदायी योजनेच्या संदर्भात शासनाने मध्यंतरी घोषणा केली होती त्याबाबतीत मी आपल्याला सांगू इच्छितो की, एक लाख रुपयापेक्षा कमी उत्पन्न असलेल्या व्यक्तींना नवीन जीवनदायी लागू करणार असून तामिळनाडू, आंध्र आणि केरळ राज्यांनी जी योजना राबवली होती त्या योजनेच्या धर्तीवर आपल्या राज्यात राजीव गांधी जीवनदायी योजना लागू करण्यासंबंधी शासनाने घोषणा केली होती. त्यासाठी गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये 250 कोटी रुपयांची तरतूद केली होती. त्याकरिता ट्रस्ट स्थापन करण्याबाबत कॅबिनेटमध्ये निर्णय घेण्यात आला होता त्यामुळे आता ट्रस्टच्या फॉर्मेशनचे काम सुरु आहे.त्या ट्रस्टसाठी एक सीईओची नेमणूक करण्यासंबंधी देखील कॅबिनेटने निर्णय घेतला असून ते काम सुध्दा प्रोसेसमध्ये

2..

श्री.सुरेश शेट्टी...

आहे. मधल्या काळात सरकार बदलले गेले आणि राज्यामध्ये नवीन मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री आले.तेव्हा या अगोदर जे डिसीजन घेण्यात आले होते ते रिव्हयू करण्यात आले होते.

या योजनेसाठी अगोदर सात जिल्हे निवडले होते त्यामध्ये मुंबईच्या 2 जिल्हयांचा समावेश करण्यात येणार आहे अशी माननीय मुख्यमंत्र्यांनी पंधरा दिवसापूर्वी विधान सभेत घोषणा केली होती. सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांना सांगू इच्छितो की आपल्या जिल्हयाचा देखील या योजनेमध्ये समावेश करण्यात आला आहे. त्याप्रमाणे या सर्व जिल्हयांमध्ये राजीव गांधी जीवनदायी योजना लागू करण्यात येणार आहे. टेंडर प्रोसेसचे काम आणि इन्फ्रास्ट्रक्चरचे काम पूर्ण होऊन जास्तीत जास्त 2 ऑक्टोबर पर्यत योजना आपल्या राज्यात लागू करण्यात येणार आहे.त्यामध्ये एक लाख रुपयापेक्षा कमी उत्पन्न असलेली जी कुटुंबे आहेत त्यांना फॅमिली हेल्थ कार्ड देण्यात येणार आहेत .त्यांच्या सपूर्ण कुटुंबासाठी 940 शस्त्रक्रियांचा समावेश या योजनेमध्ये करण्यात आला आहे. त्यात दहा दिवसांचे हॉस्पिटलचे वास्तव्य, शस्त्रक्रियांचा खर्च,औषधांचा खर्च, जेवणाचा खर्च आणि फॉलो अप इत्यादीचा समावेश करण्यात आला आहे. एक क्रांतिकारक निर्णय माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री यांनी घेतला असून त्याचे काम लवकरच सुरु होईल. यासाठी टेंडरची प्रोसेस पूर्ण होऊन 2 ऑक्टोबर पासून ही योजना सुरु होईल अशी माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषित केले होते त्यानुसार त्या ताराखेला ही योजना सुरु करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

सभापती महोदय, या चर्चेच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांनी वैयक्तिक आणि सामूहिक स्वरुपाचे जे मुद्दे मांडले आहेत ते सर्व मुद्दे मी लिहून घेतलेले आहेत. या ठिकाणी उत्तर देण्याकरिता पुरेसा वेळ नसल्यामुळे त्या मुद्याबाबत मी ंस्वत: त्यांना वैयक्तिक लेखी उत्तर पाठविणार आहे. शेवटी मी एवढेच सांगतो की, जे प्रेम आणि पाठिंबा आपण मला दिलेला आहे तो यापुढे सुध्दा द्यावा अशी माझी आपल्याकडून अपेक्षा आहे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी....

आरोग्य विभागामार्फत राज्यामध्ये ज्या काही योजना राबविल्या जात आहेत त्यामध्ये केंद्र सरकारच्या योजनांचाही समावेश आहे. या सर्व योजनांच्या अंमलबजावणीमध्ये आपणा सर्वांची मदत आणि पाठिंबा राज्य शासनाला मिळाला पाहिजे. माझ्या विभागामार्फत आरोग्याच्या सेवा पुरवीत असतांना जर काही चुकीचे काम झाले असेल किंवा काही शॉर्टफॉल झाला असेल तर ती बाब आपण माझ्या निदर्शनास आणून द्यावी अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो, जय महाराष्ट्र.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. डी.पी. सावंत (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे यांनी आरोग्याच्या प्रश्नासंबंधीचा ठराव मांडला. खरे म्हणजे या ठरावामधील विषय आरोग्य सेवेसंबंधीचा होता, परंतु माननीय आरोग्य मंत्री श्री. सुरेश शेट्टी साहेबांनी या ठरावामध्ये माझ्या वैद्यकीय शिक्षण विभागाचा देखील संबंध असल्याचे सांगितले आहे. सभापती महोदय, मी असे मानतो की, आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण विभाग या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. हँडींग ग्लोज अशाप्रकारे यामध्ये दोन्ही खात्यांचा संबंध आहे. त्यामुळे या सभागृहामध्ये उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांना उत्तरे देण्याची सामुदायिक जबाबदारी दोन्ही खात्यांची आहे. त्या अनुषंगाने माझ्या वैद्यकीय शिक्षण विभागाशी संबंधित असलेल्या प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, वाढती लोकसंख्या, वाढते विकार आणि वाढते व्हायरस या करिता आपण जेवढया आरोग्याच्या सुविधा पुरवीत आहोत तेवढया कमी पडत आहेत हे मी सुरुवातीला सांगतो. या बाबतीत जास्तीत जास्त उपाय योजना हाती घेऊन काही आजारांवर आपल्याला मात करता येईल यासाठी आपण सतत प्रयत्नशील असतो. मघाशी सांगितल्याप्रमाणे यामध्ये आरोग्य विभागाचा संबंध 70 टक्के आहे, आणि वैद्यकीय शिक्षण विभागाचा संबंध 30 टक्के आहे. त्यामुळे त्याप्रमाणे माझ्या वाटयाला उत्तर देण्यासाठी 30 टक्के वेळ आलेला आहे. मी सुरुवातीला सभागृहामध्ये उपस्थित नव्हतो, त्यामुळे मला विषय माहीत नव्हते. परंतु मी संपूर्ण रेकॉर्ड पाहिल्यानंतर त्या अनुषंगाने माझ्या विभागाशी संबंधित काही प्रश्न या ठिकाणी उपस्थित झाले आहेत. माझ्या विभागामधील रिक्त जागांचा ऊहापोह करण्यात आला असून यामध्ये प्रोफेसर, असिस्टंट प्रोफेसर, असोशिएट प्रोफेसर, टेक्निशियन यांच्या संदर्भातील जास्तीत जास्त प्रश्न विचारण्यात आले. मी आपणास सांगू इच्छितो की, डीएमइआर अंतर्गत प्रोफेसरची मंजूर पदे 327 होती, त्यापैकी 230 पदे भरली आणि 97 पदे रिक्त राहिली, असिस्टंट प्रोफेसरची 847 पदे मंजूर होती त्यापैकी 512 पदे भरण्यात आली आणि 335 पदे रिक्त राहिली, त्याचप्रमाणे लेक्चररची 1174 पदे मंजूर होती त्यापैकी 1021 पदे भरण्यात आली आणि 153 पदे रिक्त राहिली. टेक्निशियनची 2978 पदे मंजूर होती, त्यापैकी 2409 पदे भरण्यात आली आणि 569 पदे रिक्त राहिली, स्टाफ नर्सची मंजूर पदे 6424 होती, त्यापैकी 5755 पदे भरण्यात आली व 669 पदे रिक्त राहिली आहेत.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ ST/ D/

श्री.डी.पी. सावंत....

सभापती महोदय, मी आपणास सांगू इच्छितो की, एमपीएससीमार्फत प्रोफेसर आणि असिस्टंट प्रोफेसरची 2009 मध्ये 126 पदे भरण्यात आली असून ही पदे कार्यरत आहेत. याशिवाय डिपार्टमेंटल प्रमोशन कमिटीमार्फत 50 टक्के जागा भरण्याची प्रोसेस सुरु आहे. त्याचप्रमाणे एमपीएससीमार्फत लेक्चररची पदे भरण्याची प्रोसेस सुरु आहे. टेक्निशियनची पदे भरण्याबाबत दि.5.6.2010 रोजी शासन निर्णयानुसार निर्बंध घालण्यात आले होते, ते उठविण्यात आल्यानंतर ही पदे भरण्याची कार्यवाही सुरु होईल.

सभापती महोदय, औषध खरेदीच्या संदर्भात सांगू इच्छितो की, सन 2010-11 मध्ये मूळ अनुदान 73 कोटींचे ठेवण्यात आले होते. तरीही ही रक्कम कमी पडत आहे. मी मघाशी म्हटल्याप्रमाणे प्रत्येक वेळी कमी पडणारी रक्कम पुरवणी मागणीव्दारे आपण घेत असतो. अशाप्रकारे गेल्या वर्षी 59 कोटी रुपये पूरक मागणीव्दारे मान्य करुन घेण्यात आले. गेल्या तीन वर्षामध्ये जेवढी रक्कम स्पील होती तेवढी गेल्या वर्षी देण्याचा प्रयत्न झाला आणि या वर्षीपासून औषध खरेदी सुरु करण्यात आली. या करिता सन 2011-12 मध्ये 72.83 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ही तरतूद कमी पडत असल्यामुळे येणाऱ्या पुरवणी मागण्यांव्दारे विशेष तरतूद आपल्याला करावी लागणार आहे.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : सभागृहाच्या विशेष बैठकीची वेळ 11.30 वाजेपर्यन्त होती, सभागृहाची वेळ 5 मिनिटे वाढविण्यात येत आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, तसेच येणाऱ्या पुरवणी मागण्यांमध्ये देखील आणखी जी काही मागणी असेल ती पूर्ण केली जाईल. कोणत्याही हॉस्पिटलमध्ये कोणत्याही परिस्थितीमध्ये औषधांची कमतरता भासणार नाही एवढे मी या सदनाला सांगू इच्छितो.

सभापती महोदय, याठिकाणी उपकरणांच्या बाबतीत देखील चर्चा झाली.या विषयाबाबत सदनामध्ये दरवेळी प्रश्न विचारले जातात आणि आम्ही त्यासंबंधीची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो. एक गोष्ट खरी आहे की, जेव्हा आपण नवीन प्रोजेक्ट करतो त्यावेळी त्याकरता लागणारी जी मॅन पॉवर आहे, त्याबाबत संपूर्ण प्रोजेक्ट उभा केल्यानंतर विचार करतो. मात्र मॅन पॉवर उभी करण्यासाठी आपल्याला फायनान्स विभागाकडे जावे लागते. मग प्रत्येक वेळी विविध स्तरावर अडचणी येतात. आपण जेव्हा एखादा हॉस्पिटलचा किंवा मेडिकल कॉलेजचा प्रोजेक्ट उभा करण्याचे ठरवितो त्यावेळी मॅन पॉवरबाबत विचार करुन त्यासंबंधात प्लॅनिंग तयार केली पाहिजे.परंतु एखाद्या ठिकाणी हॉस्पिटल बांधून झाल्यावर मॅन पॉवर उपलब्ध होण्यासाठी वाट पहावी लागत असेल तर ती चुकीची गोष्ट आहे. म्हणून आम्ही परवाच्या दिवशी माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री यांच्या कानावर ही गोष्ट घातलेली आहे. त्यामुळे येणाऱ्या काही वर्षामध्ये जे काही नवीन प्रॉजेक्ट होतील त्यावेळी त्यात मॅन पॉवरच्या संबंधातील बाब सुध्दा समाविष्ट करुन संबंधित प्रोजेक्ट हाती घेण्यात येतील अशा प्रकारची व्यवस्था आपण करु शकतो.

सभापती महोदय,गेल्या काही दिवसांमध्ये वैद्यकीय शिक्षण मंत्री, मी स्वत: तसेच विभागाचे सचिव आणि संचालक या सर्वांना सोबत घेऊन शासन आपल्या दारी याप्रमाणे प्रत्येक मेडिकल कॉलेजला भेट देण्यास सुरुवात केलेली आहे. त्यानुसार लातूर, औरंगाबाद, नांदेड इ.मेडिकल कॉलेजेस्नां भेटी देण्यात आल्या आहेत आणि येत्या महिन्याभरामध्ये उर्वरित कॉलेजेस्नां भेटी देण्याचे कामही आम्ही पूर्ण करु.या भेटीअंतर्गत आम्ही त्या कॉलेजमधील विद्यार्थी, शिक्षक तसेच वर्ग-3 व वर्ग-4 मधील कर्मचारी,लोकप्रतिनिधी या सर्वांची वेगवेगळी बैठक घेऊन त्यांचे प्रश्न समजावून घेण्याचा या निमित्ताने प्रयत्न करीत आहोत. त्यातूनच काही प्रश्न पुढे आले.सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितले होते की,लातूर मेडिकल कॉलेजमधील आय.सी.यु.मध्ये एअर कंडीशन नाही. ही गोष्ट खरी आहे.आज याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.विक्रमजी काळे उपस्थित दिसत नाहीत.पण लातूर येथील भेट कशी फलद्रूप झाली याचे उदाहरण मी सदनाला सांगू इच्छितो.त्या ठिकाणी ताबडतोब माननीय मंत्री महोदयांनी आदेश दिले की, ए.सी. व इतर जी इक्वीपमेंटस् आहेत ती येत्या महिन्याभरामध्ये लातूर मेडिकल कॉलेजमधील आय.सी.यु. मध्ये .....

09-04-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) M-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.डी.पी.सावंत . . . .

बसतील. मला हे सांगितले पाहिजे की, जरुर या गोष्टीला उशीर झालेला आहे. परंतु आम्ही त्याठिकाणी भेट दिल्यानंतर या गोष्टी पुढे आल्या आणि त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे. अशा प्रकारे सगळ्याच मेडिकल कॉलेजेस मध्ये भेटी देण्याचा कार्यक्रम आम्ही हाती घेतलेला आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी काही स्पेसिफीक प्रश्न विचारलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते यांचे मी अभिनंदन करतो.कारण त्यांनी जे.जे. हॉस्पिटलमध्ये अतिशय चांगल्या प्रकारच्या सुविधा दिल्या जातात याबद्दल त्यांनी वाखाणणी केली आणि आम्हाला सर्टीफीकेटही दिले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. परंतु त्यांनी काही स्पेसिफीक प्रश्न उपस्थित केलेले आहेत की, दोन वरिष्ठ परिचारिकांनी हॉस्टेलमध्ये दहा रुम्स् ऑक्युपाय केलेल्या आहेत. यासंदर्भात माहिती घेऊन आपल्याला सांगू इच्छितो की, दोन वरिष्ठ परिचारिकांकडे 3 आणि 5 अशा एकूण 8 रुम्स् जादा आहेत. आम्ही यासंदर्भात कारवाई सुरु केलेली आहे. पीडब्ल्युडी च्या दराप्रमाणे त्यांच्याकडून जादा भाडे आकारण्यासाठी नोटीसेस देण्यात आलेल्या आहेत. तसेच त्या रुम्स् रिकाम्या करण्यासाठी एव्हीक्शनच्या नोटीसेस् सुध्दा दिलेल्या आहेत.

सभापती महोदय, याठिकाणी आता सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे उपस्थित नाहीत. परंतु त्यांनी सांगितले की, पेशंटच्या संबंधातील रेकॉर्ड ऑन लाईन असावयास पाहिजे. मी सदनाला सांगू इच्छितो की, हॉस्पिटल मॅनेजमेंट इन्फर्मेशन सिस्टीम (HMIS) या योजनेव्दारे वैद्यकीय शिक्षण विभागांतर्गत 19 रुग्णालयांचे संगणकीकरण करण्यासाठी 273 कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर केला असून तो शासनाच्या विचाराधीन आहे. त्यामध्ये जे.जे. हॉस्पिटल, ससून, औरंगाबाद मेडिकल कॉलेज आणि नागपूर मेडिकल कॉलेज या चार रुग्णालयांमध्ये ही सिस्टीम अगोदरच कार्यान्वित इ ालेली आहे. या चारही रुग्णालयामध्ये बाह्य रुग्ण विभागामध्ये रुग्णांची नोंद संगणकी प्रणालीवर करण्यात येते. त्यामध्ये त्यांना देण्यात येणारी औषधे तसेच रक्त, लघवी याच्या चाचण्या तसेच एक्स-रे इ.बाबी ऑन लाईन उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. याच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये सदर प्रकल्प हा सेंट जॉर्ज, कामा आणि जी.टी. रुग्णालयामध्ये सुरु करण्याचे प्रस्तावित आहे आणि हळूहळू सगळया 19 शासकीय वैद्यकीय हॉस्पिटलमध्ये एच.एम.आय.एस.च्या सुविधा पुरविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. मला असे वाटते की, माझ्या भाषणामध्ये मी जवळजवळ

. . . .एम-3





श्री.डी.पी.सावंत . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सगळयांचा गोष्टींचा उहापोह केलेला आहे. मला आनंद आहे की, या विषयाच्या निमित्ताने सदनामध्ये एक अतिशय चांगल्या प्रकारची चर्चा घडून आली.

यानंतर श्री.बरवड . . . .

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. डी. पी. सावंत ....

वैद्यकीय शिक्षण विभागाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर पहिल्यांदाच एवढी सखोल चर्चा झालेली आहे. मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या संदर्भात जे प्रश्न असतील त्या संदर्भात जरुर त्यांनी स्वत: भेटून आपल्या सूचना द्याव्यात. त्यावर तोडगा काढण्याचा प्रयत्न विभाग करील. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

**तालिका सभापती** ( श्री. मोहन जोशी ) : सभागृहाच्या कामकाजाची वेळ 2 मिनिटे वाढवून देण्यात येत आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, एका महत्वाच्या मुद्याबाबत उत्तर देण्याचे राहून गेले आहे ते मी एका मिनिटात सांगतो. चाईल्ड सेक्स रेश्यो,मेल-फिमेल आणि प्री कंसेप्शन ॲण्ड प्री नेटल डायग्नोस्टिक टेक्निक संबंधी मी सांगू इच्छितो की, या वर्षीच्या सेन्ससचे जे लेटेस्ट आकडे काही दिवसांपूर्वी आलेले आहेत त्यामध्ये चाईल्ड सेक्स रेश्योमध्ये मेल-फिमेलचा रेश्यो पूर्वी 1000 ला 913 होता तो आता 883 झालेला आहे. त्या संबंधी मी सभागृहाला सांगू इच्छितो की, प्री कंसेप्शन ॲण्ड प्री नेटल डायग्नोस्टिक टेक्निकचा जो कार्यक्रम आपण हाती घेतला त्यामध्ये आपण महाराष्ट्रात नवीन सुपरवायझरी बोर्डची स्थापना केलेली आहे आणि महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाचा सर्वात जास्त प्राथम्य दिलेला हा कार्यक्रम असेल. पुढच्या दहा पंधरा दिवसांमध्ये या संदर्भात दुसरी बैठक होणार आहे. या कायद्याची अंमलबजावणी आपण संपूर्ण राज्यामध्ये कशा पध्दतीने करणार आहोत त्या संबंधी आम्ही संपूर्ण प्रोटोकॉल तयार करणार आहोत. या कामाला प्रत्यक्षात सुरुवात झालेली आहे आणि 883 असा जो रेश्यो आहे त्यामध्ये कशी वाढ करावयाची या संबंधी चर्चा करुन योग्य ती पावले उचलणार आहोत.

**तालिका सभापती** : सभागृहाच्या कामकाजाची वेळ आणखी 3 मिनिटांनी वाढविण्यात येत आहे.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, या ठिकाणी आरोग्य सेवा सुधारण्याकरिता माननीय मंत्री महोदयांनी खूप चांगल्या योजना जाहीर केल्या आहेत. माननीय मंत्री महोदय हे नेहमीच प्रामाणिकपणे काम करण्याचा प्रयत्न करतात. इ-टेंडरींगचा जो विषय आहे त्या संदर्भात मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करीन की, आपण त्या बाबत ठाम आहात आणि त्या पध्दतीने औषध खरेदीच्या बाबतीत इ-टेंडरींग ठेवावयास पाहिजे. मधल्या काळामध्ये थोडे बिघडले असले तरी इ-टेंडरींग आपण ठेवावे. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, ह्युमन रिसोर्सेसचे शॉर्टेज आहे. मी ठाणे सिव्हिल हॉस्पिटलच्या बाबतीत सांगितले होते की, मॅट कोर्टाचा निर्णय आलेला आहे. आपण 64 लोकांची भरती केली. त्यांनी सहा महिने काम केले. दोन वर्षानंतर त्यांना अचानकपणे काढून टाकले. ती भरती नियमित होती. त्या लोकांच्या बाबतीत मॅटने निर्णय दिलेला आहे. तो निर्णय देऊन सुध्दा दोन महिने झालेले आहेत. त्यांना पुन्हा कामावर कधी घेणार ?

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/

श्री. संजय केळकर ...

त्याचप्रमाणे नेत्रदानाचा महत्वाचा विषय आहे. अशा प्रकारची यंत्रणा आपण प्रत्येक जिल्ह्यामध्ये उभी करणार का ? काही जिल्ह्यांमध्ये नेत्रदानाच्या संदर्भामध्ये यंत्रणा आहे. अनेक लोक नेत्रदान करण्यासाठी तयार आहेत. तशी यंत्रणा शासन उभी करणार का ? या वर्षी 550 कोटी रुपयांचे बजेट आहे. त्या अनुषंगाने आपण चांगल्या योजना जाहीर केलेल्या आहेत. आधीच्या माननीय आरोग्य मंत्र्यांनी ठाण्याला महिलांसाठी 100 बेडचे रुग्णालय बांधण्याचे जाहीर केले होते. या संदर्भात मी आपल्याला ज्या तीन चार गोष्टी सांगितल्या त्या बाबत माननीय मंत्री महोदयांनी काही सांगितले तर त्याचा उपयोग होईल्.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी अतिशय चांगल्या प्रकारचे उत्तर दिलेले आहे. आमची जी एक मागणी सातत्याने आहे त्या प्रमाणे आमच्या राष्ट्रीय महामार्गावर कणकवली येथे ट्रॉमा सेंटर युनिट देणार का ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, या बाबत मी सजेशन फॉर ॲक्शन असे म्हणणार होतो पण सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली हे अनेक दिवसांपासून या बाबत आग्रह करीत आहेत. या वर्षी ते ट्रॉमा सेंटर पूर्ण करण्याचा प्रयत्न करु.

**तालिका सभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक सकाळी 11.45 वाजता भरेल.

( सभागृहाची बैठक सकाळी 11.39 ते 11.45 वाजेपर्यंत स्थगित झाली )

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी**

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.मनिष जैन यांनी अल्पसंख्याक समाजातील मुस्लिम, ख्रिश्चन, पारसी, शीख व जैन यांच्या विकासाच्या योजनांची अंमलबजावणी दिरंगाईने होणे, त्यांना लोकसंख्येच्या प्रमाणात शाळा देण्यात न येणे, त्यांच्या वस्त्यांमध्ये मूलभूत सुविधांचा असलेला अभाव, त्यांचा मंजूर झालेला निधी व्यपगत होणे, भिवंडीत दंगलीत बाधित अल्पसंख्याकांना लोकांना आश्वासन देऊनही घरे न मिळणे व वक्फ बोर्डाच्या मिळकतीच्या सर्वेक्षणाच्या निर्णयाची अंमलबजावणी न होणे या विषयावर आजच्या कामकाज पत्रिकेवरील कामकाज स्थगित करण्यासाठी नियम 289 अन्वये सूचना दिलेली आहे. या बाबतीत सन्माननीय सदस्यांना आपले म्हणणे मांडावयाचे असल्यास त्यांनी थोडक्यात म्हणणे मांडावे. त्यानंतर मी या सूचनेवरील माझा निर्णय देईन.

श्री.मनिष जैन : सभापती महोदय, अल्संख्याकांमध्ये मुस्लिम, ख्रिश्चन, पारसी, शीख व जैन आहेत. या समाजाला मागील काळामध्ये शासनाने अल्पसंख्याक म्हणून घोषित केलेले आहे. शासनाने याला मंजुरी दिलेली आहे. या संदर्भातील अधिसूचना ऑक्टोबर, 2000 मध्ये निर्गमित झ ाली आहे, तरी देखील या निर्णयाची अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे शासनाच्या ज्या योजना आहेत त्या योजनांचा या अल्पसंख्याक समाजातील या घटकांना फायदा मिळत नाही. या घटकाच्या मुलांना शाळेतील स्कॉलरशीपच्या फायद्यापासून वंचित रहावे लागते. शाळेमध्ये कोणतीही शैक्षणिक सवलत मिळत नाही. मुस्लिम समाजातील विद्यार्थ्यांना मदरसामध्ये शिक्षण घेण्यासाठी जावे लागते. त्यामुळे ते चांगल्या दर्जाचे शिक्षण घेऊ शकत नाहीत. या अल्पसंख्याक समाजाला मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी शासनाने या अधिसूचनेची परिणामकारक अंमलबजावणी करावी. शासनाने या संदर्भातील कायदा मंजूर केलेला असताना त्याची अंमलबजावणी होण्यासाठी दिरंगाई का होत आहे, मुस्लिम, ख्रिश्चन, पारसी, शीख व जैन आहेत या समाजाला अल्पसंख्याक समाजाचा दर्जा दिलेला आहे आणि तो या समाजाचा हक्क आहे. त्याची पूर्तता शासनाने लवकरात लवकर करावी व त्यासाठी योग्य ती पावले उचलावीत अशी विनंती करतो.

2....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : नियम स्थगित करण्याच्या संदर्भात मे.कौल आणि शकधर यांच्या "प्रॅक्टिस ॲण्ड प्रोसिजर ऑफ पार्लमेण्ट" या ग्रंथात नमूद केल्या प्रमाणे कामकाज स्थगित करण्यासाठी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमांत एखादा विशिष्ट असा प्रस्ताव सभागृहासमोर असणे आवश्यक आहे तरच तो विचारात घेण्यासाठी कामकाज स्थगित करण्यासंबंधात विचार करता येईल. सन्माननीय सदस्य श्री.मनिष जैन यांनी नियम 289 अन्वये उपस्थित केलेल्या विषया संदर्भात आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेवर समाविष्ट असलेल्या कोणत्याही बाबी संबंधात सर्व कामकाज स्थगित करण्याबाबात प्रस्तुत सूचनेद्वारे सन्माननीय सदस्यांनी दिलेला प्रस्ताव समाविष्ट नाही. त्यामुळे नियम 289 च्या उपरोक्त सूचनेस मी अनुमती नाकारीत आहे. तथापि, अल्पसंख्याकांच्या विकासाच्या दृष्टीने सन्माननीय सदस्यांना हा विषय अन्य मार्गाने उपस्थित करुन चर्चा करता येईल.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ D/

**नियम 93 च्या सूचना**

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील, यांनी "पेण, जिल्हा रायगड येथील तालुका कृषी अधिकारी श्री.अशोक चव्हाण यांनी दि.6 एप्रिल, 2011 रोजी कार्यालयातील महिला कर्मचाऱ्यांबाबत अश्लील उद्गार काढून त्यांचा विनयभंग केला, या तक्रारीची पोलीस ठाण्यात नोंद केल्यावर श्री.अशोक चव्हाण फरार होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ ST/ D/ पूर्वी श्री. खंदारे 11:50

उप सभापती....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, धनंजय मुंडे व संजय केळकर यांनी "डोंबिवलीत औद्योगिक क्षेत्र भूखंडावरील असलेल्या सदनिकांत राहणा-या लाखो रहिवाशांना प्रशासनाने दिनांक 31 मार्च, 2011 रोजी पाठविलेली नोटीस, नोटीस काढण्याआधी रहिवाशी यांच्या समवेत विचारविनिमय न करता प्रशासनाने एकतर्फी वाढविलेल्या ट्रान्स्फर फी बाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे व धनंजय मुंडे यांनी "कोल्हापूर शिवाजी विद्यापीठाची रिक्त पदे भरण्याबाबत तसेच विद्यापीठाला वेतन अनुदान देण्याचा निर्णय देण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

09-04-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) P-2

**पृ.शी.**: अलमट्टी धरणाची उंची वाढविल्यामुळे महाराष्ट्रात निर्माण होणारी पूर परिस्थिती

**मु.शी.**: अलमट्टी धरणाची उंची वाढविल्यामुळे महाराष्ट्रात निर्माण होणारी पूर परिस्थिती या विषयावर श्री. दिवाकर रावते,वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यास अनुलक्षून माननीय जलसंपदा (कृष्णाखोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्र्यांचे निवेदन

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर (जलसंपदा (कृष्णाखोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री): सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी "अलमट्टी धरणाची उंची वाढविल्यामुळे महाराष्ट्रात निर्माण होणारी पूर परिस्थिती" या विषयासंबंधी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यास अनुलक्षून मी पुढील निवेदन करीत आहे.

(प्रेस: येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ ST/ D/ पूर्वी श्री. खंदारे 11:50

**पृ.शी.** : नागपूर रेल्वे स्टेशनच्या गुड्स शेडमध्ये उतरविलेल्या तांदळामध्ये गिट्टी व माती मिसळल्यामुळे तो तांदूळ स्वीकारण्यास जिल्हा पुरवठा अधिका-याने दिलेला नकार

**मु.शी.** :नागपूर रेल्वे स्टेशनच्या गुड्स शेडमध्ये उतरविलेल्या तांदळामध्ये गिट्टी व माती मिसळल्यामुळे तो तांदूळ स्वीकारण्यास जिल्हा पुरवठा अधिका-याने दिलेला नकार याबाबत सर्वश्री केशवराव मानकर, पांडुरंग फुंडकर, श्रीमती शोभा पडणवीस, सर्वश्री संजय केळकर, धनंजय मुंडे व सय्यद पाशा पटेल, वि.प.स.यांनी नियम 93अन्वये दिलेली सूचना

श्री. रणजित कांबळे (अन्न व नागरी पुरवठा राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री केशवराव मानकर, पांडुरंग फुंडकर, श्रीमती शोभा फडणवीस, सर्वश्री संजय केळकर, धनंजय मुंडे व सय्यद पाशा पटेल यांनी "नागपूर रेल्वे स्टेशनच्या गुड्स शेडमध्ये उतरविलेल्या तांदळामध्ये गिट्टी व माती मिसळल्यामुळे तो तांदूळ स्वीकारण्यास जिल्हा पुरवठा अधिका-याने दिलेला नकार या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर : अतिशयम महत्वाच्या मुद्याकडे मी शासनाचे लक्ष वेधलेले आहे. करनाल, हरियाणा येथून तांदळाची जी एक रेक आली त्यामध्ये निकृष्ट दर्जाच्या बो-या असल्यामुळे त्या फाटून तांदूळ खाली पडला. त्या ठिकाणी ताडपत्री टाकलेली होती असे निवेदनामध्ये नमूद केलेले आहे. ती ताडपत्री किती मोठी होती ? त्या ठिकाणी उतरविलेल्या तांदळामध्ये मोठ्या प्रमाणावर गिट्टी आणि माती मिसळलेली असून हाच तांदूळ लोकांना खाण्यासाठी दिला जाणार आहे. तेव्हा गिट्टी आणि माती मिश्रित तांदूळ लोकांना खाण्यासाठी न देता चांगला तांदूळ लोकांना खाण्यासाठी दिला पाहिजे. माती आणि गिट्टी मिसळल्यामुळे किती प्रमाणात तांदूळ खराब झालेला आहे, तसेच हा तांदूळ लोकांना खाण्यासाठी दिला जाणार नाही याची दक्षता घेण्यात येईल काय ?

श्री. रणजित कांबळे : जेव्हा रेल्वे वॅगन मधून माल अनलोड केला जातो त्यावेळी इण्डिपेण्डण्ट कोऑर्डिनेशन सर्टिफिकेशन स्क्वॉड असते. 21 मार्च 2011 रोजी माल अनलोड झाला त्यावेळी हे स्क्वाड तेथे होते आणि श्री. व्ही.एस.सोनारघरे, श्री. एच.ए.वरुडकर आणि श्री. आर.पी.नायडू हे भारतीय अन्न महामंडळाचे तीन अधिकारी उपस्थित होते. हा माल उतरवित असताना निश्चितपणे काही माल खाली पडतो. हा खाली पडलेला माल आपण वेगळा ठेवतो. चांगला माल हा पोत्यामध्ये असतो. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे सन 2011-12 या वर्षासाठी विदर्भातील जनतेकरिता हा तांदूळ आलेला असला तरी मी त्यांना सांगू इच्छितो की, ज्यावेळी आम्ही कोणताही माल घेतो तो माल सॅम्पल आणि टेस्टिंग करुनच घेतो. यावेळी देखील माल घेताना अधिक काळजी आम्ही घेणार आहोत.

श्री. केशवराव मानकर : तांदूळ अनलोड करतानाच तो मोठ्या प्रमाणावर खाली पडलेला असल्यामुळे त्या तांदळामध्ये माती आणि गिट्टी मिसळलेली आहे. निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की तांदूळ उतरवून घेताना तीन अधिकारी उपस्थित होते. परंतु माझ्या माहिती प्रमाणे प्रत्यक्षात तेथे कोणीही अधिकारी उपस्थित नव्हते. तेव्हा या प्रकाराची आपण चौकशी करणार आहात काय ?

श्री. रणजित कांबळे : एफसीआयचे अधिकारी हे केन्द्र शासनाचे अधिकारी आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे आपण केन्द्र शासनाकडे निश्चितपणे मागणी करु शकतो आणि तशी ती करण्यात येईल.

----

...5..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>लक्षवेधी सूचना क्रमांक 1 व 2 संबंधी</u>**

**उप सभापती** : लक्षवेधी सूचना क्रमांक 1 व 2 पुढे ढकण्यात आलेल्या आहेत.

----

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मु.हतडी.(ता.परतूर,जि.जालना) येथील रुख्साना नावाच्या अल्पवयीन मुलीवर सरपंच,पोलीस पाटील यांनी बलात्कार करुन तिचा केलेला अग्निसंस्कार

**पृ.शी.**: मु.हतडी.(ता.परतूर,जि.जालना) येथील रुख्साना नामक अल्पवयीन मुलीवर सरपंच,पोलीस पाटील यांनी बलात्कार करुन तिचा केलेला अग्निसंस्कार या संबंधी सर्वश्री हुसेन दलवाई व राजन तेली, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. राजन तेली (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृहमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" "दिनांक ५ मार्च, २०११ रोजी वा त्या सुमारास मु.हतडी, ता.परतुर,जि.जालना येथील रुख्साना नामक एका अल्पवयीन मुलीवर गावचे सरपंच, पोलीस पाटील व इतर गाववाल्यांनी केलेला सामूहिक बलात्कार, तक्रार केली असता पोलिसांनी पोस्ट मॉर्टम करण्याऐवजी बलात्कार करणाऱ्यांची मदत व्हावी म्हणून ती मुस्लीम असूनही तिच्या नेसत्या कपड्यांसहित तिला अग्निसंस्कार देऊन पुरावा नष्ट करणे, हतडी गावात मुस्लिमांची चारच घरे असल्यामुळे बाधीत मुलीच्या वडिलांना धमकी देऊन निर्माण केलेली दहशत, हतडी गाव व परिसरातील अल्पसंख्याक जनतेमध्ये निर्माण झालेले भयाचे व दहशतीचे वातावरण, शासनस्तरावरुन प्रकरणाचे गांभीर्य ओळखून विनाविलंब घ्यावयाची दखल, केलेली कारवाई व शासनाची भूमिका."

श्री. आर.आर.पाटील ( गृहमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेतील विषय अतिशय गंभीर आहे. मुस्लीम समाजाच्या एका युवतीवर बलात्कार करुन तिची हत्या झाली व त्या नंतर त्या युवतीचा अत्यंसंस्कार करण्यात आला. सरपंच आणि पोलीस पाटील या प्रकरणात सहभागी आहेत. त्यामुळे त्या परिसरामध्ये प्रचंड चीड निर्माण झाली आहे. या प्रकरणासंदर्भात संबंधितांवर कडक कारवाई करावी अशा प्रकारची विनंती त्या ठिकाणच्या ग्रामस्थांनी तसेच मुस्लीम बांधव करीत आहेत. त्या गावात फक्त पाचच मुस्लिमांची घरे आहेत. म्हणून शासनाने या प्रकरणी संबंधितांवर कडक कारवाई व्हावी म्हणून मी लक्षवेधी सूचना सभागृहात मांडलेली आहे. या प्रकारणात किती लोकांना अटक झालेली आहे ? संबंधितांवर कोणकोणती कलमे लावून कारवाई केलेली आहे ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, या संपूर्ण घटनेची स्थानिक पोलीस स्टेशनने चौकशी केलेली आहे. त्या मुलीचा मृत्यू दिनांक 5.3.2011 रोजी सर्पदंशाने झाल्याचे स्पष्ट झाले आहे. त्याच बरोबर या मुलीच्या कुटुंबातील किंवा त्या गावातील कोणाचीही तक्रार नाही. जनावरांची खरेदी विक्री करणाऱ्या एका बाहेरच्या माणसाने ऐकीव माहितीच्या आधारे पोलिसांकडे ही तक्रार केली आहे. या प्रकरणी पोलिसांनी खोलात जाऊन तपास केल्यानंतरसुध्दा ना घरच्यांची ना गावातील कोणाचीही तक्रार नाही. पण या प्रकरणाची पोलिसांनी चौकशी केली असली तरी त्या बाबतीत माझे समाधान झालेले नाही. ती मुलगी मुस्लीम समाजाची असताना तिच्यावर अग्निसंस्कार का करण्यात आले याचे उत्तर अनुत्तरीत आहे. ही संपूर्ण घटनेची सी.आय.डी.ने पुन्हा बारकाईने जाऊन चौकशी करावी म्हणून या प्रकरणाचा तपास सी.आय.डी.कडे देण्याचा मी निर्णय घेत आहे.

श्री एस. क्यु. जमा : सबसे पहले मैं माननीय गृह मंत्री महोदय को धन्यवाद देना चाहूंगा कि उन्होंने सीआयडी इंक्वायरी करने की बात यहां पर कही है. लेकिन मैं बताना चाहता हूं कि कुरेशी बिरादरी के लोगों के व्यवसाय के बारे में सभी लोग जानते हैं. मैं यहां पर उन लोगों की बात नहीं कर रहा जो अवैध तरीके से जानवर ले जाते हैं. मेरा कहना है कि जो लोग कानूनी तरीके से जानवर ले जाते हैं, उन लोगों को भी कुछ जातिवादी संगठनों के लोग रास्ते में रोक कर परेशान करते हैं, छेड़ते हैं और उनके साथ गुंडागर्दी करते हैं. मुझे पूछना है कि क्या सरकार पूरे राज्य के लिए इस बारे में कोई दिशा निर्देश जारी करेगी कि किसी को बेवजह

3...



ABG/ D/ ST/ प्रथम श्री. शिगम 11:55

श्री  एस. क्यु. जमा.....

परेशान न किया जाये ? यदि किसी को लगता है कि अवैध तरीके से जानवर ले जाये जा रहे हैं तो इसकी शिकायत वे पुलिस में कर सकते हैं. लेकिन कुछ लोग पुलिस में शिकायत न करके खुद ही उनको परेशान करने लगते हैं.  क्या इस  संबंध  में शासन कुछ दिशा निर्देश जारी करेगा ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना एका मुलीच्या मृत्यू बद्दलची आहे. माहिती देणारा माणूस हा जनावरांची खरेदी विक्री करणारा आहे म्हणून जनावरांच्या खरेदी विक्रीवर जाणे म्हणजे सुता वरुन स्वर्ग गाठण्याचा हा प्रकार आहे. जनावरांची अधिकृतपणे, वैधपणे वाहतूक करणाऱ्यांना काही संघटना, काही लोक त्रास देत असतील आणि त्यांनी संबंधित पोलीस स्टेशनला तक्रार केली तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

श्री. सतीश चव्हाण : सन्माननीय गृहमंत्र्यांनी या ठिकाणी उत्तर दिले आहे, त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. हे प्रकरण सी.आय.डी.मार्फत चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. ही घटना दिनांक 5.3.2011 रोजी मुलगी मयत झाल्यानंतर तिला कबरस्तानमध्ये दफन न करता तिला जाळण्यात आले आहे ही गोष्ट खरी आहे काय ? ही मुस्लीम मुलगी होती तर तिला रितीरिवाजाप्रमाणे दफन करावयास पाहिजे होते. त्या गावातील सरपंच श्री.रमेश आढाव आणि पोलीस पाटील श्री. सदाशिव झरेकर यांनी पुरावा नष्ट करण्यासाठी हा प्रयत्न केला आहे. दवाखान्यातून परत निघताना त्यांचेसोबत जे गावगुंड होते, त्यांना दूरध्वनीव्दारे त्यांनी निदेश दिले की, कबरस्तानमध्ये सरण तयार ठेवा, त्या मुलीचे प्रेत तेथे आल्याबरोबर जाळावयाचे आहे. त्या मुलीस दफन करण्याऐवजी तिला जाळण्यात आले आहे हे खरे आहे काय ? त्या गावातील सरपंच आणि पोलीस पाटील यांचे विरुध्द कोणती कारवाई केली जाणार आहे ?

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.3.....

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सीआयडी तपासात जर दोषी असल्याचे निष्पन्न झाले तर निश्चितपणे कारवाई करु. दफन करण्याऐवजी अग्निसंस्कार केले ही गोष्ट खरी आहे.

-------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील ग्रंथालयांच्या अनुदानात वाढ करणे
**मु.शी.**: राज्यातील ग्रंथालयांच्या अनुदानात वाढ करणे यासंबंधी सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, नागो गाणार, डॉ.रणजित पाटील यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"गांव तेथे ग्रंथालय हे सरकारचे धोरण असतानाही राज्यातील ग्रंथालयांकरीता तरतूद केलेला निधी शासनाने कला संचालनालय व तंत्रशिक्षण विभागाकडे वळविण्याची नुकतीच उघडकीस आलेली धक्कादायक बाब, यामुळे किमान एक हजार गांवे ग्रंथालयापासून वंचित राहण्याची निर्माण झालेली शक्यता, गांवच्या ठिकाणी ग्रंथालयाची नितांत गरज असतांना निधीअभावी ही गांवे ग्रंथालयापासून वंचित राहिल्याने सदरहू गावातील सर्वसामान्य जनता विशेषत: ग्रामीण भागातील वाचक वर्ग ग्रंथालये नसल्याने ग्रंथालयापासून वंचित रहात असल्याचे आढळून येणे, यामुळे सर्वसामान्य जनतेत निर्माण होत असलेली नाराजी, ग्रंथालयाचा निधी ग्रंथालयालाच देण्याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.राजेश टोपे (उच्च व तंत्रशिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

...3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, ग्रंथालयाबाबत शासनाचे धोरण हे वाचन संस्कृती वाढण्याकरिता गावोगावी ग्रंथालये असली पाहिजेत अशा प्रकारचे आहे. आज ग्रंथालयांना 500 ते 20 हजार रुपये अनुदान डीपीडीसीमार्फत दिले जाते. या अनुदानामध्ये वाढ करण्याची गरज आहे. वाचन संस्कृती वाढत आहे. ग्रंथालये देखील वाढत आहेत. शासनाकडे अनेक प्रस्ताव मंजुरीसाठी दाखल होतात. या अनुदानामध्ये वाढ करण्यात येईल काय? आज कोकणात अनेक ग्रंथालये 50 वर्षे, 100 वर्षे, 150 वर्षे जूनी असल्याचे पहावयास मिळते. तेथील लोकांनी ती चालविली आहेत, वाढविली आहेत. त्यांना अनेक प्रकारच्या अडचणी सहन कराव्या लागत आहेत. इमारती पडायला आल्या आहेत. शासनाने 50 वर्षे, 100 वर्षे पूर्ण झालेल्या शैक्षणिक संस्थांना विशेष अनुदान दिले आहे. त्याच धर्तीवर 50 वर्षे, 100 वर्षे पूर्ण झालेल्या ग्रंथालयांना विशेष अनुदान दिले जाईल काय? शासनाकडे जे प्रस्ताव मान्यतेसाठी येतात त्या प्रस्तावांना मान्यता देण्यामध्ये दिरंगाई होते. त्यात काही अडचणी जरुर असतील. परंतु मान्यता देत असताना दिरंगाई होणार नाही या अनुषंगाने उपाययोजना करण्यात येईल काय?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी मंजुरीच्या स्टेजला तदर्थ अनुदानामध्ये वाढ करावी अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. ड वर्ग ग्रंथालयांना सुरुवातीला मंजुरी देताना ड वर्ग म्हणूनच मंजुरी दिली जाते. त्यामुळे मंजुरीच्या वेळी तदर्थ अनुदान देत असताना राज्यभर सरसकट 20 हजार रुपये द्यावेत असा नियम आहेत. ज्या डीपीडीसीकडून कमी तरतूद केली जाते, त्या जिल्हयातील ग्रंथालयांना 500 रुपये किंवा 1000 रुपये अनुदान दिले जाते. परंतु सरसकट मंजुरीच्या स्टेजला 20 हजार रुपये अनुदान देण्याचा नियम आहे. ड वर्ग ग्रंथालयांना मंजुरीच्या स्तरावर 20 हजार रुपये अनुदान दिल्यानंतर परिरक्षण अनुदान दिले जाते. त्या अनुषंगाने प्रतिवर्षी हे परिरक्षण अनुदान ड, क, ब व अ वर्गवारीनुसार दिले जाते. ड वर्गासाठी 30 हजार रुपये, क वर्गासाठी 64 हजार ते 96 हजार रुपये, ब वर्गासाठी 1.28 लाख ते 2.56 लाख रुपये आणि अ वर्गासाठी 1.92 लाख ते 4.80 लाख रुपये परिरक्षण अनुदान दिले जाते. या अनुदानामध्ये वाढ करण्याच्या संदर्भात माननीय उप मुख्यमंत्री यांच्या दालनामध्ये ग्रंथालय संघटनेच्या प्रतिनिधींसोबत बैठक झाली होती. त्या बैठकीमध्ये माननीय उप मुख्यमंत्र्यांनी निश्चितपणे अनुदानात वाढ करु अशा प्रकारचे आश्वासन दिले आहे. त्या

..4..



SGB/ D/ ST/ 12:00

श्री.राजेश टोपे.....

बैठकीचे मिनिट्स उपलब्ध आहेत. या संदर्भातील निर्णय निश्चितपणे महिन्याभरात घेण्याचा प्रयत्न करु. ग्रंथालयांच्या परिरक्षण अनुदानामध्ये वाढ करणे हा विषय राज्य शासनाकडे प्रलंबित आहे. याबाबत एका महिन्यात निश्चितपणे निर्णय घेऊ. 50 वर्षे, 100 वर्षे पूर्ण झालेल्या ग्रंथालयांबाबत देखील धोरण आखावे लागेल. त्या दृष्टीकोनातून निश्चितपणे विचार करता येईल हेही मला या निमित्ताने सांगावेसे वाटते. मान्यता देण्याची पध्दत अतिशय स्ट्रीमलाईन करण्याच्या दृष्टीकोनातून त्यामध्ये लालफितीचा अडसर येऊ नये. ग्रंथालयामध्ये किती ग्रंथ असावेत........

नंतर एस.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ल.सू.क्र. 4........ श्री. राजेश टोपे ......

जागा किती चौरस फुटाची असावी अशा दोन तीन अटी व शर्ती आहेत त्या बघून अनुदान देत असतो. शक्यतोवर अनुदान मंजूर करण्यासाठी अडवणूक न करण्याचेच शासनाचे धोरण असते. सन्माननीय सदस्यांनी यामध्ये अधिक सुस्पष्टता असावी अशी सूचना केली आहे, त्यानुसार शासन प्रयत्न करेल.

श्री. अरुण गुजराथी : महोदय, 50, 60 तसेच 100 वर्षांपासूनची जुनी ग्रंथालये लहान लहान गावांमध्ये आहेत. आपण या ग्रंथालयांना इमारत आणि साधन सामुग्रीसाठी अनुदान देतो. जी ग्रंथालये महाविद्यालये आणि माध्यमिक शाळांमध्ये आहेत त्यात काम करणाऱ्या ग्रंथपालांना पे-स्केल नुसार पगार दिला जातो. खाजगी ग्रंथालयातील ग्रंथपालांना तसे पे-स्केल आपण देऊ शकत नसला तरी "अ" "ब" "क" आणि "ड" वर्ग ग्रंथालयांमध्ये काम करणाऱ्या ग्रंथपालांना शासनाच्या पे-स्केल प्रमाणे वेतन मिळावे म्हणून गेल्या अनेक वर्षांपासून मागणी प्रलंबित आहे. शासन यासंबंधीचा सहानुभूतीपूर्वक विचार करणार काय ?

श्री. राजेश टोपे : महोदय, मी अगोदरच सांगितले की, आपण या ग्रंथालयांना अनुदान देतो त्यात वाढ करणारच आहोत. यासंबंधीचा नियम असा आहे की, जे अनुदान आपण देतो त्यातून 50 टक्के खर्च हा तेथे काम करणाऱ्यांच्या पगारावर करावा असे अपेक्षित असते. त्या पध्दतीने हा खर्च केला जातो. आपण हे अनुदान वर्षातून दोन वेळा देतो. त्यात असे होते की, काम करणारा कर्मचारी वर्ग दोन वेळा अनुदान दिलेले असल्याने दर महिन्याला पगार मिळत नाही, अशा तक्रारी संघटनेकडून आलेल्या आहेत. म्हणून या दृष्टीने वेतनाच्या संदर्भात ज्याप्रमाणे आपण शिक्षण व उच्च शिक्षण विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या बँक खात्यात पगार जमा करतो त्याच धर्तीवर ग्रंथालयात काम करणाऱ्यांना थेट पगार देण्याच्या संदर्भात विचार करता येईल काय याचाही प्रयत्न केला जाईल. हे जरी शासकीय कर्मचारी नसले तरी त्यांना दरमहा त्यांचा पगार बँकेकडून मिळू शकेल. यासंदर्भात लवकरात लवकर चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल.

श्री. दिलीपराव सोनवणे : महोदय, खाजगी ग्रंथपालांना माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागाच्या अखत्यारित असलेल्या ग्रंथपालांप्रमाणे पे-स्केल देण्याचा शासनाचा विचार आहे काय ?

....2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ल.सू. क्र. 4.......

श्री. राजेश टोपे : महोदय, खाजगी ग्रंथालयातील ग्रंथपालांना शासनाच्या सेवेत असलेल्या ग्रंथपालां प्रमाणे पे-स्केल देणे शक्य होणार नाही.

श्री. रामनाथ मोते : महोदय, महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम, 1967 हा कायदा जवळपास 40 वर्षापूर्वीचा आहे. त्यावेळेस या सभागृहाचे माजी सन्माननीय सदस्य श्री. व्यंकाप्पा पत्की यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने एक समिती गठित केली होती. त्या समितीने आपला अहवाल शासनाकडे सादर केलेला असून तो अहवाल शासनाने स्वीकारलेला आहे. त्यात या अधिनियमात बदल करण्याच्या अनुषंगाने काही शिफारशी वगैरे करण्यात आल्या आहेत काय ?

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते ..

मी स्वत: ग्रंथालय समितीमध्ये काम केलेले आहे. या ग्रंथालयामध्ये जे कर्मचारी काम करतात त्यांच्या वेतनासंबंधी तसेच निवृत्ती नंतर त्यांना द्यावयाच्या पेन्शनसंबंधी माननीय मंत्र्यांकडे अनेक वेळा बैठका झाल्या आहेत. माननीय मंत्री नेहमीच सकारात्मक भूमिका घेत असतात व त्यांनी या संदर्भात आश्वासन देखील दिले होते. तेव्हा ग्रंथालयात काम करणाऱ्या कर्मचा-यांच्या वेतनश्रेणी सबंधी , सेव शर्तीसंबंधी त्यांना द्यावयाच्या लाभा सबंधी निर्णय घेण्यात येणार आहे काय ?

श्री.राजेश टोपे :सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री रामनाथ मोते यांनी दोन प्रश्न विचारलेले आहेत. पत्की समितीचा अहवाल शासनाने स्वीकारला आहे काय असा त्यांचा पहिला प्रश्न होता. त्या बाबत मी त्यांना सांगू इच्छितो की, शासनाने पत्की समितीचा अहवाल निश्चितपणे स्वीकारला आहे. त्यातील ब-याचशा सूचना स्वीकारण्याचा राज्य सरकारचा विचार आहे.त्यानंतर त्यांनी दुसरा प्रश्न वेतनश्रेणी सबंधी विचारलेला आहे. त्या संदर्भात मी त्यांना सांगू इच्छितो की, माननीय सदस्य श्री.दिलीपराव सोनवणे यांच्या प्रश्नाला उत्तर देतांनाच मी सांगितले होते.गाव तेथे ग्रंथालय असावे असे शासनाचे धोरण आहे. आपण वाचन संस्कृती वाढवत आहोत. आज दहा हजार गावांमध्ये ग्रंथालये आहेत आणि दर वर्षी ग्रंथालयाची संख्या वाढविण्यात येणार आहे.या ग्रंथालय कर्मचा-यांना जर वेतनश्रेणी दिली तर ते योग्य होणार नाही. या ग्रंथालयामध्ये किती कर्मचारी राहतील याला अंत राहणार नाही. त्यामुळे या ग्रंथालयाला देण्यात येणारे अनुदान शासन वाढवित आहे. या अनुदानातील 50 टक्के भाग वेतनावर खर्च करावयाचा आहे . या कर्मचाऱ्यांना सुटटया किती असाव्यात, त्यांनी किती तास काम करावे किंवा त्यांच्या हितासाठी ज्या सेवा शर्ती ठरविण्याची आवश्यकता आहे त्या बाबतीत निश्चितपणे सकारात्मक विचार केला जाईल.

श्री.जयंत प्र.पाटील : वाढीव अनुदानाच्या प्रस्तावासंबंधी माननीय मंत्र्यांनी वित्त विभागाशी चर्चा केलेली आहे. या प्रस्तावामध्ये ग्रंथालय कर्मचा-यांचे किती वेतन वाढवले जाणार आहे व या संबंधी वित्त विभागाचे काय म्हणणे आहे ?

श्री.राजेश टोपे : मी सुरुवातीलाच सांगितले की साधारणपणे पाच वर्षामध्ये अनुदान वाढविण्यात येत असते हे अनुदान किती वाढवावयाचे आहे यासबंधी वित्त विभागाशी चर्चा करुन ठरविले जाईल असे सन्माननीय उप मुख्यमंत्री व वित्त मंत्री श्री. अजित पवार यांनी संगितलेले आहे.एक महिन्यात हा निर्णय घेतला जाईल असेही त्यांनी सांगितले आहे. परंतु कदाचित त्याही अगोदर हा निर्णय कसा घेता येईल या दृष्टीने प्रयत्न करण्यात येईल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे : गाव तेथे ग्रंथालय सुरु करण्याचे शासनाचे धोरण आहे. माननीय मंत्र्यांनी सांगितले की, दहा हजार गावांमध्ये ग्रंथालय सुरु करण्यात आलेले आहेत. राज्यामध्ये 46 हजार गावे आहेत त्यातील 10 हजार गावांमध्ये ग्रंथालये सुरु केली असून उरलेल्या 36 हजार गावांमध्ये ग्रंथलये सुरु करण्याकरिता शासना मार्फत विशेष मोहीम केव्हा राबविण्यात येणार आहे?

श्री.राजेश टोपे :सभापती महोदय, ही जिल्हा स्तरीय योजना असून प्रत्येक डीपीडीसीमार्फत या योजनेसाठी तरतूद केली जाते. जे लोक प्रादेशिक पातळीवर अर्ज करतात ते अर्ज स्क्रुटिनी करुन संचालकांच्या पातळीवर येतात आणि जे अटी व शर्थी पूर्ण करतात त्या ग्रंथालयांना मान्यता देण्याचे काम संचालकांकडून केले जाते.दर वर्षी जे काही अर्ज येतात आणि जे पात्र होतात त्यांना अनुदान दिले जाते. पात्र असतांनासुध्दा कोणालाही अनुदान नाकारण्यात येत नाही धर्मदाय संस्था सोसायटी किंवा एखाद्या ग्राम पंचायतीने स्वत: ग्रंथालय स्थापन करण्याचा निर्णय घेऊन तशा प्रकारचा प्रस्ताव पाठविला तर ग्राम पंचायतीना सुध्दा शासन मान्य ग्रंथालय म्हणून मान्यता देण्याचे शासनाचे धोरण आहे. त्यामुळे गाव तेथे ग्रंथालय असे शासनाचे सर्वदूर धोरण आहे. कोणत्याही पात्र संस्थेला नाही म्हटले जात नाही. जेवढे पात्र प्रस्ताव येतात तेवढे स्वीकारण्यात येतात.

श्री.कपिल पाटील : गावोगाव ग्रंथालये आहेत परंतु ती ओस पडलेली आहेत. वाचक दिवसेंदिवस मिळत नाहीत आणि ग्रंथालयात पुस्तके नाहीत अशी ग्रंथालयाची अवस्था झालेली आहे. एका बाजूला पुस्तकांच्या किंमती वाढलेल्या आहेत त्यामुळे मराठी पुस्तकांचा खप होत नाही .दुस-या बाजूला विद्यार्थ्यांना किंवा तरुणांना त्यांचे चांगले भविष्य घडविण्यासाठी जी चांगली पुस्तके आवश्यक आहेत किंवा अभिरुची घडविण्यासाठी आवश्यक आहेत अशा पुस्तकाच्या खरेदीसाठी अनुदान कमी पडते तेव्हा पुस्तक खरेदीसाठी अनुदान वाढविण्यात येणार आहे काय, सर्व ग्रंथालयाचा सर्व्हे करुन ही ग्रंथालये का चालत नाहीत याचा आढावा घेण्यात येणार आहे काय आणि ती ग्रंथालये चालण्यासाठी कोणता प्रयत्न करण्यात येणार आहे ?

नंतर श्री.सरफरे

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न विचारला आहे. मी या ठिकाणी एवढेच सांगू इच्छितो की,या ग्रंथालयानी वाचक वर्ग वाढविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. त्यासाठी चांगले ग्रंथ, चांगली पुस्तके उपलब्ध करुन देण्याची त्यांची जबाबदारी आहे. त्याकरिता अनुदानामध्ये वाढ केल्यानंतर ते निश्चितपणे पुस्तके आणू शकतील, याहीपुढे जाऊन सांगू इच्छितो की,सध्या इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीचा जमाना असल्यामुळे त्या ठिकाणी इंटरनेटची सुविधा आणि संगणक देण्याबाबत शासन विचार करीत आहे. जेणेकरुन इंटरनेटमार्फत मोठे ग्रंथ भांडार उपलब्ध होऊ शकेल. ही सुविधा ग्रंथालयामध्ये उपलब्ध व्हावी अशाप्रकारची योजना राबविण्याचे राज्य शासनाचे स्पष्ट धोरण आहे.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये या राज्यामध्ये सांस्कृतिक संपत्ती वाढविण्यासाठी गाव तिथे ग्रंथालय हे एक महत्वाचे साधन आहे. मंत्री महोदय आपण याठिकाणी म्हणलात की, जे अर्ज येतात त्यांची छाननी करुन आम्ही परवानगी देतो. आणि त्यानुसार अ,ब,क,ड अशाप्रकारच्या श्रेणीप्रमाणे त्यांना अनुदान मिळते. परंतु या सर्व वाचनालयांची गुणात्मक वाढ होण्यासाठी काही विभागीय पातळीवरुन, काही राज्य पातळीवरुन प्रयत्न होण्याची आवश्यकता आहे. ग्रंथालयामध्ये इंटरनेटची सुविधा उपब्ध करुन देण्याबाबत राज्य शासन आपल्या धोरणामध्ये समावेश करणार असल्याचे आपण सांगितले. सर्वत्र ग्रंथांच्या किंमती वाढत चालल्या असतांना काही दुर्मिळ पुस्तके ही शेवटच्या वाचकापर्यंत पोहोचू शकत नाहीत. आपण नवीन माध्यमांचा उपयोग केला आणि या सर्व ग्रंथालयांचे नेटवर्किंग करता आले तर अशाप्रकारचे साहित्य गावोगावी पोहोचू शकेल. दुसरा भाग असा की, काही ठिकाणी गावे छोटी असतात त्या ठिकाणी ग्रंथालयांसाठी जागा मिळणे आणि पुस्तक खरेदी करण्यासाठी निधीची उपलब्धता नसते . अशा विभागांसाठी आपण फिरत्या वाचनालयाच्या माध्यमातून काही ठराविक गावांचा क्लस्टर करुन त्या गावांमध्ये मोबाईल व्हॅनमार्फत पुस्तकांचा एक संच दिला आणि तो फिरता ठेवला तर अशाप्रकारची फिरती वाचनालये सुरु करुन जे लोक यामध्ये अजून सहभागी झालेले नाहीत त्यांना सहभागी करुन घेता येईल. राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाकरिता अशाप्रकारची एक नवीन योजना सुरु करण्याचा विचार करणार काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी ग्रंथालय संचालनालयाच्या संदर्भात नवीन विचार व्यक्त केले आहेत. यामध्ये मोबाईल ग्रंथालय आणि नेटवर्किंग ऑफ ग्रंथालय या दोन्ही योजनांबाबत सजेशन फॉर ॲक्शन. माननीय सदस्यांचे विचार निश्चितपणे चांगले असून त्याबद्दल जरुर विचार करु. तिसरा प्रश्न प्रशासनासंदर्भात असून गुणवत्ता सुधारण्यासाठी काय करता येईल? त्याबाबत एवढेच सांगू इच्छिते की, गुणवत्तेच्या संदर्भात प्रत्येक विभागाला एक पद दिले आहे, परंतु आता जिल्ह्याच्या ठिकाणी ग्रंथालय अधिकारी नावाचे महत्वाचे पद निर्माण करीत आहोत. जेणेकरुन हा अधिकारी सनियंत्रण ठेवू शकेल आणि सातत्याने सर्व ठिकाणी भेट देऊ शकेल . ग्रंथालयामध्ये जाऊन तेथील अडचणी काय आहेत त्यांची तपासणी करता येईल जेणेकरुन काही ठिकाणी बोगस कारभार सुरु असेल किंवा काही ठिकाणी शासनाच्या अनुदानाची लूट करण्याचे प्रकार होत असतील तर ते थांबविता येतील अणि गुणवत्ता वाढविण्यासाठी परिणामकारक काम करता येईल याकरिता हे नवीन पद निर्माण करुन अधिक सनियंत्रण करण्याचे काम वाढविण्यात येईल.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, मंत्रीमहोदय, आजच्या तरुण वर्गामध्ये वाचनाची आवड कशी निर्माण होईल आणि ही चळवळ पुढे कशी जाईल यासाठी आपण प्रामाणिकपणे प्रयत्न करीत आहात त्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो. माझे सहकारी माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी नेटवर्किंगचा उल्लेख केला आहे. माझा साधा आणि सरळ प्रश्न आहे की, महाराष्ट्रात 100 वर्षापूर्वीची जुनी ग्रंथालये आहेत. त्या ग्रंथालयांना जुने, दुर्मिळ असे ग्रंथ उपलब्ध होऊ शकत नाहीत. तेव्हा अत्यंत जीर्ण अवस्थेतील या ग्रंथांचे प्रिझर्व्हेशन होण्यासाठी आपण काही योजना आखणार आहात काय?

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे . . ..

या सर्व दुर्मिळ ग्रंथांचे ई-बुक्स् मध्ये रुपांतर करुन ऑन लाईनवर उपलब्ध करुन दिले पाहिजे. कारण आजचा तरुण वर्ग हा सतत कॉम्प्युटरसमोर बसलेला असतो आणि अशा वेळी त्याला जर अशा ग्रंथांची,पुस्तकांची उपलब्धता करुन दिली तर त्यांच्यामध्ये वाचनाची आवड निर्माण होईल यादृष्टीने शासन सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये वेगळया पध्दतीने योजना आखणार आहे काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय,याठिकाणी दोन चांगल्या सूचना करण्यात आलेल्या आहेत. दुर्मिळ ग्रंथांचे जतन करणे आणि "ई-बुक" सारखी नवीन संकल्पना हाती घेणे आवश्यक आहे. या दोन्ही सूचनांच्या बाबतीत निश्चितपणे आपल्याला विचार करता येईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, जीवनामध्ये पुस्तक वाचनाला अतिशय महत्व आहे. पुस्तक वाचले तर माणसाचे मस्तक संपन्न होते आणि संपन्न झालेले मस्तक कुणापुढे नतमस्तक होत नाही. म्हणून पुस्तक वाचले पाहिजे. तसेच महाराष्ट्रातील ग्रंथालय कर्मचारी संघटना त्यांना वेतनश्रेणी देण्यात यावी यासाठी प्रत्येक अधिवेशनाच्या काळामध्ये मोर्चा आणत असते.

**उप सभापती** : सदरहू कर्मचारी ग्रंथालय सोडून मोर्चे कसे आणतात ?

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, आपल्या माध्यमातून माननीय मंत्री महोदयांना विनंती करावयाची आहे. मघाशी माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले की, आम्ही त्यांना वेतनश्रेणी देणार नाही. त्यामुळे आपण त्या कर्मचारी संघटनेला एकदा बोलावून विश्वासात घ्यावे आणि यापुढे आपली वेतनश्रेणी बाबतची मागणी कदापि मान्य होणार नाही हे सांगितले तर त्यातून एक चांगला मार्ग निघू शकेल आणि त्यांची होणारी हेळसांड देखील थांबू शकेल. तसेच आपण त्यांना वारंवार आश्वासन देत आहोत की, ग्रंथालयाच्या अनुदानामध्ये वाढ करणार आहोत. मघाशी देखील माननीय मंत्री महोदयांनी असे सांगितले.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, ग्रंथालयाच्या अनुदानामध्ये वाढ करण्याबाबत जो निर्णय घेणार आहात, तो अधिवेशन संपण्यापूर्वी घेणार काय ? माननीय मंत्री महोदय कर्तृत्ववान आहेत याची आम्हाला जाणीव आहे. परंतु अधिवेशन संपण्यापूर्वी आपण बाणेदारपणे अनुदानात वाढ करण्याबाबत निर्णय घेतला तर किमान तो तरी महत्वाचा प्रश्न मार्गी लागेल. म्हणून अधिवेशन संपण्यापूर्वी अनुदानामध्ये वाढ करण्याबाबतचा निर्णय घेणार आहात काय ? तसेच या संघटने बरोबर चर्चा करणार आहात काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांना माहिती आहे की, मी अनेक वेळा या संघटनांबरोबर चर्चा केलेली आहे. तसेच या सदनामध्ये सुध्दा ज्या-ज्या वेळी प्रश्न उपस्थित झाले, त्या-त्यावेळी वेतनश्रेणी बाबत सुस्पष्ट असे उत्तर दिलेले आहे की, आपल्याला वेतनश्रेणी लागू करता येणार नाही आणि आम्ही वेतनश्रेणी लागू करु असे कधीही आश्वासन दिलेले नाही. यासंबंधात जेवढ्या बैठका झाल्या, त्यावेळी देखील असे सांगितले की, वेतनश्रेणी लागू करणे अवघड आहे. परंतु आम्ही दर 5 वर्षांनी अनुदानात दुप्पट वाढ करीत आहोत आणि आता 5 वर्षे पूर्ण झालेली आहेत. त्यानुसार आम्ही वाढ करुच जेणेकरुन त्यांच्या पगारामध्येही वाढ होईल. तसेच त्यांच्या सेवाशर्ती सुध्दा मंजूर करण्याच्या बाबतीत सामान्य प्रशासन विभागाशी विचार विनिमय करुन जे काही करता येऊ शकेल ते निश्चितपणे करण्याच्या बाबतीत विचार करु.

**उपसभापती** : मी आता सदरहू लक्षवेधी सूचनेवरील चर्चा संपवितो. कारण सभागृहाला ग्रंथालयाचे स्वरुप आलेले आहे. सर्व सन्माननीय सदस्य एकमेकांशी बोलत आहेत. येथे कोणाचेही लक्ष नाही. आता यानंतर विशेष उल्लेख मांडण्यात येतील.

-----

. . . .व्ही-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही





**विशेष उल्लेख**

**पृ.शी.**: हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ (मर्यादित)चे व्यवस्थापकीय संचालकांनी संस्थेचा कारभार गैरप्रकारे चालविणे

**मु.शी.**: हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ (मर्यादित)चे व्यवस्थापकीय संचालकांनी संस्थेचा कारभार गैरप्रकारे चालविणे याबाबत श्री.हुसेन दलवाई वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.हुसेन दलवाई (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ (मर्यादित) चे व्यवस्थापकीय संचालक श्री.सबदे यांनी मागील दोन वर्षापासून संस्थेचा कारभार गैरप्रकारे चालविल्याबाबत शासनाकडे अध्यक्ष - डॉ. आर.बी.बापट यांचेकडून अनेक वेळा तक्रारी केल्या गेल्या असून त्यासंदर्भात शासनाकडून कोणतीही कार्यवाही झालेली नाही. महामंडळाच्या भवितव्याच्या दृष्टीने गरजेच्या असलेल्या व दोन वर्षे रखडलेल्या औषध निर्माण विभागाचे नूतनीकरणाचे काम पूर्ण होऊ शकलेले नाही. अणु वीज लस विभागाच्या निर्मितीसाठी प्रयत्न होताना दिसत नाही. त्याशिवाय महामंडळातील अधिकारी, कर्मचारी यांच्या निवासस्थानाच्या दुरुस्तीसाठी, परळ येथील उपहारगृह नूतनीकरणाच्या कामात औषध विभागाचे बांधकाम व अशा अनेक कामामध्ये झालेला गैरव्यवहार व या सर्व बाबी शासनास अवगत करुनही शासनाकडून होत असलेली चालढकल हे लक्षात आणून देण्यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

----

यानंतर श्री.बरवड . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : विविध प्रकारच्या वस्तूंची आकर्षक मुलाखत करणाऱ्या जाहिरातींवर बंदी आणण्याची आवश्यकता

**मु. शी.** : विविध प्रकारच्या वस्तूंची आकर्षक मुलाखत करणाऱ्या जाहिरातींवर बंदी आणण्याची आवश्यकता याबाबत श्री. नागो गाणार, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री. नागो गाणार यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. नागो गाणार ( नागपूर विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"वर्तमानपत्रे, मासिके, पाक्षिके, इत्यादी नियतकालिके व इलेक्ट्रॉनिक मीडियामधून विविध प्रकारच्या व्यापारी जाहिराती प्रसिध्द केल्या जातात. त्यामध्ये साबण, सौंदर्यप्रधासने, इत्यादी वस्तूंची जाहिरात करतात, वस्तुस्थितीपेक्षा आकर्षक मुलाखत करणारी जाहिरात करुन ग्राहकास आकृष्ट करीत असतात, त्यातून फसवणूक जास्त असते. ग्राहकांची फसवणूक करण्यासाठी महिलांच्या प्रतिमेचा दुरुपयोग केला जातो. अशा अतिरंजित जाहिरातींवर अंकुश लादणारी यंत्रणा प्रभावीपणे राबवावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे."

----

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/ ST/

**पृ. शी.** : नाशिक येथे 'सरकारवाडा' या ऐतिहासिक वास्तूचे सुरु असलेले काम निधीअभावी बंद पडू नये यासाठी करावयाची उपाययोजना

**मु. शी.** : नाशिक येथे 'सरकारवाडा' या ऐतिहासिक वास्तूचे सुरु असलेले काम निधीअभावी बंद पडू नये यासाठी करावयाची उपाययोजना याबाबत श्री. हेमंत टकले, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : मा□□य सदस्य श्री. हेमंत टकले यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"नाशिक येथे 'सरकारवाडा' ही ऐतिहासिक वास्तू राज्य शासनाच्या पुरातत्व खात्याकडे आहे. स्थापनेपासून ह्या वास्तूतून राज्य कारभार चालविला जात असे. कालांतराने सदर वास्तूचा वापर वाचनालय, पोलीस ठाणे अशा स्वरुपात केला. त्यामुळे हा ऐतिहासिक वारसा जतन करणे कठीण झाले होते. सुदैवाने गेल्या काही वर्षात ह्या वास्तूसाठी सुमारे 75 लाखाच्या निधीतून चांगले काम सुरु केले आहे. हा वारसा सुशोभित करणे व जतन करण्याचे काम निधी अभावी बंद होऊ नये यासाठी शासनाने विशेष लक्ष द्यावे."

सभापती महोदय, नाशिक शहरामध्ये सुमारे 200 वर्षाची ऐतिहासिक पेशवे कालीन 'सरकारवाडा' नावाची वास्तू आहे. ती वास्तू आता राज्य शासनाच्या पुरातत्व खात्याकडे आहे. स्थापनेपासून या वास्तूतून पेशवे काळात राज्य कारभार चालविला जात होता. कालांतराने या वास्तूचा वापर वाचनालयासाठी, पोलीस ठाण्यासाठी, अशा स्वरुपात केला गेला. आता या पोलीस ठाण्याचे स्थलांतर सरकारवाड्यातून झालेले आहे. पोलीस ठाणे बाहेर गेले पण दुर्दैवाने 50-100 वर्षापासून जप्त केलेला माल साठवून ठेवण्यासाठी अजूनही पोलीस खात्याने ती जागा पुरातन



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले ....

असताना सुध्दा पुरातन खात्याकडे दिलेली नाही. ही मोठी हेरिटेज व्हॅल्यू असलेली नाशिकमधील देखणी वास्तू आहे. त्यावर आतापर्यंत 75 लाख रुपयांचा निधी खर्चही झालेला आहे. ती योजना साधारणपणे 3 कोटी रुपयांची आहे. ही योजना पूर्ण करण्यासाठी, हा वारसा सुशोभित करण्यासाठी आणि जतन करण्यासाठी निधी अभावी हे काम बंद होऊ नये याकडे शासनाने विशेष लक्ष द्यावे अशी विनंती मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे.

---

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सिंधुदुर्ग जिल्ह्यात लेप्टोस्पायरोसिस या साथीच्या रोगाला रोगाला आळा घालण्यासाठी करावयाची कार्यवाही

**मु. शी.** : सिंधुदुर्ग जिल्ह्यात लेप्टोस्पायरोसिस या साथीच्या रोगाला आळा घालण्यासाठी करावयाची कार्यवाही याबाबत श्रीमती अलका देसाई, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : मा□□□य सदस्या श्रीमती अलका देसाई यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

"सिंधुदुर्ग जिल्ह्यात सहा महिन्यापूर्वी पावसाळ्यात लेप्टोस्पायरोसिस या साथीने थैमान घालून 25 हून अधिक रुग्णांचा मृत्यू झाला होता. रुग्णावर उपचार करण्याची संधी न देणाऱ्या या भयंकर असलेल्या साथीचा भविष्यात धोका वाढणार नाही यासाठी आरोग्य विभागाने प्रत्येकाला लेप्टोची लक्षणे व उपायांची गरज या बाबतची मोहीम हाती घेऊन ती तातडीने अंमलात आणण्याची नितांत आवश्यकता आहे. अशा या अतिशय चिंताजनक व महत्वाच्या विषयावर विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

----

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/ ST/

**पृ. शी.** : आष्टी व धारुर तालुक्यात राजीव गांधी घरकुल योजनेअंतर्गत काही लाभार्थ्यांनाच धनादेश मिळणे तसेच बँकेच्या असहकारामुळे योजनेचा उडालेला बोजवारा

**मु. शी.** : आष्टी व धारुर तालुक्यात राजीव गांधी घरकुल योजनेअंतर्गत काही लाभार्थ्यांनाच धनादेश मिळणे तसेच बँकेच्या असहकारामुळे योजनेचा उडालेला बोजवारा याबाबत ॲड. उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : मा□□य सदस्या ॲड. उषा दराडे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

"आष्टी तालुक्यात 122 ग्रामपंचायती असून या तालुक्यात 7200 गोरगरीब घरकुल प्रतीक्षा यादीत प्रतीक्षेत आहेत. गतवर्षी तालुक्यात 611 घरकुले मंजूर झाली. त्यापैकी 370 घरकुले पूर्ण झ ाली असून घरकुलांच्या लाभार्थ्यांना शेवटचा धनादेश देणे बाकी आहे आणि उर्वरित गरजूंना घरकुले देणे बाकी आहे.

धारुर तालुक्यातील मंजूर घरकुलांपैकी फक्त 25 टक्के कामे प्रत्यक्षात सुरु झाली आहेत. राजीव गांधी घरकुल योजनेचा बँकेच्या असहकारामुळे बोजवारा उडाला आहे. 2010-2011 या वर्षात अनुसूचित जाती, नवबौध्द घटक योजनेमध्ये 188 घरकुलांना मंजुरी मिळाली. त्यापैकी फक्त 49 घरकुलांचे बांधकाम प्रत्यक्ष सुरु आहे. याबाबत शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना."

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...6...

RDB/ KTG/ D/ ST/

**पृ. शी.** : राज्यात गाव पातळीवर तंटामुक्ती समितीवर दलित व दुर्बल यांची 50 टक्के नियुक्ती करण्याबाबत

**मु. शी.** : राज्यात गाव पातळीवर तंटामुक्ती समितीवर दलित व दुर्बल यांची 50 टक्के नियुक्ती करण्याबाबत याबाबत श्री. सुभाष चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : मा□□□य सदस्य श्री. सुभाष चव्हाण यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"सभापती महोदय, राज्यात गाव पातळीवर सलोख्याचे वातावरण राहावे, दलित, दुर्बल यांचेवर अन्याय होणार नाही व त्यांच्या हक्कांचे रक्षण प्राधान्याने केले जावे यासाठी सुमारे 30 ते 35 सदस्यांची तंटामुक्ती समिती नियुक्त करण्यात येते. परंतु एवढ्या मोठ्या सदस्यांच्या समितीवर दलित आणि दुर्बल यांचा फक्त एकच प्रतिनिधी आहे व त्यामुळे त्यांचा आवाज दाबला जातो. त्यांना दबावाखाली राहावे लागते. त्यांच्या तक्रारी दडपल्या जातात. दलितांवरील अन्यायाबाबत आवाज उठविता येत नाही किंवा भावना व्यक्त करता येत नाहीत. दलित व दुर्बल यांचा आवाज दाबला जाणार नाही, त्यांच्या तक्रारी दडपल्या जाणार नाहीत, त्यांच्यावर अन्याय होणार नाही, त्यांच्या हक्कांचे रक्षण व्हावे, यासाठी दलित व दुर्बल यांची तंटामुक्ती समितीवर जास्तीत जास्त 50 टक्के प्रतिनिधींची नियुक्ती करण्याची आवश्यकता आहे. अशा या अतिशय गंभीर व महत्वाच्या विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

---

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : गोंदिया जिल्ह्यात तेंदूपत्ता संकलनाच्या वेळी मजुरांकडून तेंदूच्या खुंटांना आग लावण्याचे वाढलेले प्रकार

**मु. शी.** : गोंदिया जिल्ह्यात तेंदूपत्ता संकलनाच्या वेळी मजुरांकडून तेंदूच्या खुंटांना आग लावण्याचे वाढलेले प्रकार याबाबत श्री.केशवराव मानकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.केशवराव मानकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"एप्रिल महिन्यापासून तेंदूपत्ता हंगामाला प्रामुख्याने प्रारंभ होत असणे, या दरम्यान ग्रामीण भागातील व जंगलालगत असलेल्या भागातील मजुरांकडून तेंदूच्या खुंटांना चांगली पालवी यावी यासाठी खुंटांना आग लावण्यात येत असणे, ही परिस्थिती गोंदिया जिल्ह्यातील जंगली भागात मोठ्या प्रमाणात निर्माण झाली आहे, जिल्ह्यातील नागझिरा व नवेगांवबांध अभयारण्याचा बराच भाग जिल्ह्याला लागून असणे, त्यातल्या त्यात नवेगांवबांध व नागझिरा अभयारण्याला व्याघ्र प्रकल्प बनविण्याची तयारी शासन स्तरावर सुरु असणे, या राष्ट्रीय अभयारण्यात अनेक वन्यजीव वास्तव्यास असणे, मात्र काही वर्षांपासून या भागात तेंदूपत्ता संकलना दरम्यान मजुरांकडून आग लावण्याच्या प्रकारामुळे आगीला वणव्याचे स्वरुप प्राप्त होऊन संरक्षित जंगलातील लाखो रुपयांची मौल्यवान संपत्ती नष्ट होणे, या वणव्यामुळे जंगलातील साग, सिसम, चंदन व अन्य महत्वाचे वृक्ष नष्ट होत आहेत, त्यामुळे ही आग आटोक्यात आणण्यासाठी वन कर्मचाऱ्यांची दमछाक होणे, त्यामुळे शासनाने जंगलातील आग आटोक्यात आणण्यासाठी तातडीने ठोस उपाययोजना करुन वन संपत्तीचा होणारा ऱ्हास थांबविण्याची आवश्यकता, यावर तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

-----

2.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

## औचित्याच्या मुद्यासंबंधी

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी काल सभागृहात औचित्याचा मुद्दा मांडला होता. आयपीएलच्या आयोजकांकडे चिअर्स गर्ल्सना देण्यासाठी पैसे आहेत. खेळाडूंच्या ऑक्शनचे देण्यासाठी पैसे आहेत. परंतु आमचे गरीब हवालदार, जमादार, नाईक हे मॅचच्या वेळी दिवस रात्र उभे राहून काम करीत असतात, त्यांना देण्यासाठी पैसे नाहीत. पोलीस आयुक्तांनी एका पोलीस कर्मचा-यांच्या कानफटात मारल्याची बातमी आहे. हे आयपीएलचे आयोजक महाराष्ट्र शासनाचे सुरक्षा व्यवस्थेचे पैसे देत नाहीत. त्यामुळे जोपर्यंत आयपीएलच्या आयोजकांकडून पोलीस बंदोबस्ताचे सुरक्षा व्यवस्थेचे पैसे दिले जात नाहीत तोपर्यंत त्यांना पोलीस बंदोबस्त दिला जाऊ नये असे आपण शासनाला आदेश द्यावेत.

-----

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : तुळजाभवनी मातेला अर्पण केलेल्या सोन्या-चांदीच्या वस्तू वितळविल्यावर त्यामध्ये मोठ्या प्रमाणात आलेली तूट

**मु. शी.** : तुळजाभवनी मातेला अर्पण केलेल्या सोन्या-चांदीच्या वस्तू वितळविल्यावर त्यामध्ये मोठ्या प्रमाणात आलेली तूट याबाबत श्री.विक्रम काळे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : मा□□य सदस्य श्री.विक्रम काळे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.विक्रम काळे ( औरंगाबाद विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"महाराष्ट्र जनतेचे आराध्य दैवत तुळजाभवानी मातेला सन 1994 ते 2008 या कालावधीत भाविक, भक्तांनी 81 किलो सोन्याच्या विविध वस्तू अर्पण केल्या, त्याचबरोबर शुध्द चांदीच्या 383 किलोच्या वस्तू अर्पण करण्यात आलेल्या आहेत. परंतु या सोन्याच्या वस्तू वितळविल्यानंतर 47 किलो शुध्द सोने मिळाले, गेल्या 14 वर्षात सोने शुध्द करताना 33 किलो तूट दाखविण्यात आलेली आहे तर चांदी वितळल्यानंतर त्यातील तूट 182 किलो दाखविण्यात आलेली आहे. तुटीचे हे प्रमाण तुलनेने अधिक असल्याने व सोने-चांदी व मौल्यवान दागिने तपासण्यासाठी तज्ज्ञ न नेमताच हा प्रकार झाला असल्याचे तुळजाभवानी पुजारी मंडळाच्या अध्यक्षांनी माहितीच्या अधिकारात मिळविलेल्या कागदपत्रातून ही खळबळजनक बाब समोर आलेली आहे. देवीच्या चरणी एवढ्या मोठया प्रमाणात सोने व चांदीच्या वस्तू अर्पण होत असताना त्याची तपासणी करण्यासाठी तज्ज्ञ का नेमले जात नाहीत ? अशी नियुक्ती न करण्यामागे प्रशासनाची काय भूमिका आहे हे वारंवार विचारल्यानंतरही कारवाई केली जात नाही. त्यामुळे अशा पध्दतीने सामान्य भाविक, भक्तांनी श्रध्देपोटी अर्पण केलेल्या मौल्यवान वस्तुंमध्ये गैरव्यवहार होणे ही अत्यंत खेदजनक बाब आहे व त्याचा त्वरित पायबंद केला पाहिजे व तो तातडीने करावा अशी मागणी मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे करीत आहे."

------

यानंतर श्री.शिगम....

**पृ. शी.** : स्थावर मालमत्तेची फेर मोजदाद करुन सुधारित नकाशे तयार करण्याबाबत

**मु. शी.** : स्थावर मालमत्तेची फेर मोजदाद करुन सुधारित नकाशे तयार करण्याबाबत श्री. भगवान साळुंखे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री.भगवान साळुखे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

आपल्या राज्यातील शेतजमिनीची मोजदाद व नकाशे तयार करण्याचे काम ब्रिटीश आमदानीमध्ये करण्यात आले होते. त्यावेळी तयार केलेले नकाशे आता पूर्णपणे जीर्ण झाले असून फार थोड्या ठिकाणी ते सुस्थितीत ठेवले गेले आहेत. बाकी सर्व ठिकाणी हे नकाशे जीर्ण झाल्यामुळे त्याचा भुगा झाला आहे. नकाशाची मागणी केल्यास ही वस्तुस्थिती लक्षात आणून देऊन गरजूंची बोळवण केली जाते. या स्थावर जमिनीच्या मालकी विषयक दस्ताऐवज उपलब्ध होत नसल्याचा गैरफायदा अनेक प्रकारे घेतला जात आहे व मूळ मालकांची हकालपट्टी केली जात आहे. सारांश आता स्थावर मालमत्तेची फेर मोजदाद करणे व सुधारित नकाशे तयार करणे याबाबत शासनाने कृति कार्यक्रम हाती घ्यावा व सामान्य माणसास दिलासा द्यावी अशी विनंती या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

----

**उप सभापती** : दोन-तीन विशेष उल्लेखाच्या सूचना आता सभागृहामध्ये प्राप्त झालेल्या आहेत. मी त्या सूचनांना अनुमती नाकारीत आहे. विशेष उल्लेखाच्या सूचना रीतसर माननीय सभापतींकडून यावयास पाहिजेत. विशेष उल्लेखाच्या सूचना सभागृहामध्ये आयत्या वेळी देण्याची प्रथा चुकीची आहे.

औचित्याचे मुद्दे आपण शुक्रवारी घेत असतो. परंतु विशेष बाब म्हणून मी आज औचित्याचे मुद्दे मांडण्यास परवानगी देत आहे.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याच्या मुद्याबाबत**

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, मला औचित्याचा मुद्दा मांडावयाचा आहे. मी आपली आणि सभागृहाची माफी मागून सांगू इच्छितो की, माझी तब्येत अचानक बिघडल्यामुळे मला हॉस्पिटलमध्ये जावे लागले. त्यामुळे लक्षवेधी सूचना क्रमांक 3च्या चर्चेच्या वेळी मला सभागृहात उपस्थित राहात आले नाही. ही घटना सहजतेने घडलेली नाही. निवेदनामध्ये जी काही महिती दिलेली आहे ती चक्क असत्य आहे. मुस्लिम समाजामध्ये प्रेत जाळण्याचा प्रकारच घडत नाही. त्या मुलीवर बलात्कार झाला असे बरेच लोक सांगत असून या प्रकाराची सर्वांना माहिती आहे. तेथील 4 धनदांडग्यांनी बलात्कार करुन तिला हॉस्पिटलमध्ये नेले. हॉस्पिटलमधील डॉक्टरने, तिची ताबडतोब विल्हेवाट लावा असे सांगितले. नंतर तिला कब्रस्तानामध्ये आणले, तिचे घरामध्ये राहिलेले कपडे आणले, आणि तिला जाळले. त्या घटनेचे फोटो माझ्याकडे आहेत. तेथे जाणे कठीण होते. त्या ठिकाणी लोक जाण्यासाठी भंयकर घाबरत होते. आमच्या मौलाना आझाद विचार मंचच्या श्रीमती झ ाहिरा शेख तेथे गेल्या. त्यांनी तेथे फोटो घेतलेले आहेत. त्या मुलीची हाडे घेतलेली होती ती सुध्दा दुस-या दिवशी फेकून दिली गेली. काही हाडे मी येथे आणलेली आहे. हा सर्व प्रकार महाराष्ट्राला अतिशय लांच्छनास्पद आहे. खैरलांजी नंतर ही दुसरी इतकी वाईट घटना घडलेली आहे. त्या मुलीचे वडील गरीब मजदूर आहेत. ते काहीच बोलू शकणार नाहीत. त्या ठिकाणी मुसलमानांची फक्त तीन घरे आहेत. मी येथे हिंदू मुस्लिम असा प्रश्न करीत नाही. हा गरिबांवर अतिशय क्रूरपणे झालेला अत्याचार आहे. खेड्यापाड्यामध्ये अशा प्रकारे गरिबांवर अत्याचार होत आहे. या घटनेनंतर जेव्हा पोलीस स्टेशनला एफआयआर नोंदविण्यासाठी मुलीचे नातेवाईक गेले त्यावेळी तेथे दोन पोलीस इन्स्पेक्टर होते आणि त्यातील एक मुस्लिम होता. त्यांनी असे सांगितले की, "जाऊ द्या, आता झालं ना, हे प्रकरण कुठे काढू नका." खरे म्हणजे तेथील दोन्ही पोलीस अधिका-यांना निलंबित करुन या प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे. तेथील एस.पी.काय काम करतो ? आपल्या मॅडम बरोबर गाडीत बसून बाजारपेठेत जाऊन खरेदी करायची एवढेच काम त्यांना आहे काय ? हे लोक काय काम करतात ? या लक्षवेधीच्या निवेदनामध्ये जे काही सांगितलेले आहे ते असत्य आहे. माननीय मंत्री महोदय आता सभागृहामध्ये हजर नाहीत. त्यांनी जरी सीआयडी चौकशी करतो असे सांगितले तरी तेथील एसपीना रजेवर पाठवून नंतरच या प्रकरणाची चौकशी करायला पाहिजे. हे प्रकरण फार भयंकर आहे.

..3..

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : ही घटना अतिशय गंभीर आहे. मुस्लिम मुलीला कसे काय जाळले ?

श्री. सुभाष चव्हाण : ही घटना अतिशय गंभीर आहे. माननीय मंत्री महोदयांसमोर ही चर्चा व्हावयास पाहिजे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांनी मला पत्र दिल्यानंतर ते हॉस्पिटलमध्ये दाखल झाले. त्यानंतर ते थेट येथे सभागृहामध्ये आले. तोपर्यन्त त्यांनी दिलेल्या लक्षवेधी सूचनेवर सभागृहात चर्चा झाली होती. तरी देखील विषयाचे गांभीर्य लक्षात घेता मी या ठिकाणी गृह मंत्री महोदयांना पाचारण करतो आणि त्यांच्या उपस्थितीमध्ये हा जो पुढचा भाग चर्चिला गेलेला नाही त्याची पुन्हा चर्चा करण्यात येईल.

---

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याचे मुद्दे**

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, मी आपल्या परवानगीने औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

राज्यातील देवस्थानच्या इनामी जमिनी बेकादेशीर हस्तांतर झाले असल्यास पूर्ववत देवस्थानांच्या नावे करण्याबाबत शासनाने दिनांक 30 जुलै, 2010 रोजी परिपत्रक काढले असून इनामी जमिनी हस्तांतरीत होताना सक्षम अधिकाऱ्यांचे समोर जमिनी हस्तांतरीत होण्याचे व्यवहार झालेले आहेत. त्यांच्या पूर्वपरवानगीने हस्तांतराचे व्यवहार झालेले असून त्यांचे जमिनीचे व्यवहार होत असतात. परंतु इनामी जमिनी घेतल्याने विविध शासनाच्या योजना राबविता येत नसून इंदिरा आवास योजनेचा लाभही घेऊ शकत नाही. बँकेकडे जमीन तारण ठेवता येत नाही. या बेकायदेशीर इनामी जमिनीच्या नोंदीत सिंधुदूर्ग जिल्हयातील मालवण व देवगड तालुक्यातील 250 वर्षापासून देवस्थानाच्या जमिनी अंतर्गत अंदाजे 13 गावे येत असून वेरळ, इरलेवाडी, डोंगरवाडी, पिरावाडी,पारवाडी, आचरा, वरचेवाडी, किंजवडे,तोरसळे, पोंभुर्डे, आरे, कोटकाम, खुडी इत्यादी 13 गावे बेकायदा हस्तांतरात या परिपत्रकाने सापडले आहे. तरी माझी या निमित्ताने विनंती आहे की, देवस्थानांच इनामी जमिनी बाबत माहे 30 जुलै, 2002 रोजी शासनाने जे परिपत्रक काढलेले आहे. या भागातील इनामी जमिनी खरेदी केलेल्या लाभार्थ्यांच्या नावे नियमाप्रमाणे करण्याबाबत नव्याने परिपत्रक काढून पूर्वीचे परिपत्रक रद्द करावे व गावातील सर्व जनतेवर होणारा अन्याय दूर करावा, अशी मी या औचित्याच्या मुद्याच्या निमित्ताने मागणी करीत आहे.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. सुभाष भोईर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. सुभाष भोईर : सभापती महोदय, मी आपल्या परवानगीने औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, मी एका महत्वाच्या गोष्टीकडे शासनाचे लक्ष वेधणार आहे. परंतु राज्यात बऱ्याच ठिकाणी सिडकोने शहर विकासाकरिता शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या. शेतकऱ्यांकडून जमीन संपादित केल्यानंतर 7/12 च्या उताऱ्यावरुन शेतकऱ्यांची नावे कमी केले. हा शेतकरी राज्यात इतर ठिकाणी शेत जमिनी घेऊ शकत नाही. कारण शासनाच्या नियमानुसार शेतकऱ्याकडे जमीन असेल किंवा 7/12 उतारा असेल, त्या शेतकऱ्यानांच स्वतःच्या नावे जमिनी विकत घेता येतात. शेतकरी असल्याबाबतचा दाखला घेण्यासाठी शेतकरी शासकीय अधिकाऱ्यांकडे जातात, ते अधिकारी देखील शेतकऱ्यांकडून 7/12 उताऱ्याची मागणी करतात. शेतकऱ्यांना राज्यात जमीन विकत घेता यावी म्हणून शेतकरी असल्याबाबत 7/12 उताऱ्याची अट न काढता शेतकरी असल्याबाबतचा दाखला शासनाने देण्याच्या संबंधी शासनाने आदेश द्यावेत अशी मी औचित्याच्या मुद्याच्या अनुषंगाने आपणास विनंती करतो.

----------

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. वसंतराव खोटरे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, मी आपल्या परवानगीने औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, आदिवासी उपयोजना क्षेत्र व आदिवासी उप योजना क्षेत्रातील माध्यमिक शाळांमधील शिक्षकांचे माहे नोव्हेंबर, 2010 पासून वेतन बंद आहे. शासनाने पुढील वर्षाच्या म्हणजे 2011-12 मध्ये कोणत्याही प्रकारची तरतूद केलेली नाही. भविष्यात शिक्षक वर्ग पगारापासून वंचित राहील, तसेच त्यांच्यावर उपासमारीची वेळ येईल. या शिक्षकांना वेतन देण्यासंबधी शासनाने तरतूद करावी याबाबत आपण शासनास निर्देश द्यावेत, अशी मी या औचित्याच्या मुद्याव्दारे विनंती करीत आहे.

---------

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, मी आपल्या परवानगीने औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, मी आपल्या भागातील औचित्याचा मुद्दा या ठिकाणी उपस्थित करणार आहे. शासनाने 2005 मध्ये एक निर्णय घेतला आहे की, एमएसएआरडीए विभागामध्ये रिक्षाचा प्रवास मुक्तपणे करता येईल. या बाबतीत अनेक प्रकारची अंदोलने झाली. विधिमंडळात अनेक वेळा यासंदर्भात चर्चा उपस्थित केलेली आहे. सभापती महोदय, आपण देखील या विषयाच्या अनुषंगाने अनेक वेळा बैठका घेतल्या. परंतु अजूनही त्या निर्णयाची अंमबजावणी होत नाही, त्यामुळे ठाणे शहरातील नागरिकांना फार मोठया त्रास होतो आहे. वयस्कर नागरिक, सामान घेऊन जाणारे प्रवाशी, यांना एका ठिकाणी उतरावयास लागते आणि अर्धा कि.मी. अंतर चालून दुसऱ्या रिक्षेतून प्रवास करावा लागतो. प्रवाश्यांना खूप त्रास होतो आहे. या संदर्भात आपण बैठका घेतल्या आहेत. मी जनते समवेत अंदोलने केली आहेत. परंतु या बाबतचा अजून कोणताही निर्णय घेतला जात नाही. माझी आपल्या माध्यमातून माननीय परिवहन मंत्र्यांना विनंती आहे की, 2005 मध्ये या संबंधी जो अध्यादेश काढला आहे, तो मागे घ्यावा. या निर्णयाची अंमलबजावणी प्रशासनाकडून करुन घेण्याची परिवहन विभागाची हिंमत नसेल तर तो अध्यादेश शासनाने मागे घ्यावा. आर.टी.ओ.यांच्या कार्यालयाकडून या निर्णयाची अंमलबजावणी करुन घेण्याची शासनामध्ये हिंमत नसेल तर त्यांनी तो निर्णय मागे घ्यावा. प्रवाशांना हिताचे होईल म्हणून या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी झाली पाहिजे. माननीय मंत्र्यांनी डिसेंबरच्या अधिवेशनात सांगितले होते की, या निर्णयाची निश्चितपणे अंमलबजावणी होईल. या संदर्भात बैठक घेतो असेही माननीय परिवहन राज्मंत्र्यांनी सांगितले आहे.

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर.........

परंतु अजूनही त्यासंबंधी निर्णय झालेला नाही. त्यामुळे आपल्या माध्यमातून मी सरकारला विनंती करतो की, मंत्री महोदय या ठिकाणी बसलेले आहेत, तातडीने तोडगा काढावा अन्यथा 2005 च्या जी.आर.ची अंमलबजावणी करण्याची ताकद नसेल तर तो जी.आर.मागे घ्यावा अशी आपल्या माध्यमातून विनंती करतो.

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, या प्रश्नाबाबत बैठक लावतो आणि निर्णय घेतो.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अशासकीय विधेयके**

**पृ.शी.**: इमारत बांधकाम व्यवसायातील कामगार
(नोकरीचे नियमन व कल्याण) विधेयक

**L. C. BILL NO. III OF 2011**

( A BILL TO REGULATE THE SERVICES OF NON-UNITED AND UNSECURED LABOUR WORKING IN THE BUILDINGS CONSTRUCTION INDUSTRY IN THE STATE AND TO MAKE PROVISIONS FOR THEIR WELFARE AND THE MATTERS CONNECTED THEREWITH AND INCIDENTAL THERETO. )

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2011 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक 3 राज्यातील इमारती बांधकाम व्यवसायातील असंघटित व असुरक्षित कामगारांच्या नोकरीचे नियमन व त्यांचे कल्याण यासाठी आणि तत्संबंधित व तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

सभापती महोदय, दुर्लक्षित कामगार वर्गाविषयी वेळोवेळी चर्चा होते. परंतु मला असे वाटते की, बांधकाम व्यवसायातील कामगार यापेक्षा दुसरा कोणता दुर्लक्षित कामगार वर्ग आहे असे दिसत नाही. बांधकाम व्यवसाय हा फक्त शहरापुरता मर्यादित राहिलेला नाही. महाराष्ट्रात नव्हे तर देशातील सर्व खेड्यापाड्यापर्यंत बांधकाम व्यवसाय चालतो. याचे कारण प्रत्येक कंपन्या येतात, त्यांना एक झोन ठरवून दिला जातो. केमिकल, फार्मास्युटिकल, इंजिनिअरिंग आणि कॉस्मेटिक्स इंडस्ट्री येते तेव्हा त्यांचे झोन ठरतात. त्या ठराविक भागामध्ये या कामगारांना काम मिळते. बांधकाम व्यवसायातील कामगार हा कुठे जाऊन काम करेल, कोणत्या विभागामध्ये काम करेल याची शाश्वती नसते. अशा तऱ्हेच्या केमिकल, फार्मास्युटिकल, इंजिनिअरिंग कंपन्यातील कामगारांना सर्व शासकीय नियम लागू होतात. आम्ही या कामगारांबाबत म्हणतो, 2 पंच आणि 1 लंच. या कामगारांना शासनाचे नियम लागू होतात. परंतु बांधकाम व्यवसायातील कामगारांना शासनाचे कोणतेही नियम लागू होत नाहीत. त्यांना एकच नियम लागू आहे, तो म्हणजे ज्या दिवशी काम त्याच दिवशी दाम. आजच्या कामावर पुन्हा ठेवतील का, ज्या साईटवर आज काम करतो तेथे पुन्हा काम मिळेल का याबद्दल ते साशंक असतात.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर.....

सभापती महोदय, आज मुंबई, पुणे, नाशिकसारख्या शहरात या व्यवसायातील कामगारांना काम मिळण्याची शाश्वती नाही. बांधकाम व्यवसाय जरुर वाढावा, मोठा व्हावा, दोन हातांना काम मिळावे ही आमची भावना आहे. ते काम मिळत असताना त्यांच्यामध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होणे, त्यांना कोणत्या तरी शासकीय नियमामध्ये समाविष्ट करण्याची गरज आहे. या व्यवसायात काम करणारे कामगार हे कुशल, अर्ध कुशल, अल्प कुशल काम करणारे, प्लंबर, पेंटर इ.स्वरुपाचे काम करणारे कामगार असतात. या कामगारांबाबत कोणतीही ध्येयधोरणे राबविली जात नाहीत. इतर कोणत्याही व्यवसायात काम करणारे व्यावसायिक त्यांचा नफा बघतात. तो नफा 15 ते 50 टक्के असू शकतो. परंतु बांधकाम व्यवसायातील व्यावसायिकांचा नफा जवळजवळ 100 टक्के म्हटला तरी चुकीचे ठरणार नाही. याची विभागणी अशी होते की, बांधकाम व्यवसायातील एक विकासक होतो, तो बिल्डर असतो, तो बांधकाम व्यावसायिकाला कॉन्ट्रॅक्ट देतो. बांधकाम व्यवसायातील कॉन्ट्रॅक्टर सब कॉन्ट्रॅक्ट देतो. या कामगारांची विभागणी कॉन्ट्रॅक्टर, सब कॉन्ट्रॅक्टर अशी चार-पाच ठिकाणी होते. अशा कामगारांना काम करीत असताना सुरक्षिततेची भावना शून्य आहे. त्याच पध्दतीने अपघाताचे प्रमाण जास्त आहे. मृत्यूचे प्रमाण देखील जास्त आहे. मृत्यू झाल्यानंतर या व्यवसायातील कामगारांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत दिली जाते. परंतु अपंगत्व आलेल्यांना आजपर्यंत आर्थिक मदत दिली असे माझ्या पाहण्यात आलेले नाही.

नंतर 2बी...1.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. किरण पावसकर .........

मग अशा बांधकाम कामगारांना आपले काम करीत असताना हेल्मेट, हँडग्लोज, युनिफॉर्म अशा वेगवेगळ्या सोई-सुविधा नसतात म्हणून या विधेयकाच्या माध्यमातून माझी शासनाला विनंती आहे की, ज्या पध्दतीने शासनाने माथाडी, हमाल तसेच सुरक्षा रक्षकांच्या कल्याणासाठी मंडळे स्थापन केली आहेत त्याच धर्तीवर बांधकाम व्यावसायिकांच्या कल्याणासाठी देखील वेगवेगळ्या योजना राबवाव्यात, असे या अशासकीय विधेयकाच्या निमित्ताने मी प्रस्तावित करीत आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. किरण पावसकर : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि. प. वि. क्रमांक-3 मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

-------

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पू. शी.** : बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा
हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक

**L. C. BILL NO. IV OF 2011**

( A BILL FURTHER TO AMEND THE RIGHT OF CHILDREN TO FREE AND COMPULSORY EDUCATION ACT, 2009 IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA. )

श्री. विनोद तावडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन 2011 चे वि. प. वि. क्रमांक 4- बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 महाराष्ट्र राज्यात लागू करताना त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

महोदय, सर्वोच्च न्यायालयाने अनेक खटल्यांमध्ये जगण्याच्या मूलभूत अधिकारासंबंधी घटनेच्या अनुच्छेद-21 चा विस्तार केला असून त्या सन्मानाने जगण्याचा अधिकार असे प्रतिपादन केले आहे. पण प्राथमिक शिक्षणाशिवाय हा अधिकार पूर्ण होत नाही, असे अनेक वेळा सर्वोच्च न्यायालयाने आपले मत व्यक्त केले आहे. त्यानंतर सन 2002 मध्ये माननीय अटलबिहारी वाजपेयी हे देशाचे पंतप्रधान असताना लोकसभेत शहान्नवावी घटना दुरुस्ती आली आणि प्राथमिक शिक्षणाच्या अधिकाराला मूलभूत अधिकाराचा दर्जा प्राप्त करुन दिला. तो म्हणजे प्रत्येक भारतीयाला जन्मत: प्राप्त होणारा अधिकार. त्यामुळे हा अधिकार राज्यशासनाला हिरावून घेता येणार नाही अशी दुरुस्ती त्या "ड" (3) मध्ये करण्यात आली. या दुरुस्तीमध्ये 6 ते 14 वयोगटातील प्रत्येक बालकाला मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार मिळाला. त्यानुसार शासनाने असे शिक्षण मोफत दिले पाहिजे असा त्याचा अर्थ अभिप्रेत आहे. अशा प्रकारे घटनेच्या मार्गदर्शक तत्वांप्रमाणे बालकांच्या शिक्षणाची जबाबदारी शासनाकडे आली. घटना दुरुस्तीमध्ये जे अधिकार बहाल करण्यात आले त्यांना केंद्रानेच जवळपास 7 वर्षाच्या काळात बालकांसाठी मोफत व सक्तीचा अधिकार देणारा कायदा 27 ऑगस्ट, 2009 मध्ये शासनाने लागू केला. त्यानंतर खऱ्या अर्थाने संपूर्ण देशात घटनेचा मूलभूत अधिकार सर्वार्थाने पोहचण्याचे काम या कायद्याच्या माध्यमातून झाले. पण केवळ यासंबंधीचा कायदा पारित झाला एवढ्यानेच भागत नाही तर मोफत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

शिक्षण तसेच मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे, त्यासाठी ठराविक परिसरातच शाळांची उपलब्धता अशा सर्व बाबी यात अभिप्रेत आहेत. पण वस्तुत: असेही दिसून येते की, जन्मदाखला नाही म्हणून शाळेत प्रवेश मिळाला नाही व परिणामी अनेक मुलांचे शिक्षण झाले नाही....

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ...

अशा प्रत्येक बारीक सारीक बाबीमुळे अनेक गोष्टी अडत होत्या. केन्द्र सरकारच्या या कायद्यामध्ये तरतुदी करण्यात आलेल्या असल्यामुळे देशातील सर्व नागरिकांना व सर्व मुलांना त्याचा लाभ होईल असे मला वाटते. परंतु केन्द्र सरकारच्या कायद्यामध्ये काही तरतुदींचा अभाव आहे. रोजगार हमी योजनेवर आधारित केन्द्र सरकारने रोजगार हमी योजना संपूर्ण देशामध्ये राबवली असे आपण अभिमानाने सांगत असतो. कै वि.स. पागे यांनी सुरु केलेल्या रोजगार हमी योजनेचे मॉडेल केन्द्र सरकारने उचलले आहे.त्यामुळे रोजगार हमी योजनेमध्ये आपले राज्य दिशादर्शक ठरले आहे. शिक्षण हा विषय कंकरन्ट लिस्टमधील आहे. केन्द्र सरकारने शिक्षणाच्या संदर्भात जो कायदा केलेला आहे त्या कायद्यावर आधारित आपल्या राज्याने स्वतंत्र कायदा केला तर देशभरातील इतर राज्यांना सुध्दा तो कायदा पथदर्शक ठरू शकतो. त्यामुळे आपल्या राज्याने स्वतंत्र कायदा का केला पाहिजे हे थोडक्यात मी सांगतो आणि हे अशासकीय विधेयक ज्यावेळी चर्चेला येईल त्यावेळी मी पुन्हा या विषयावर सविस्तर बोलणार आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील भौगोलिक आणि सामाजिक स्थिती वेगळी आहे. केन्द्र सरकारच्या कायद्यात अंपग मुलांच्या दृष्टीने विचार केलेला नाही. स्थलांतरित होणा-या ऊस तोडणी कामगारांच्या मुलांसाठी महाराष्ट्र राज्यात साखर शाळा काढण्यात आल्या आहेत. आमच्या भागात वीट भट्टीवर काम करण्यासाठी मजूर स्थलांतरित होत असतात त्यांच्या बरोबर त्यांची मुलेसुध्दा जात असतात. अशा प्रकारे स्थलांतरित होणा-या मुलांच्या शिक्षणाचा विचार केन्द्र सरकारच्या कायद्यामध्ये होऊ शकला नाही.कारण आपल्या राज्यात जशी परिस्थिती आहे तशीच परिस्थिती इतर राज्यामध्ये नसते. आपल्या राज्यात वेगळी स्थिती आहे तेव्हा या स्थितीचा विचार केला पाहिजे किंवा भटक्या व विमुक्त जातीच्या मुलांचा विचार केला पाहिजे आणि स्थलांतरित होणारी मुले शिक्षणाच्या प्रवाहात आली पाहिजेत आणि टिकली पाहिजेत या दृष्टीने जर राज्य सरकारने विशेष तरतुदी केल्या तर हा कायदा ख-या अर्थाने प्रभावी होऊ शकतो.

सभापती महोदय, शिक्षणाच्या संदर्भात केन्द्र सरकारने जो कायदा केलेला आहे. त्या कायद्याअंतर्गत उत्तरदायित्व काहीही ठरविण्यात आलेले नाही. केन्द्राने जो शिक्षण विषयक कायदा केलेला आहे त्या प्रमाणे राज्यांनी करावे असे सांगितलेले आहे. परंतु त्याप्रमाणे जर एखाद्या

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ...

राज्याने केले नाही तर काहीही होणार नाही. आज राजकीय पध्दतीवरील लोकांचा विश्वासच उडत चालला आहे. त्यामुळे श्री.अण्णा हजारे यांनी केलेल्या आंदोलनाला सर्व स्तरातून पाठिंबा मिळत आहे. केन्द्र सरकारने जो कायदा केलेला आहे तो कायदा मी स्वत: वाचला व त्या संबंधी मी अनेक जणांबरोबर चर्चा देखील केली होती.केन्द्र सरकारने जो कायदा केलेला आहे त्याप्रमाणे जर इतर राज्याने केले नाही तर काहीही होणार नाही. म्हणजेच यामध्ये उत्तरदायित्व काहीही नाही.अशा प्रकारे जर उत्तरदायित्व नसेल तर हा कायदा किती प्रभावीपणे अंमलात येईल याची शंका येते. केन्द्रातील सरकाराने सर्वार्थाने विचार करुन जर काही गोष्टी त्या विधेयकात आणल्या असतील आणि त्या जर अंमलात आणल्या नाही तर काय होणार आहे ? काहीही होणार नाही. म्हणून दात नसलेल्या कायद्याप्रमाणे हा कायदा होऊन बसेल व फक्त कागदी घोडे नाचवले जातील.तेव्हा असे न होता या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावयास पाहिजे याकरिता काही तरतुदी त्यामध्ये करण्याची आवश्कता आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, 3 ते 6 वयापर्यतच्या मुलांना देण्यात येणारे पूर्व प्राथमिक शिक्षण हे फार महत्वाचे आहे. या वयामध्ये जे काही शिकवले जाते त्या शिक्षणाचा प्रभाव आणि परिणाम मोठया प्रमाणावर होत असतो हे संशोधनाअंती सिध्द झालेले आहे. त्यामुळे 3 ते 6 वर्ष वयाच्या मुलांच्या पूर्व प्राथमिक शिक्षणाचा समावेश केन्द्र सरकारच्या कायद्यात नाही. माझी मुलगी ज्या शाळेत जाते त्या शाळेमध्ये सिलॅबस बरोबर अशी कनसेप्ट आहे की. दुधाचे दात पडून पक्के दात येईपर्यत मुलांची शैक्षणिक, शारीरिक आणि भावनिक वाढ होत असते परंतु आपल्या सगळया अभ्यासक्रमामध्ये फक्त बौध्दिक वाढीसबंधीचा समावेश करण्यात आला आहे त्यामध्ये भावनिक बाबी सबंधीचा समावेश करण्यात आलेला नाही व त्याचा कोठेही विचार होत नाही. या वयोगटातील मुलांच्या शिक्षणाच्या या विषयासबंधीचा उल्लेख केन्द्र सरकारच्या कायद्यामध्ये कोठेही करण्यात आलेला नाही.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

त्यामुळे आपल्या कायद्यामध्ये त्यादृष्टीने तरतूद करण्याची आवश्यकता आहे. आज मुलांना त्याच इयत्तेमध्ये बसविता येणार नाही, किंवा त्यांना शाळेतून काढून टाकता येणार नाही असे त्या कायद्यामध्ये म्हटले आहे ही गोष्ट चांगली आहे. त्या मुलाला नापास करता येत नसल्यामुळे इयत्ता दहावीपर्यंत पास करीत नेल्यानंतर इयत्ता 10 वीमध्ये त्याला काहीच येत नाही असे होता कामा नये. त्याला नापास करता येत नसेल तरी देखील त्याचा गुणात्मक दर्जा तपासण्याची व्यवस्था केली पाहिजे. आज आपल्याकडील जिल्हा परिषदेच्या शाळांचा दर्जा तपासण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. अशा शाळांचा दर्जा चांगला नसेल तर काय करायचे? त्याबाबत काहीच उत्तर नाही. परंतु बाकीच्या अनुदानित शाळांना मात्र जे नियम लागू आहेत ते या शाळांना लागू नाहीत. अशा गोष्टींचा आपण त्यामध्ये अंतर्भाव केला पाहिजे. अशाप्रकारे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळांमधून आमूलाग्र बदल होण्याची आवश्यकता आहे.

मी या ठिकाणी 5-6 मुद्दे मांडले आहेत. केंद्र सरकारने हा कायदा चांगल्या हेतूने आणला आहे त्याबद्दल अभिनंदन केले पाहिजे. सरकार कोणत्या पक्षाचे आहे हा त्यामधील मुद्दा नाही. परंतु कंटिन्युअस प्रोसेसमध्ये माननीय अटलजींनी एक कायदा आणल्यानंतर त्याला जोडून हा कायदा आल आहे. आपण नेहमी हे राज्य शाहू,फुले आंबेडकरांचे आहे असे म्हणतो. या राज्यामध्ये शिक्षणासह सर्व गोष्टींमध्ये आपले पुरोगामित्व असल्याचे आपण मान्य करतो, ते देशाने देखील मान्य केले आहे. अशावेळी या कायद्याची आपल्या राज्यामध्ये अंमलबजावणी करीत असतांना केंद्राने केवळ त्याचा अनुवाद करुन तो आपल्याकडे पाठविला आहे. त्याचा जो भाव आहे, तो यामध्ये येऊ शकला तर ते स्पीरीट आपल्या राज्याच्या नवीन सुधारणा कायद्यामध्ये आणता येईल. त्या दृष्टीने आपण हा कायदा करावा यासाठी मी हे अशासकीय विधेयक आणले आहे. हे वरिष्ठांचे सभागृह असून नवीन शैक्षणिक वर्ष जून महिन्यापासून सुरु होत असल्यामुळे याबाबत आपल्याला घाई करावी लागणार आहे. या विधेयकाची मांडणी झाल्यानंतर त्याची पुढील प्रोसेस सुरु होईल. या करिता आपल्या राज्याचा एक वेगळा कायदा आपण करु शकलो तर देशभरातील सर्व राज्यांना हा एक पथदर्शक कायदा होऊ शकेल. खऱ्या अर्थाने शाहू, फुले आणि आंबेडकरांचे नाव घेण्यास आपण हकदार आहोत असे म्हणता येईल. या उद्देशाने मी हे अशासकीय विधेयक आणले आहे, ते मांडण्यास सभागृहाने अनुमती द्यावी अशी मी विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/

**उप सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि. प. वि. क्रमांक 4 मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

-----

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अशासकीय ठराव**

**पृ.शी.**: राज्यात तालुक्याच्या ठिकाणी सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असण्याची आवश्यकता

**मु.शी.**: राज्यात तालुक्याच्या ठिकाणी सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असण्याची आवश्यकता या विषयावरील श्री.हुसेन दलवाई वि.प.स.यांचा ठराव

श्री.हुसेन दलवाई (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील ठराव मांडतो.

"राज्यात तालुक्याच्या ठिकाणी सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असावीत, जेणेकरुन तालुक्याच्या ठिकाणी येणाऱ्या ग्रामीण भागातील जनतेला त्यांच्या कामासाठी वेगवेगळया कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही, तसेच आर्थिक भूर्दंड सोसावा लागणार नाही, यासाठी शासनाने योजनाबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

सभापती महोदय, विशेषत: तहसीलदारांची जी कार्यालये असतात, त्याबाबतीत सांगावयाचे तर एक कार्यालय एका ठिकाणी, तालुक्याचा जो तलाठी असतो त्याचे कार्यालय दुसऱ्या ठिकाणी, सर्कलची कार्यालये वेगळया ठिकाणी, पोलीस स्टेशन वेगळया ठिकाणी, प्रांत ऑफीस वेगळया ठिकाणी असते. त्यामुळे खेडेगावतील लोकांना सतत एका कार्यालयातून दुसऱ्या कार्यालयामध्ये पायपीट करावी लागते. त्यात सुध्दा अतिशय गंभीर बाब अशी आहे की, आपल्याला काही तहसीलदारांच्या कार्यालयामध्ये जाण्यासाठी सुध्दा भीती वाटावी अशी त्या कार्यालयांची स्थिती आहे. ती कार्यालये अतिशय जीर्ण झालेली असून त्यांची दुरुस्ती देखील होऊ शकणार नाही, त्याची रंगरंगोटी देखील करता येणार नाही अशी परिस्थिती आहे. तसेच कोणत्याही कार्यालयामध्ये गेल्यानंतर तेथील फायली वाटेल तशा पडलेल्या असतात आणि त्यामुळे फायली गहाळ होण्याचे हे देखील एक कारण आहे.

सभापती महोदय, माझे असे म्हणणे आहे की, आता महाराष्ट्राकरता बऱ्यापैकी निधी उपलब्ध झालेला आहे. हा निधी केवळ काही ठिकाणी असलेल्या कार्यालयांच्या दुरुस्तीसाठी आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई . . . .

काही ठिकाणी असलेल्या कार्यालयांच्या अधुनिकीकरणासाठी वापरला जातो, तसा तो तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या कार्यालयांसाठी देखील वापरणे आवश्यक आहे. ही कार्यालये एकाच ठिकाणी ठेवण्यात आली तर लोकांची फार मोठी सोय होईल. खरे म्हणजे तालुक्याच्या ठिकाणी असलेले कोर्ट देखील तालुक्याच्या कार्यालयामध्ये असावे आणि अशा प्रकारे त्याठिकाणी सर्व सरकारी प्रशासकीय कार्यालयांचा एक कॉम्प्लेक्स तयार करावा. असे झाले तर मग लोकांना खऱ्या अर्थाने न्याय मिळू शकेल आणि लोकांचा त्रास कमी होण्यास मदत होईल.

सभापती महोदय, सध्या अशी स्थिती आहे की, एखाद्या कार्यालयामध्ये गेल्यानंतर लोकांना एखाद्या पेपरसाठी दुसऱ्या कार्यालयामध्ये जाण्याबाबत सांगितले जाते.परंतु दुसऱ्या कार्यालयामध्ये जाऊन तेथील काम करुन तो माणूस परत कार्यालयामध्ये येईपर्यंत कार्यालयाची वेळ संपलेली असते. ही जी सगळी पायपीट आहे ती दूर झाली पाहिजे. तेथील कार्यालयांचे आधुनिकीकरण केले पाहिजे. तसेच तेथे सगळे कॉम्प्युटरायझिंग केले पाहिजे. परंतु प्रत्यक्षात या कार्यालयांमध्ये फायली ठेवण्यासाठी कपाटे देखील नसतात. त्यामुळे बऱ्याच वेळा रेकॉर्डच मिळत नाही. तहसीलदार कार्यालयामध्ये महसूलाचा जमिनीचा रेकॉर्ड असतो. पण बऱ्याच वेळेला हे रेकॉर्ड उपलब्धच होत नाही. कारण तो कसाही ठेवला जातो आणि मग कधी पूर आला म्हणून रेकॉर्ड वाहून गेले किंवा वाळवी लागल्याने कागदपत्रे खराब झाली किंवा इमारत कोसळल्यामुळे कागदपत्रे गहाळ झाली इ.प्रकार घडतात. यासंदर्भात मी याठिकाणी अशासकीय ठराव दिलेला आहे. माझी नम्र विनंती आहे की, सरकारने याबाबतीत ताबडतोब काही उपाययोजना करावी. मी असे म्हणणार नाही की, सर्व तहसिलदारांची कार्यालये ताबडतोब सुधारता येतील. पण प्रत्येक वर्षी काही कार्यालये सुधारण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला तर येत्या 10 वर्षामध्ये मुंबईसारख्या ठिकाणी जसे आधुनिकीकरण करण्यात आलेले आहे किंवा काही कलेक्टरच्या कार्यालयामध्ये जशी सुधारणा केलेली आहे, त्याप्रमाणे तहसिलदारांच्या कार्यालयामध्ये देखील सुधारणा होईल अशी अपेक्षा आहे आणि या दृष्टीकोनातूनच मी हा ठराव मांडलेला असून तो संमत करावा अशी मी विनंती करतो.

ठराव प्रस्तुत झाला.

. . . .2 ई-3



APR/ KTG/ 13:05

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांनी अतिशय महत्वाच्या विषयाकडे सभागृहाचे लक्ष वेधलेले आहे. त्याबाबत सांगावयाचे तर अनेक लोकांना छोट्या-छोट्या बाबतीत संमती घेण्यासाठी शासकीय कार्यलयांमध्ये जावे लागते आणि त्यांना तेथे खूप ठिकाणी फिरावे लागते. मला असे वाटते की, कल्याण आणि येवला येथे एकाच इमारतीमध्ये सर्व शासकीय कार्यालये आहेत.तसेच कल्याण येथील शासकीय कार्यालयामध्ये न्यायालय सुध्दा आहे. त्यामुळे बाहेरुन किंवा इतर लांब ठिकाणाहून जे लोक येतात, त्यांना ते खूप सोयीचे होते. याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी ठरावाच्या माध्यमातून सूचना केलेली आहे की, सर्व तालुक्यांच्या ठिकाणी यादृष्टीकोनातून अंमलबजावणी व्हावयास पाहिजे आणि ही बाब खूप महत्वाची आहे असे मला वाटते. याबाबत लवकरात लवकर शासनाने कार्यवाही करण्याच्या दृष्टीने विचार करावा. कारण अनेक लोकांना तेथे कामा निमित्ताने जावे लागते. तसेच जे गरीब लोक आहेत त्यांना काही वेळेस आपल्या कामाच्या ठिकाणी रजा नसताना, खाडा करुन संबंधित कचेऱ्यांमध्ये जावे लागते.

**(सभापतीस्थानी - तालिका सभापती (ॲड.उषाताई दराडे)**

यानंतर श्री.बरवड . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण .....

जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये किंवा तहसील कार्यालयामध्ये गेल्यानंतर हा कागद आणा किंवा अमुक ठिकाणी जा म्हटल्यानंतर दुसऱ्या दिवशी परत रजा घेऊन त्यांना दुसरीकडे जावे लागते. पैसा आणि वेळ वाचविण्यासाठी या बाबत फार गांभीर्याने विचार व्हावा असे मला वाटते. एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदया, या सभागृहाचे आदरणीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांनी जो अशासकीय ठराव मांडलेला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. आदरणीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांनी हा ठराव मांडताना या ठिकाणी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत, जे विचार मांडलेले आहेत त्या मताशी मी सहमत आहे. मी त्यांचा विचारांचे समर्थन करतो. ही बाब खरी आहे की, तालुका स्तरावर वेगवेगळ्या विभागांची जी सर्व कार्यालये आहेत ती एकाच ठिकाणी असणे सर्वसामान्य जनतेसाठी, नागरिकांसाठी आणि त्या कार्यालयामध्ये कामासाठी येणाऱ्या लोकांसाठी अत्यंत आवश्यक आणि सोयीचे आहे.

सभापती महोदय, मी आपल्याला एक उदाहरण सांगतो. आमच्या उल्हासनगर तालुक्याचे तहसीलदार कार्यालय उल्हासनगर शहरामध्ये आहे. पण आमच्या उल्हासनगर तालुक्याच्या पंचायत समितीचे कार्यालय अंबरनाथला आहे. म्हणजे उल्हासनगरच्या लोकांना किंवा उल्हासनगर तालुक्यातील ग्रामीण भागातील लोकांना काही कामानिमित्त पंचायत समितीमध्ये जावयाचे असेल तर त्यांना अंबरनाथ येथे जावे लागते. आतापर्यंत अंबरनाथ आणि त्या परिसरातील भाग उल्हासनगर तालुक्यामध्ये समाविष्ट होता. आता नव्याने अंबरनाथ तालुका निर्माण झाला आहे. अंबरनाथ तालुक्यासाठी प्रशासकीय इमारतीचे बांधकाम सुध्दा झाले आहे. परंतु आजही उल्हासनगर तालुक्याच्या पंचायत समितीचे कार्यालय अंबरनाथ येथेच आहे. म्हणजे एका तालुक्याचे शासकीय कार्यालय दुसऱ्या तालुक्याच्या गावामध्ये आहे. त्यामुळे त्यामध्ये बदल होणे आवश्यक आहे. शासनाने मध्यंतरी नवीन तालुके निर्माण करण्याची घोषणा केली आणि त्याची अंमलबजावणी सुरु झाली. पण ही अंमलबजावणी झाल्यानंतर सुध्दा ही विविध विभागांची शासकीय कार्यालये एकाच ठिकाणी आणण्याचे काम होणे आवश्यक आहे. ते काम अजून झालेले नाही. या निमित्ताने माझी शासनाला विनंती आहे की, जनतेच्या सोयीसाठी ही सर्व कार्यालये एकाच ठिकाणी आणावीत. अर्थात त्यासाठी शासनाला काही उपाययोजना करावी लागेल, निधी उपलब्ध करुन द्यावा लागेल. तालुका निर्मिती होऊन आज 8-10 वर्षे होऊनही त्या तालुक्यातील सर्व विभागांची कार्यालये एका केंद्रीय इमारतीमध्ये येऊ शकली नाही. म्हणून या ठरावाच्या निमित्ताने मी विनंती करतो की, तालुका स्तरावरील सर्व विभागांची कार्यालये एकाच केंद्रीय इमारतीमध्ये यावीत.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/

श्री. रामनाथ मोते ....

सभापती महोदय, मी उल्हासनगरचा उल्लेख केला. आमच्या उल्हासनगर तालुक्याच्या पंचायत समितीचे कार्यालय तातडीने उल्हासनगरला कसे आणता येईल ते पहावे. आमच्या शिक्षण विभागाचे कार्यालय अंबरनाथला आहे. आमच्या तालुक्याचे गट शिक्षण अधिकारी अंबरनाथला बसतात, त्यामध्ये सुध्दा बदल कसा करता येईल या दृष्टीकोनातून शासनाने विचार करावा अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

---

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांनी जो अशासकीय ठराव क्रमांक 37 मांडलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. राज्यामध्ये काही ठिकाण्ी जी तहसील कार्यालये आहेत ती मुख्य शहरापासून लांब आहेत. उदा. मालवणचे तहसील कार्यालय आरसेमहल येथे समुद्राच्या टोकावर आहे. ते कार्यालय मूळ शहरापासून फार लांब आहे. इंग्रजांनी ज्या ठिकाणी इमारत बांधली होती त्याच ठिकाणी ते कार्यालय आहे. इमारत सुंदर आहे हे मान्य आहे पण शहरापासून तहसीलदार कार्यालय फार लांब आहे. त्यामध्ये काहीही बदल केलेला नाही. त्यामध्ये आमुलाग्र बदल करावा. वेंगुर्ला येथे सुध्दा तीच परिस्थिती आहे.

सभापती महोदय, श्री. अंतुले साहेबांचे एक स्वप्न होते. ते ज्यावेळी मुख्यमंत्री झाले त्यावेळी त्यांनी मंत्रालय उरणला नेण्याची घोषणा केली होती. त्यांनी एक प्रयोग केला. नवीन मुंबई येथे कोकण भवन इमारत बांधली. त्या कोकण भवन इमारतीमध्ये सर्व डिव्हिजनल कार्यालये आली. त्या ठिकाणी विविध प्रकारची कार्यालये आली. माझी अशी सूचना आहे की, ज्या ठिकाणी प्रांत ऑफीस आहे, उदा. चिपळूणला प्रांत ऑफीस आहे, तिकडचे जवळचे जे तहसील कार्यालय असेल ते त्या प्रांत ऑफीसमध्ये असावे. कणकवलीचे प्रांत कार्यालय ज्या ठिकाणी असेल त्या ठिकाणी तेथील तहसील कार्यालय आणले पाहिजे. चार ते पाच तालुक्यांचा एक प्रांत असतो. त्या प्रांत कार्यालयाच्या जवळपास किंवा प्रांत कार्यालयाच्या ठिकाणी जर एक कॉम्प्लेक्स तयार केला आणि ही सगळी कार्यालये जर त्या ठिकाणी आली तर ते सोयीचे होईल.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण.....

इंग्रजांनी बांधलेली जी कार्यालये आहेत त्यामध्ये आमुलाग्र बदल केला पाहिजे. इंग्रजांनी बांधल्या इमारतींमध्येच ही कार्यालये चालू आहेत. कोर्ट सुध्दा तेथेच आहे, रायटर तेथेच बसतात, वकील तेथेच बसतात. तेथेच चहा मागवितात. शौचालय सुध्दा तेथेच आहे. कणकवली, मालवण या ठिकाणच्या शासकीय इमारती 250-300 वर्षापूर्वीच्या आहेत, त्यात अतिशय टिपीकल स्थिती दिसते. आज संगणकाच्या युगामध्ये आपण आहोत. परंतु तेथे त्याचा मागमूसही दिसत नाही. तेथे अनकल्चर्ड परिस्थिती दिसून येते. एखाद्या शासकीय कार्यालयात गेल्यावर मन प्रसन्न झाले पाहिजे. तेथे लोकांना ऊर्जा मिळाली पाहिजे. पण तेथे गेल्यावरच आम्ही अर्ध मेले होतो. तहसीलदार कार्यालयात काम करणारे तहसीलदार, अव्वल कारकून आहेत. मालवण तहसीलदार कार्यालय आरसे महालच्या बाजूला म्हणजे किती तरी लांबच्या ठिकाणी आहे. हे जुने ठिकाण आहे, तेथे काही मंदिरे आहेत, लोक तेथे देवाची पूजा करतात, गाऱ्हाणी घालतात यामध्ये बदल व्हावा अशी मी सूचना करतो. सभापती महोदय, आपण मला बोलण्याची परवानगी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांनी महत्वाच्या विषयावर अशासकीय ठराव मांडला आहे. त्याचे समर्थन करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, सर्व सामान्य जनतेसाठी आवश्यक असलेला विषय त्यांनी आज सभागृहात मांडला आहे त्याबद्दल मी प्रथम त्यांचे अभिनंदन करतो. संपूर्ण महाराष्ट्रात पाहिले तर शासकीय कार्यालये वेगवेगळ्या ठिकाणी असतात. ती सर्व कार्यालये एकाच ठिकाणी आणण्याची गरज आहे. आज काळ जलद गतीने जात आहे. त्यामुळे लोकांच्या अपेक्षा वाढलेल्या आहेत. शासकीय कार्यालयात गेल्यावर एका दिवसात काम झाले पाहिजे अशी सर्वांची अपेक्षा असते आणि ती अयोग्य आहे असे मला वाटत नाही. परंतु आज कोणाचेही एका दिवसात काम होत नाही. त्यामुळे लोकांना या कार्यालयात अनेक वेळा हेलपाटे मारावे लागतात, त्यांना नाहक आर्थिक भूर्दंड सहन करावा लागतो, मनस्ताप सहन करावा लागतो. सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांनी सांगितल्या प्रमाणे तालुक्याच्या ठिकाणी तहसीलदार, पटवारी, महसूल निरीक्षक यांची कार्यालये एकाच ठिकाणी असणे अत्यंत आवश्यक आहे. तलाठी कोणत्या तरी एका गावात बसतो. महसूल निरीक्षकाचे कार्यालय कोठे तरी असते. तहसीलदारांचे कार्यालय वेगळ्या ठिकाणी असते. माझे एक काम असेल तर 3 ठिकाणी जावे लागते. त्यामुळे श्रम वाया जातात व आर्थिक भार सोसावा लागतो. त्यामुळे तहसीलदार कार्यालयाच्या ठिकाणी मिनी मंत्रालय असावयास पाहिजे. त्या ठिकाणी सर्व सुविधा उपलब्ध झाल्या पाहिजेत. त्यामुळे लोकांची सहज कामे होऊ शकतील.

सभापती महोदय, भूमापन अधिकाऱ्यांचे कार्यालय तालुक्याच्या ठिकाणी असते.या कार्यालयाची सुध्दा वाईट अवस्था आहे. त्या ठिकाणी अधिकारी उपलब्ध नसतात, कर्मचारी उपलब्ध नसतात. शेतकऱ्यांना या कार्यालयात शेतीच्या भूमापनासाठी जावे लागते. त्यासाठी या कार्यालयात येऊन अर्ज करतात, पैसे भरतात, परंतु 6-6 महिने शेतीचे मोजमाप करुन मिळत नाही, अधिका-यांकडून कोणताही प्रतिसाद दिला जात नाही. शेतकऱ्यांना न्याय मिळाला नाही तर ते लोकप्रतिनिधींकडे येतात. लोकप्रतिनिधींना त्यांच्या कामासाठी पाठपुरावा करावा लागतो. अशा प्रकारे ही समस्या जटील झाली आहे. या कार्यालयांमध्ये गैरप्रकार होत असतात. एखाद्याची

2....

09-04-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) GG-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/

श्री.केशवराव मानकर...

जमीन दुसऱ्याच्या नावावर केली जाते, फेरफारात बदल केला जातो.  भूमापनामध्ये गैरप्रकार करुन मूळ मालकाची जमीन दुसऱ्याच्याच नावावर केली जाते. या संदर्भात तक्रारी झाल्यावर संबंधित अधिकारी कधीही सापडत नाहीत.  म्हणून मला या अशासकीय ठरावाच्या निमित्ताने शासनाला सूचना करावयाची आहे की, तहसीलदार यांच्या नियंत्रणाखाली भूमापन अधिकाऱ्यांना आणले पाहिजे.  जेणे करुन त्यांच्यावर नियंत्रण ठेवता येईल.

सभापती महोदय, ट्रेझरी कार्यालय सुध्दा तालुक्याच्या ठिकाणी असणे आवश्यक आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील ट्रेझरी कार्यालये तालुक्याच्या ठिकाणी नाहीत. या कार्यालयात आर्थिक देवाणघेवाण मोठ्या प्रमाणावर चालते. त्यामुळे जनतेला त्याचा त्रास सहन करावा लागतो. ज्या ठिकाणी तहसीलदारांचे कार्यालय आहे तेथेच ट्रेझरीचे कार्यालय असावयास पाहिजे अशी माझी मागणी आहे.

अनेक माणसांकडून जमीन किंवा घर खरेदी विक्रीचे व्यवहार केले जातात.  या व्यवहाराची कागदपत्रे रजिस्टर करावी लागतात. त्यामुळे उपनिबंधकाचे कार्यालय तहसीलदार कचेरी जवळ असणे अत्यंत आवश्यक आहे. आमगावला उपनिबंधकाचे कार्यालय तहसीलदार कार्यालयापासून 1.5 कि.मी.अंतरावर असून त्या कार्यालयाची इमारत भाड्याने घेतलेली आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर....

त्या कार्यालयामध्ये कोणतीही व्यवस्था नाही. तेथे बसण्यासाठी जागा नाही. मी या सदनामध्ये अनेक वेळा ही बाब निदर्शनास आणून दिलेली आहे. ज्या कार्यालया मार्फत सरकारला राजस्व प्राप्त होते, कोटयवधी रुपयांचा महसूल प्राप्त होतो अशा कार्यालयामध्ये येणा-या लोकांसाठी साधी बसण्याची, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असली पाहिजे. मुंबईतील उप निबंधकाच्या कार्यालयाची देखील तीच अवस्था आहे. मुंबईला आम्ही एका रजिस्ट्रेशनच्या कामासाठी उप निबंधकाच्या कार्यालयात गेलो होते. तेथे बसायला जागा नाही आणि पिण्यासाठी पाणीही नाही. अशा प्रकारची अवस्था सर्वच कार्यालयामध्ये आहे. तालुका निबंधक कार्यालया मार्फत राज्याला मोठ्या प्रमाणावर कर मिळतो. उप निबंधकाच्या कार्यालयामध्ये डॉक्युमेंट रजिस्टर करण्यासाठी येणा-या लोकांना खूप वेळ थांबावे लागते. तेथे लोकांसाठी बसण्याची, पिण्याची व्यवस्था असायला पाहिजे. या कार्यालयात अधिकारी उपस्थित नसतात असा अनुभव आहे. लोकांची गैरसोय होऊ नये म्हणून अधिका-यांनी कार्यालयात वेळेवर हजर राहिले पाहिजे.

सभापती महोदय, तहसील कार्यालयामध्ये स्टॅम्प व्हेण्डॉरचे कार्यालय असणे आवश्यक आहे. त्यामुळे लोकांना स्टॅम्प पेपर लगेच उपलब्ध होतील आणि आपल्या डॉक्युमेण्टचे रजिस्ट्रेशनही लगेच करता येईल. सायंकाळी 5.00 वाजता कार्यालये बंदे होतात. जर स्टॅम्प व्हेण्डॉर अन्य ठिकाणी दूरवर असेल तर त्याच्याकडून स्टॅम्पपेपर घेऊन येण्यामध्ये वेळेचा अपव्यय होतो. म्हणून तहसील कार्यालयामध्ये स्टॅम्प व्हेण्डारचे कार्यालयही असले पाहिजे.

सभापती महोदय, तहसील कार्यालयातील सर्व विभागाच्या कामकाजाचे संगणकीकरण झाले तर लोकांना तसेच त्या त्या विभागातील कार्यालयांना कोणतीही माहिती ताबडतोबीने प्राप्त होऊ शकेल. म्हणून हे संगणकीकरण होणे अत्यंत आवश्यक आहे. तालुक्याच्या ठिकाणी प्रांत अधिकारी असतील तर त्यांच्या संपूर्ण कार्यालयाचे संगणकीकरण झाले पाहिजे. जिल्ह्याच्या ठिकाणी देखील अशीच व्यवस्था असली पाहिजे. मंत्रालयामध्ये ज्या प्रमाणे सर्व विभाग एकाच इमारतीमध्ये आहेत त्याप्रमाणे तालुका, प्रांत आणि जिल्ह्याच्या ठिकाणी देखील सर्व विभाग लोकांच्या सोयीच्या दृष्टीने एकाच ठिकाणी असणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांनी मांडलेल्या अशासकीय ठरावाला अनुमोदन देत असताना या अशासकीय ठरावाच्या अनुषंगाने शासनाने

..2..

श्री. केशवराव मानकर...

आपल्या ध्येय धोरणामध्ये बदल करुन ग्रामीण भागातील जनतेला दिलासा द्यावा अशी मी या निमित्ताने मागणी करतो आणि माझे भाषण संपवितो.

----

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांनी मांडलेल्या अशासकीय ठरावाला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आज ग्रामीण भागामध्ये ज्या पध्दतीची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आहे ती पाहिल्यानंतर या अशासकीय ठरावाच्या माध्यमातून जी काही मागणी केलेली आहेत तिचे महत्व लक्षात येईल. ग्रामीण भागामध्ये विविध ठिकाणी विविध कार्यालये असतात. अनेक वेळा लोकांना एका कार्यालयातून दुस-या कार्यालयात जावे लागते. एकाच विभागाची कार्यालये वेगवेगळया ठिकाणी असतात. एक अधिकारी एका इमारतीमध्ये बसतो तर दुसरा अधिकारी दुस-या ठिकाणी बसतो. त्या काळामध्ये जसजशा जागा मिळत गेल्या तसतशी कार्यालये थाटली गेली. या कार्यालयांच्या बाबतीत कुठे तरी सुसूत्रता असणे आवश्यक आहे. आज दिल्लीमध्ये प्रत्येक मंत्रालयाची एक स्वतंत्र इमारत असून त्या इमारतीमध्ये त्या मंत्रालयाचे सर्व अधिकारी बसतात. ग्रामीण भागातील जनतेच्या विषयानुरुप ज्या गरजा आहेत त्या पूर्ण व्हाव्यात असे वाटत असेल तर सर्व विभागाचे अधिकारी एकाच इमारतीमध्ये असणे आवश्यक आहे अशी मागणी करणारा हा ठराव आहे. हा अतिशय चांगला आणि अत्यंत आवश्यक अशा प्रकारचा ठराव आहे. या ठरावावर बोलताना माननीय मंत्री महोदयांकडून असे सांगितले जाईल की, अशा प्रकारच्या इमारती बांधण्यासाठी मोठ्या निधीची आवश्यकता असून शासनाकडे तेवढया निधीची उपलब्धता नाही. असे जरी असले तरी या चांगल्या कामासाठी शासनाने मार्ग काढण्याचे काम केले पाहिजे, असे मला स्वत:ला वाटते.

सभापती महोदय, आज ग्रामीण भागातील तरुण शिक्षित झालेला आहे. तो विविध प्रकारचे शैक्षणिक आणि तांत्रिक ज्ञान आत्मसात करु लागलेला आहे. ग्रामीण भागातील शाळांतून संगणकाचे प्रशिक्षणही दिले जाते. एकंदरीत ग्रामीण भागालाही आता अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि सोयीसुविधांची माहिती व्हायला लागलेली आहे. आज महसूल खात्यातील काही कामे आपणाला संगणकीकरणाच्या माध्यमातून करणे फार सोपे झालेले आहे. ग्रामीण भागातील काही ठिकाणी 7/12चे उतारे संगणकाच्या माध्यमातून उपलब्ध होत आहेत. आपण ज्या काही सेवा देऊ इच्छितो त्या सेवा कुठेही बाहेर न जाता घरात बसून संगणकावर उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था केली तर त्याचा ग्रामीण भागातील जनतेला निश्चित फायदा होईल.

....नंतर श्री गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KTG/ प्रथम श्री.शिगम 13:25

श्री. प्रकाश बिनसाळे...

मला वाटते की, ग्रामीण भागातील जनता शारीरिक कष्ट मोठया प्रमाणावर करीत असते. त्यांना आरोग्य सांभाळण्यासाठी पायपीट करण्याची काहीही गरज नसते. शहरी भागातून ज्या व्यक्ती नेहमी फोर व्हीलर गाडीतून फिरतात, त्यांच्यासाठी पायपीट करण्याची गरज आहे. ग्रामीण भागातील लोकांना पायपीट करण्याची काही गरज पडत नाही. या विधेयकाच्या माध्यमातून शासनाने जाणीवपूर्वक हे काम केले पाहिजे अशी सूचना या निमित्ताने करतो व या ठरावास मी अनुमोदन देतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो.

--------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे : (पुणे विभाग शिक्षक ) : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांनी जो ठराव सभागृहात मांडला आहे, तो सर्व सदस्यांचे लक्ष खेचून घेणारा आहे. या ठरावाच्या अनुषंगाने काही सन्माननीय सदस्यांनी आपले मनोगत व्यक्त केले, परंतु त्यांच्या मनोगतातील मुद्यांची पुनरावृत्ती न करतो मी फक्त दोन, तीन मुद्दे या ठिकाणी मांडणार आहे. आपल्याकडे प्रत्येक तालुक्यात तीन कार्यालये आहेत. एक ब्रिटीश काळात बांधलेली, शासनाने गेल्या 50-60 वर्षात बांधलेली व शासनाने न बांधलेली पण भाडयाच्या ठिकाणी असलेली अशा प्रकारची तीन कार्यालये तालुक्याच्या ठिकाणी कार्यरत आहेत. येणा-या जाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला त्रासदायक ठरणारी अशी ही कार्यालये आहेत. परंतु शासनाने गेल्या चार, पाच वर्षापासून या गोष्टीकडे लक्ष घातलेले आहे ही बाब लक्षात येते. काही ठिकाणी शासकीय कार्यालयांसाठी टोलगंज इमारती बांधल्या जात आहेत. ती बाब निश्चितच स्वागतार्ह आहे. ज्या नवीन इमारती बांधल्या जात आहेत.शासकीय कार्यालये एकाच प्रिमायसेसमध्ये असली पाहिजे अशी या ठिकाणी काही सन्माननीय सदस्यांनी भावना व्यक्त केली आहे. त्या भावनेला गवसणी घालणाऱ्या नवीन प्रशासकीय इमारती बांधल्या जात नाहीत, ही महत्वाची गोष्ट मी शासनाच्या निदर्शनास आणून देतो आहे. या इमारतीमध्ये शासनाची जेवढी जेवढी खाती असतात, तेवढी तालुक्याच्या ठिकाणी कार्यालये असतात. शासनाची सर्व खात्याची कार्यालये एकाच प्रिमायसेसमध्ये यावेत यासाठी एक चांगले मॉडेल तयार करुन ते संपूर्ण राज्यामध्ये राबविले गेले तर प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणच्या लोकांचा त्रास कमी होईल. ही सर्व कार्यालये एकाच ठिकाणी बांधली गेली पाहिजेत. त्याच्या पुढील कृती कार्यक्रम कसा असेल या बाबत देखील विचार झाला पाहिजे.

सभापती महोदय, एक छोटा मुद्दा या अनुषंगाने उपस्थित होतो की, राज्य शासनाच्या माध्यमातून चालणारी कार्यालये आणि स्थानिक स्वराज्य संस्थांची कार्यालये अशी दोन प्रकारची कार्यालये राज्यात कार्यरत आहेत. जिल्हा परिषदेची कार्यालये आणि जिल्हाधिकारी कार्यालये यांच्यामध्ये कम्युनिकेशन गॅप मोठया प्रमाणावर निर्माण झालेला आहे. या दोन्ही कार्यालयांमध्ये अंतर देखील खूप असते. ही कार्यालये एकाच प्रिमायसेसमध्ये आणली आणि या कार्यालयांमधील कम्युनिकेशन गॅप कमी झाला तर लोकांना ते अतिशय सोयीचे होईल. म्हणून कम्युनिकेशन गॅंप कमी करण्याची आवश्यकता आहे.

2...



ABG/ KTG/ प्रथम श्री.शिगम 13:25

श्री. भगवान साळुंखे...

सभापती महोदय, आपण ब्रिटींशांचे अनुकरण करीत आलेलो आहेत. जिल्हाधिकारी हा जिल्हयाच्या ठिकाणी सुप्रीम करुन ठेवला आहे. तहसीलदार हा तालुक्याच्या ठिकाणी सुप्रीम करुन ठेवला आहे. तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या संपूर्ण कार्यालयांवर नियंत्रण ठेवण्यासाठी जनरल ॲडमिनिस्ट्रेशन एक अधिकारी नेमला गेला पाहिजे व त्यासाठी स्वतंत्र पद शासनाने निर्माण केले पाहिजे. तहसलीदार हा रेव्हेन्यूपुरता मर्यादित असला पाहिजे. पण जनरल ॲडमिनिस्ट्रेशन सांभाळण्यासाठी एक स्वतंत्र पद निर्माण करुन तालुका पातळीवरील सर्व कार्यालये त्याच्या नियंत्रणाखाली आणण्याची आवश्यकता आहे. माझ्या या सूचनेचा शासनाने गांभीर्याने विचार करावा अशी मी शासनास विनंती करतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो.

--------

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मनिष जैन (जळगाव स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांनी मांडलेल्या अशासकीय ठरावाला पाठिंबा देण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. सभापती महोदया, मला असे सुचवावयाचे आहे की, for making all the offices at one place, we should have good planning with vision in mind. माझा सांगण्याचा अर्थ असा आहे की, we have good architects, we have good planners, designers, ज्या इमारती शासन उभ्या करते या बाबत आजच नियोजन केले तर ते अधिक सोयीचे होईल. माननीय सदस्य श्री.भगवानराव साळुंखे यांनी सांगितल्याप्रमाणे तीन प्रकारच्या इमारती आहेत. काही इमारती ब्रिटिशकालीन आहेत. काही इमारती शासनाने बांधलेल्या आहेत. काही नव्याने बांधल्या जाणार आहेत. या नवीन इमारती बांधताना पुढील 100 वर्षे या इमारतींचा उपयोग कसा करुन घेता येईल असा दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवला तर ते अधिक फायदेशीर ठरेल.

सभापती महोदया, हा मुद्दा फार चांगला आहे. इस बारे में मुझे यह कहना है कि किसान और खेत मजदूरों को तलाठी आफिस, तहसीलदार आफिस और कलेक्टर आफिस में अनेक बार जाना पड़ता है. जब ये किसान उस आफिस में किसी अधिकारी के पास जाते हैं तो उन्हें बताया जाता है कि उनका केस तो दूसरे किसी बड़े अधिकारी के पास चला गया है. जब ये किसान उन अधिकारियों से पूछते हैं कि बड़े साहब का आफिस कहां पर है तो उनको बताया जाता है कि वह आफिस तो इस आफिस से दो किलोमीटर दूर है. फिर उनको वहां पर रुकना पड़ता है. त्या माणसाला तेथे थांबावे लागते. ही अडचण आहे. आपल्याकडे वाहन आहे. गरीब माणूस, शेतकरी यांच्याकडे ती सुविधा नसल्यामुळे त्यांना फार अडचणी सहन कराव्या लागतात. म्हणून दूरदृष्टीने नियोजन केले तर ही अडचण दूर होऊ शकते. माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी कॉम्प्युटरायझेशनचा उल्लेख केला आहे. We should keep technology in mind and we should use it. डॉक्यूमेंट रजिस्ट्रेशन बद्दल बोलले गेले. सब रजिस्ट्रार कार्यालयात गेल्यानंतर लोकांना असे वाटते की, आपले डॉक्यूमेंट कसे कॉम्प्युटराईज होणार, थम्ब इम्प्रेशन कसे घेतले जाणार? But all these things are done today and everyone is using the system. म्हणून प्रत्येक तलाठी कार्यालय, तहसील कार्यालय पातळीवर सब रजिस्ट्रार कार्यालय आहे तेथे कॉम्प्युटरायझेशन करुन नवीन तंत्रज्ञानाचा

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

फायदा घेतला जात आहे.  ही पध्दत सर्वच शासकीय कार्यालयांच्या ठिकाणी सुरु केली तर बेरोजगारांना काम मिळेल अशी ही योजना आहे.  या योजनेचा खूप फायदा होऊ शकतो, हे लक्षात घेऊन काय प्रयत्न करता येतील याचा सरकारने विचार केला पाहिजे आणि स्पष्टीकरण केले पाहिजे एवढे बोलून माझे भाषण संपवितो.  धन्यवाद.

-------

...3

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय सावंत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांनी मांडलेल्या अशासकीय ठरावाला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, कोकणामध्ये जेवढी शासकीय कार्यालये आणि शासकीय विश्रामगृहे आहेत त्यांची लोकेशन्स बघितली तर ती प्राईम लोकशन्स आहेत. फक्त मुंबई, पुण्यामध्ये शासन बीओटी तत्वावर विकासाची कामे करीत आहे. बीओटी तत्वावर कामे करताना शासनाला एकही पैसा खर्च करावा लागत नाही. कोकणामध्ये बीओटी तत्वावर कामे हाती घेण्यात आली तर खूप चांगले होईल. मुंबईमध्ये प्रत्येक शासकीय काम बीओटी तत्वावर केले जात आहे. शासनाला एकही पैसा खर्च करावा लागत नाही. कोकणातील लोकशन्स चांगली आहेत. समुद्र किनारे आहेत. तेथे बीओटी तत्वावर शासकीय कार्यालये एकाच ठिकाणी उभारता येऊ शकतील. अधिकारी वर्ग ज्या ठिकाणी अधिक फायदा होतो अशाच ठिकाणी बीओटी तत्वावर काम करु पहात आहेत. कोकणाकडे मात्र दुर्लक्ष करीत आहेत. बीओटी तत्वावर कोकणात कामे सुरु केली तर शासनाला एकही पैसा खर्च करावा लागणार नाही आणि सर्व शासकीय कार्यालये एकाच ठिकाणी उभारता येतील एवढे बोलतो आणि मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आभार मानून माझे भाषण संपवितो.

-------

नंतर 2के.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री) : सभापती महोदय, प्रशासकीय कार्यालये एकाच इमारतीत असावीत या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांनी अशासकीय ठरावाच्या निमित्ताने अनेक सूचना केल्या आहेत. याबाबत आजच नव्हे तर अनेक वेळा या सभागृहात व खालच्या सभागृहात सुध्दा या विषयावर चर्चा झालेली आहे. याबाबत मी असे सांगू इच्छितो की, सन 1990 मध्ये शासनाने असे धोरणच ठरविलेले आहे की, एकात्मिक प्रशासकीय कार्यालय इमारत एकाच ठकाणी असावी व त्याच इमारतीत संपूर्ण कार्यालये असावीत. असा शासन निर्णय निर्गमित झालेला आहे. त्यामध्ये अशा प्रशासकीय इमारतीचे स्वरुप कसे असावे यासंबंधीच्या सूचनाही दिलेल्या आहेत. या अनुषंगाने ज्या ज्या अडचणी येतात त्या लक्षात घेऊनच हा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यात प्रामुख्याने जागेची उपलब्धता अथवा तेथे ऑलरेडी इमारत अस्तित्वात आहे काय, असल्यास त्या इमारतीबाबत काय करावे अशा गोष्टींचा प्राधान्यक्रम देताना विचार केला पाहिजे व त्यानुसारच प्राधान्य देण्यात यावे असेही त्या निर्णयात सूचित करण्यात आले आहे. तसेच हे प्राधान्य देताना नव्याने निर्माण झालेले तालुके, जिल्हा मुख्यालय तसेच विभागीय कार्यालये अशा कार्यालयांचा विचार प्रथम केला पाहिजे. त्यानंतर उपलब्ध जागा आणि निधी लक्षात घेऊन टप्प्याटप्प्याने अशा प्रशासकीय इमारती बांधण्याचा विचार केला पाहिजे, असे धोरण आहे. तसेच तालुका पातळीवर अशा इमारतीमध्ये तहसील कार्यालय व त्यामध्ये सेतू कार्यालय, तलाठी, टीएलआर, उप कोषागार अधिकारी, उप निबंधक, जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था अशा प्रकारे सर्व कार्यालयांचा समावेश होईल असा टाईप प्लॅन तयार करण्याचे धोरण आहे. हे करीत असताना कमीत कमी 3650 चौ. फूट एवढी इमारतीची साईज आणि त्यात जागा कमी पडली तर तळमजला अधिक एक मजला अशी यामागची कल्पना आहे.

अशा प्रकारचे प्रस्ताव ज्या ज्या जिल्हा व तालुका पातळीवरुन येतात त्यांचा विचार मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या समितीने करावयाचा असतो. समितीमध्ये या प्रस्तावाला मान्यता देताना तालुका किंवा जिल्हा पातळीवरील प्रशासकीय इमारतीसाठी उपलब्ध असलेली जागा, जुनी इमारत आहे काय, असल्यास त्याची अवस्था काय आहे याचाही विचार करण्यात येतो. ज्या ज्या ठिकाणी भाड्याच्या जागेत कार्यालये अस्तित्वात आहेत त्यांना यात प्राधान्य दिले जाते. तसेच एका इमारतीसाठी 6 कोटी एवढा खर्च केला जातो. त्यानुसार आपल्याकडे 353 तालुके असून 2100 कोटी रुपये खर्च येईल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे .........

या सर्व ठिकाणी प्रशासकीय इमारती बांधण्याचा विचार केला तर टप्प्याटप्प्याने विचार करणे आवश्यक आहे. त्यात आपल्याकडे 27 ठिकाणी प्रशासकीय इमारती बांधलेल्या आहेत. 107 ठिकाणी तहसील कार्यालयाच्या जवळपासच इतर कार्यालये सुध्दा आहेत म्हणून अशा ठिकाणचे प्राधान्य बाजूला ठेवले जाते. तसेच या 107 ठिकाणची कोणतीही मागणी किंवा प्रस्ताव देखील आलेले नाहीत. 72 ठिकाणची कामे प्रगती पथावर आहेत. 147 तालुका स्तरावर प्रशासकीय इमारती बांधणे अत्यावश्यक आहे, त्यातील काही ठिकाणी तहसील कार्यालये बांधली आहेत. 58 तहसीलच्या नवीन इमारती बांधलेल्या आहेत, त्यांचे काय करावयाचे याचाही विचार करणे आवश्यक आहे. अशा प्रस्तावांना प्रायॉरिटी क्र. 3 मध्ये घेणार आहोत. 89 ठिकाणे अशी आहेत की, तेथील प्रशासकीय इमारतींचे बांधकाम टप्प्याटप्प्याने करण्यात येणार आहे. अशा प्रकारे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रशासकीय इमारती बांधण्याचे प्रस्ताव समितीकडे येत असतात व त्यांना तशी मान्यता दिली जाते. मागील वर्षी 260 कोटीची मागणी याच कामासाठी केली होती व त्यातून 108 कोटी रुपये शासनाने दिले. त्यामुळे मागच्या कामाचा स्पिल ओव्हर असतो, त्याला प्राधान्य देणे आवश्यक असते. अशा प्रकारे गरजेनुसार निश्चितपणे हे काम करण्यात येईल. कारण शासनाचाच दृष्टीकोन होता की, एकाच इमारतीत सर्व शासकीय कार्यालये असावीत....

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे ..

सभापती महोदया, शासकीय कार्यालये एकाच ठिकाणी नसल्यामुळे अनेकदा लोकांना वेगवेगळया ठिकाणी जावे लागते. काही वेळा सबंधित ऑफिस कोठे आहे हे देखील त्यांना माहीत नसते. त्यामुळे ते ऑफिस कोठे आहे असे विचारत विचारत फिरण्यामध्ये लोकांना त्रास होत असतो. या संदर्भात सकारात्मक भूमिका घेऊन सगळी शासकीय कार्यालये एकाच ठिकाणी बांधण्याचा शासनाचा विचार आहे. सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांनी आपला अशासकीय ठराव मागे घ्यावा अशी मी त्यांना विनंती करतो.

श्री.हुसेन दलवाई :सभापती महोदय, मी मांडलेल्या अशासकीय ठरावाच्या संबंधी माननीय मंत्र्यांनी धोरणात्मक काही निर्णय घेतलेले आहेत तसेच काही ठिकाणी कामे चालू असून त्यासबंधीची माहिती देखील दिलेली आहे. माननीय मंत्र्यांनी अतिशय चांगले आणि समर्पक उत्तर दिलेले आहे. हा विभाग चांगले काम करीत आहे असे त्यावरुन दिसून येत असल्यामुळे अशासकीय ठराव परत घेण्यासाठी सभागृहाने अनुमती द्यावी अशी मी विनंती करतो.

सभागृहाच्या अनुमतीने ठराव मागे घेण्यात आला .

---

**अशासकीय ठराव क्रमांक 19 व 76 बाबत**

**तालिका सभापती** : आजच्या कामकाज पत्रिकेवरील अशासकीय ठराव क्रमांक 19 व 76 नंतर चर्चेला घेण्यात येतील.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याच्या मुद्याबाबत**

**तालिका सभापती (ॲड.उषा दराडे )** : सन्माननीय गृह मंत्र्यांना मी सांगू इच्छिते की, आजच्या कामकाज पत्रिकेवरील लक्षवेधी सूचना क्रमांक तीन जेव्हा चर्चेसाठी आली होती तेव्हा सन्माननीय सदस्य श्री हुसेन दलवाई सभागृहात उपस्थित नव्हते. लक्षवेधी सूचना संपल्यानंतर..

श्री.आर.आर.पाटील :सभापती महोदया, माझा पॉईट ऑफ प्रोसिजर आहे...........

**तालिका सभापती** : माझे म्हणणे पूर्ण होऊ द्यावे.

श्री.आर.आर.पाटील : तत्पूर्वी माझेही म्हणणे आपण ऐकून घ्यावे. मला खालच्या सभागृहातून येथे बोलावले गेले. खालच्या सभागृहात माझी उपस्थिती अनिवार्य होती. लक्षवेधी सूचनेसाठी मी खालच्या सभागृहात गेलो होतो परंतु बाकीचे मंत्री गेले असल्यामुळे मी खालच्या सभागृहात अडकून पडलो होतो. आता मी येथे आलो असल्यामुळे येथेही माझी उपस्थिती अनिवार्य झाली आहे. मी सुध्दा अनेक वर्षापासून सदनामध्ये काम करीत आहे. एखाद्या लक्षवेधी सूचनेला संपूर्णपणे उत्तर दिल्यानंतर, दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या उत्तरावर समाधान व्यक्त केल्यानंतर पुढचे काम पुकारले जाते. आज पुन्हा अगोदरच्या लक्षवेधी सूचनेसाठी येथे मला बोलाविण्यात आलेले आहे...... .

**तालिका सभापती** : सन्माननीय गृह मंत्र्यांना मी सांगू इच्छिते की, आपल्याला लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात बोलाविण्यात आले नाही. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांनी औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर माननीय उप सभापतींनी असे निदेश दिले की माननीय मंत्र्यांना बोलावून घेण्यात येईल व या औचित्याच्या मुद्यावर पुन्हा चर्चा करु. लक्षवेधी सूचना पुन्हा पुकारण्यात आली नाही.

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : औचित्याच्या मुद्यावर चर्चा होत नाही. औचित्याचा मुद्दा मांडण्यात येतो आणि त्याबाबत सरकार उत्तर देते.

**तालिका सभापती** : त्या बाबतीत शासनाची जी काही भूमिका असेल ती आपण सांगावी.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांची लक्षवेधी सूचना आज चर्चेसाठी होती परंतु त्यावेळी त्यांना अचानक रुग्णालयामध्ये भरती व्हावे लागले होते. त्यांच्या लक्षवेधी सूचनेतील विषय अत्यंत गंभीर असल्यामुळे औचित्याच्या मुद्याव्दारे त्यांनी हा विषय पुन्हा सभागृहात उपस्थित केला आणि या विषयावर चर्चा व्हावी किंवा शासनाकडून समर्पक उत्तर मिळावे अशा प्रकारची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली होती. या लक्षवेधी सूचनेतील विषय अत्यंत गंभीर स्वरुपाचा आहे. त्यामुळे उत्तराशिवाय हा विषय सोडून देणे योग्य होणार नाही. परतूर, जिल्हा जालना येथे गंभीर स्वरुपाची घटना घडलेली असतांना सदनामध्ये हा विषय गांभीर्याने चर्चिला गेला किंवा नाही तसेच या संदर्भात योग्य ते उत्तर मिळाले किंवा नाही याकडे राज्यातील जनतेचेसुध्दा लक्ष लागलेले आहे. त्या दृष्टीकोनातून सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांनी औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता. सन्माननीय गृह मंत्री हे ज्येष्ठ आहेत आणि एकदा लक्षवेधी सूचना चर्चेला आल्यानंतर ती पुन्हा लगेच चर्चेला येऊ शकत नाही हे त्यांना देखील माहीत आहे. परंतु या संदर्भात कोणताही तांत्रिक मुद्दा उपस्थित न करता याविषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन समर्पक असे उत्तर देण्याचा प्रयत्न शासनाकडून केला गेला पाहिजे.
या सगळया घटनेच्या संदर्भात सर्वांच्या मनामध्ये मोठया प्रमाणावर संशय निर्माण होत आहे ही बाब आपण लक्षात घेतली पाहिजे. रुख्साना नावाची मुस्लिम समाजाची महिला आहे.....

श्री.आर.आर.पाटील : मघाशी याबाबत चर्चा झाली आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : मघाशी जरी चर्चा झालेली असली तरी सुरुवातीला हा कोणता विषय सुरु आहे हे मला कळले नव्हते.जेव्हा मला हा विषय कळला तेव्हा आपण उठून गेला होता.तत्पूर्वी मी बोलण्यासाठी हात वर केला असतांना उप सभापतींना मला परवानगी दिली नव्हती. आता मला बोलण्याची संधी मिळाली असल्यामुळे मी सांगतो की, या प्रकरणी संशय निर्माण झालेला आहे. मुस्लिम समाजामध्ये अग्नी दिला जात नाही. तिचे कपडे जाळण्यात आलेले आहे. त्यामुळे या प्रकरणी लोकांच्या मनामध्ये संशय निर्माण झाला आहे.

नंतर श्री.सरफरे

अप्रकाशित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे.....

यामध्ये त्या मुलीवर बलात्कार झाल्यानंतर पुरावे लपविण्याचा, दडपण्याचा पुरेपूर प्रयत्न त्याठिकाणी झालेला आहे. त्यामुळे यामध्ये जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. अशाप्रकारे एका मुलीवर बलात्कार करुन पुरावे ढापण्याच्या दृष्टीकोनातून तिच्यावर अंत्यसंस्कार करणे हा या राज्यामध्ये फार मोठा चर्चेचा विषय झालेला आहे. त्यामुळे यामध्ये सरपंच, पोलीस पाटील किंवा त्यांना सहकार्य करणारे अधिकारी, पोलीस अधिकारी जबाबदार असतील त्यांच्यावर तात्काळ कारवाई केली पाहिजे. याठिकाणी हा विषय अनुत्तरीत ठेवून त्याचे उत्तर उद्या किंवा परवा देऊ असे सांगण्यासारखा हा विषय नाही. या संदर्भात शासनाने गांभीर्याने दखल घेऊन यामध्ये जे अधिकारी जबाबदार असतील त्यांना निलंबित केले पाहिजे अशी माझी मागणी आहे.

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी अतिशय वेगळया तऱ्हेने हा प्रश्न उपस्थित केला आहे. मी सभागृहामध्ये वेळेवर उपस्थित राहू शकलो नाही याबद्दल मी सभागृहाची माफी मागतो. फक्त माननीय गृह मंत्र्यांनी माझे म्हणणे व्यवस्थित ऐकून घ्यावे अशी विनंती करतो. आता मी हॉस्पिटलमधून थेट या सभागृहामध्ये या प्रश्नावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी आलो आहे. या प्रश्नासंबंधी शासनाकडून देण्यात आलेले उत्तर अतिशय चुकीचे आहे. याठिकाणी सर्व प्रकरण दडपण्याचा प्रयत्न झालेला आहे. हा मंत्री महोदयांचा दोष आहे असे मला म्हणावयाचे नाही. परंतु शेख इब्राहीम शेख आणि तेथील एक अधिकारी अशा दोन अधिकाऱ्यांनी त्या ठिकाणी थेट तक्रार करण्यास गेलेल्यांना सांगितले की, हा प्रश्न पुन्हा आपण कशासाठी उपस्थित करीत आहात? जाऊ दे, मोठया लोकांचे प्रकरण आहे, तुमच्या अंगाशी येईल. तुम्हाला आम्ही कुठेतरी अडकवू असे सांगितले.

सभापती महोदया, या मुलीवर नेहमी अत्याचार होत होते. तिच्या आजीला दुसऱ्या घरी पाठविण्यात आले. त्या ठिकाणी सर्व मुसलमानांची घरे आहेत. या ठिकाणी हिंदू-मुसलमान हा जातीचा प्रश्न नाही. त्या ठिकाणी रहाणारे सर्व लोक गरीब बनवा मजदूर आहेत. बाजूला एका लग्नाचा वलिमा होता. त्या लग्नाला आलेल्या लोकांना हे समजले त्यावेळी ते कफन घेऊन कब्रस्तानात गेले व त्यांनी त्याठिकाणी पाहिले असता, त्या मुलीचे घरातील कपडे आणून तिला जाळण्यात आल्याचे आढळले. मला आपल्याला विचारावयाचे आहे की, त्या जिल्ह्याचे एस.पी. हे नेहमी सतर्क असतात कां, ते शासनाचे वेतन मौजमजा करण्यासाठी घेतात काय? माझी अशी मागणी आहे की, या प्रकरणामध्ये पहिल्यांदा आपण एस.पी.यांना रजेवर पाठविले पाहिजे. तसेच,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. हुसेन दलवाई....

या दोन्ही अधिकाऱ्यांना आपण निलंबित करावे आणि त्यानंतर चौकशी करावी.

सभापती महोदया, हे प्रकरण वाटते तितके साधे नाही. गेल्या वर्षभरामध्ये परतूर तालुक्यामध्ये 30 खून झाले असून त्याची आतापर्यन्त नीट चौकशी झालेली नाही. म्हणून आपण ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी व शासनाने या प्रकरणाची सी.आय.डी. मार्फत नीट माहिती घ्यावी. ती माहिती घेत असतांना अगोदर या अधिकाऱ्यांना बाजूला करण्यात यावे व त्यानंतर 18 तारखेला या सभागृहामध्ये माहिती सादर करावी. मंत्री महोदय, तुमच्या हेतूबद्दल माझ्या मनामध्ये अजिबात शंका नाही, तुम्ही अतिशय चांगले मंत्री आहात. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, या प्रकरणामध्ये लपवा लपवी आणि दडपा-दडपी होत आहे, काही दिवसापूर्वी या गावातच आणखी एका मुलीचा खून झाला होता. सुरुवातीला या मुलीच्या बाबतीत असे सांगण्यात आले की, त्या मुलीने गळफास घेतला. परंतु पत्र्याचे  लहान घर असल्यामुळे गळफास कसा घेणार हे नंतर लक्षात आले. त्यानंतर त्या मुलीच्या आजीने साप चावल्याचे सांगितले. या ठिकाणी दोघांची दोन वेगवेगळी स्टेटमेंट आहेत. कॉंग्रेसचे काही कार्यकर्ते त्या ठिकाणी जायला घाबरत होते परंतु जालन्याच्या मौलाना आजाद विचार मंचच्या महिला अध्यक्षांनी त्यांना धीर दिल्यानंतर कार्यकर्ते त्या ठिकाणी गेले. त्या मुलीची हाडे आणि फोटो मी आपणास सादर केलेली आहेत. सभापती महोदया, खैरलांजी प्रकरण झाले त्यावेळी मला फार वाईट वाटले, परंतु महाराष्ट्र रडला नाही. महात्मा फुले, शाहू महाराज आणि आंबेडकरांचे आपण नेहमी नाव घेतो, तर मग या समाजाचे काय होणार आहे, तेव्हा या ठिकाणी या दोन अधिकाऱ्यांना निलंबित करुन पोलीस अधीक्षक यांना रजेवर पाठवून त्यांची चौकशी करणार काय?

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

APR/ पूर्वी श्री.सरफरे . . .. 13:50

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सकाळी ज्यावेळी ही लक्षवेधी सूचना चर्चेला आली त्यावेळी सभागृहात सन्माननीय सदस्य उपस्थित नव्हते. ते आजारी होते परंतु आता ते सदनामध्ये आलेले आहेत. त्यानंतर त्यांनी याबाबत आणखी माहिती दिलेली आहे. परंतु हा वेगळा आणि महत्वपूर्ण विषय असल्यामुळे मी याचे उत्तरही देण्याचा प्रयत्न केला. मात्र सकाळी हे प्रश्न उपस्थित केलेले नसताना सुध्दा मी या विषयाला न्याय देण्याचा पुरेपूर प्रयत्न केलेला आहे.त्यावेळी मी स्वत:हून सांगितले की, मी हे उत्तर माहितीच्या आधारावर, तपासाच्या आधारावर दिलेले आहे.पण या उत्तराने माझे व्यक्तिगत समाधान झाले नाही. म्हणून मी या घटनेचा तपास करण्याचे काम लोकल पोलिसांकडून काढून सी.आय.डी.यंत्रणेकडे दिले असून ते याचा तपास करीत आहेत. हे मी सकाळीच सभागृहाला सांगितले आहे.आता याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिलेली आहे, ती गृहीत धरुन पोलिसांनी या घटनेचा तपास करताना यामध्ये कुठे हलगर्जीपणा केला आहे काय हा सुध्दा सी.आय.डी.तपासाचा एक भाग राहील. हा एका गरीब मुलीच्या मृत्यूचा प्रश्न आहे. मी सभागृहाला एवढेच आश्वासन देईन की, या तपासामध्ये जर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे दुर्लक्ष झाले असेल आणि या घटनेमध्ये त्या मुलीचा खून झाल्याचे निष्पन्न झाले तर जी काही कारवाई करणे आवश्यक आहे ती सगळी कारवाई केली जाईल, कोणालाही स्पेअर केले जाणार नाही एवढेच मला सांगावयाचे आहे.

-----

. . . .2 एन-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** (ॲड.उषाताई दराडे) : सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार, दिनांक 18 एप्रिल 2011 रोजी सकाळी 10.30 वाजता पुन: भरेल. त्यादिवशी सकाळी 10.30 ते दुपारी 1.00 वाजेपर्यंत सभागृहाची विशेष बैठक होईल. त्या बैठकीमध्ये नियम 92 अन्वये अर्ध्या तासाच्या चर्चा घेण्यात येतील. त्यानंतर दुपारी 01 वाजून 15 मिनिटांनी सभागृहाची नियमित बैठक सुरु होईल.

(सभागृहाची बैठक दुपारी 01 वाजून 51 मिनिटांनी, सोमवार,दिनांक 18 एप्रिल 2011 रोजीच्या सकाळी 10.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही